UNIVERSAL LIBRARY
OU_192899
UNIVERSAL LIBRARY

# गोड सोबत

विष्णु विनायक वोकील.

फेब्रुवारी १९५०

किंमत दोन रुपये

●

— एकमेव विक्रेते —

*कलकर्णी ग्रथागार*

१८६, शनिवार पुणें २.

प्रकाशन ६८ वें

— प्रकाशक —

*पडित अनत कुलकर्णी*

१८६, शनिवार, पुणें २.

— मुखपृष्ठ —

*चित्रकार मुळगावकर*

— मुद्रक —

*डी जी गपचूप*

श्री शिवाजी प्रिंटिंग वर्क्स,

४९५ शनवार पुणें २.

●

# कथानुक्रम


| | | |
|---|---|---|
| १ | अमृत कुंड | ५ |
| २ | शैतान | १६ |
| ३ | बहेन | २६ |
| ४ | सखाराम | ३५ |
| ५ | काजळी आणि ज्योत | ४३ |
| ६ | भूक | ४८ |
| ७ | ते दिवस पुन्हा येणार नाहींत | ५६ |
| ८ | गोड सोबत | ६७ |
| ९ | बाळपणीचा दोस्त | ७८ |
| १० | मेणबत्ती | ८९ |

● ● ●

## नवीन प्रकाशनें

| | | |
|---|---|---|
| १ | कमलपत्रें | ना सी फडके |
| २ | पद्मा | : गो नी. दांडेकर |
| ३ | माहेर | : अरविंद गोखले |
| ४ | मैफल | : ना सी. फडके |
| ५ | मुकामूक | : दत्तू बांदेकर |
| ६ | अभ्यगस्नान | : ना. सी फडके |
| ७ | फुलवाली | : वि वा. शिरवाडकर |
| ८ | जेहलम | : ना. सी. फडके |
| ९ | आशेचे किरण | : वा भा. पाठक |
| १० | देणें देवाचें | : मनमोहन |

● ● ●

# अमृतकुंड



जुन्नरला जाण्यात माझे दोन हेतू होते. शिवनेरी किल्ला पाह्यचा आणि माझी मावशी जुन्नरला राहात असे तिची भेट घ्यायची. बरींच वर्षे झालीं, मावशी भेटली नव्हती. मी लहान होतो तेव्हा मावशीचें बिऱ्हाड पुण्याला होतें.

दहा वर्षे झालीं असतील. त्यावेळीं लीला सहा, सात वर्षांची असेल. मावशीचें हें शेंडेफळ. सहाजिकच त्यांच्या घरात ती सर्वांची विशेष लाडकी होती पण त्यामुळे ती कमालीची हट्टी बनली होती. मी तिचा शत्रु होतों. मी तिच्यापेक्षा फार तर दोन वर्षांनीं मोठा असेन. मीहि माझ्या घरात लाडवलेला होतो. त्यामुळें आम्हां दोघांचे दर पाच मिनिटांगणिक खटके उडत. माझा कोट लिली मागू लागली तर मी गुरगुरल्याशिवाय कसा राहीन! माझ्या पेन्सिली ती पळवी माझ्या पतगाची दोरी लंपास करी. मी शाळेंत गेलों कीं ती माझे फरताळ उलथें पालथें करी. मी आईकडे तक्रार करी. मावशीला बोले आणि लिलीला चिडून म्हणे, "चालती हो तूं आमच्या घरातून. कशाला आलीस? तूं आपल्या बापाकडे जा—" आणि असें मी बोललों कीं मला माझ्या वडिलांचा मार खावा लागे. मी मनांतून त्या दातपडक्या पोरीचा राग करूं लागलों. नंतर दहा वर्षांत आम्ही एकमेकांना भेटलों नाहीं, चिठ्ठी नाहीं, चपाटी नाहीं, काहीं नाहीं.

कॉलेजमधील मित्रांबरोबर मीं शिवनेरीस जाण्याची वडिलांजवळ पर-

वानगी मागितली तेव्हा आईनें मावशीला भेटून येण्याचा प्रश्न काढला. खुशाली विचारून येण्याविषयीं तिनें मला आवर्जून सांगितलें. आठवण झाल्यासारखें करून ती मला म्हणाली, " तिची एक लहान मुलगी होती. काय बर तिच नाव ? नावही मेलं आठवत नाहीं. अशी खोड्या कराव याची ! एक दिवस तुझ आणि तिच पटल नाही. पण पोरगी मोठी गोड आहे. आतां मोठी झाली असेल. लग्न झालं की नाहीं कुणास ठाऊक ! नसेल झाल तर तिला आण चार दिवस आपल्या घरी. बघ, पोझीशन बिघडत नसेल तर येतांना घेऊन ये तिला. "

आईने मला ही सार्थ दुशी दिली होती. बायकाना घेऊन हिंडणें मला आवडत नसे. माझ्या वहिनींचें माहेर मुबईला होतें. ती नेहमी माहेरी जाये करीत असे. पण तिला स्टेशनवर जाऊन आणायला मी तयार नसे. वहिनी माझी खूप चेष्टा करी. " भावजींना आमच्यासारख्या दोनदोन मुलाच्या आयाबरोबर हिंडण कसं आवडेल ? एकादे वेळी लोकाचा गैरसमज झाला म्हणजे आली का पचाईत ? "

पण मी एकदाहि तिच्याबरोबर बाहेर पडलो नाहीं. ह्या माझ्या तऱ्हेवाईकपणाला उद्देशून आईनें ' पोझीशन ' शद्ब मुद्दाम उच्चारला होता. मी हसून म्हणालों, " आपल्याला तें कांही बुवा जमत नाहीं. बायका बरोबर असल्या म्हणजे बांधल्यासारखे वाटतं जरा—" " होय का ? मग उद्यां लग्न झाल्यावर काय कराल, भाऊजी ! " वहिनीनें मधें तोंड घातलें.

" राहू दे ग ! तो खूप नाचेल. पण अजून आम्ही जिवत आहोंत. बापू, तुझ मी ऐकणार नाहीं, जुन्नरला जायला या अटीवर परवानगी देईन. त्या पोरीला घेऊन आल पाहिजे—" आई म्हणाली

माझी सुटका करून घ्यायला दुसरा मार्ग नव्हता. आमच्याबरोबर माझ्याशीं विशेष सख्य असलेली रत्ना येणार होती. तिला काय वाटेल म्हणून मी भीत होतों.

—मी जुन्नरला गेलों तेव्हा सध्याकाळीं दिवे लागणीची वेळ झाली असेल. आम्ही दहा बारा जण होतों आठ पुरुष आणि चार मुली. पुरुषांनीं तेथील इंग्रजी शाळेंत रात्र काढावी असें ठरलें. बायकांची सोय माझ्या

मावशीच्या घरीं मीं करावी असें सर्वांचें मत पडलें. जेवणाचा प्रश्न नव्हता. आमच्याबरोबर भरपूर अन्न डब्यातून आम्ही नेलें होतें. आम्ही स्टँडवर उतरलों तेंच आमच्यापुढून एक उघडी बैलगाडी गेली. मीं सहज तिकडे पाहिले. आत एक अतिशय देखणी मुलगी दिसताच मी टक लावून पाहू लागलो.

"अहो म्हटल, श्रीयुत बापूसाहेब, खेड्यातल सौंदर्य फार डोळे ताणून पाहूं नका आधीं आमची सोय लावून या—" रत्ना लाडिकपणाने हातातील पर्स माझ्या डोक्यावर ठेवीत म्हणाली मी चेष्टेनें तिची पर्स पकडून म्हणालो, "तुमची सोय लावण्याची कायदेशीर जबाबदारी माझ्यावर नाहीं. मी तुमच्याशीं कोणत्याही, कसल्याही नात्यानें बाधला गेलो नाहीं. जरा दुरून बोला—"

"अय्या! म्हणजे ज्या मुलीशीं तुम्ही बाधले जाल तिला आधीं विचारच करावा लागेल, नाही का?" मैना पराजपे जीभ अरळ ठेवून बोलत असे. तिला वाटे, असे बोलणे तिला शोभत असे—पण आमची निराळीच कल्पना होती. मित्राची शाळेंत सोय लागल्यावर मी बरोबरच्या चार साळुक्याना घेऊन मावशीचा पत्ता शोधू लागलों. मैना परांजपे अधारांत सारखी वटवट करीत होती. खेड्याना तिनें भरपूर शिव्या मोजल्या. वाटेंतल्या खाच—खळग्यानीं ती रडकुंडीस आली, पण बोलायचें तिनें सोडलें नाहीं रस्ता नीट दिसेना म्हणून रत्नानें माझा हात धरला. मला थरारल्यासारखें झालें. रत्नाचा हात मला देवकापसासारखा मऊ वाटला. मी हल केच त्या हातावर थोडासा जास्त दाब दिला. तिनें उलट ह्याच पद्धतीनें उत्तर दिलें. मी हवेंत पोहत होतों. अधारात देखील मला हजारों किटसन दिवे नाचू लागल्याचा भास झाला. जग प्रकाशानें भरल्याचा मला सशय येऊ लागला.

अधारानें आमच्या या चोरट्या सलगीवर पाघरूण घातलें इतर मुलींना आमचें सख्य दिसलें नाहीं बाकीच्या दोघी राजकारणावर चर्चा करीत होत्या आणि वाटेंत झोंपलेल्या कुत्र्यांच्या शेपटीवर पाय देत होत्या.

सुखाचा क्षण फार वेळ टिकत नाहीं. एका कार्ट्यानें आम्हाला माव-

शाच्या दारात आणून सोडलें. कोण आले आहे हें पाहण्यासाठीं मावशी दारात आली. माझी ओळख पटताच तिनें मला हाताला धरून नेलें ती बरीच थकल्यासारखी मला दिसली पण तिच्या आवाजात मुळीच बदल झाला नव्हता आमच्या मावशीचें बोलणे चांदीच्या रुपयासारखा छन् छन् आवाज देई. फार गोड. माझ्या येण्याचा हेतू मीं चार वाक्यात तिला सांगितला. मुलींची सर्व व्यवस्था करण्याचें तिनें आनंदानें कबूल केले. इतक्यात आंतल्या बाजूनें आवाज आला. मी चकित झालों. अगदीं थेट मावशीचा आवाज.

" आई कोण आलं आहे–? " आणि त्या आवाजाची मालकीण पुढें आली. पुन्हा मी आश्चर्यचकित झालों हीच ती. मघाशीं स्टॅंडवर बैलगाडींत दिसलेली मुलगी हीच. या घरात राहाणारी ? अन् मावशीला आई म्हणते ! म्हणजे ! मी थक्क झालों. माझी मावस बहीण ! भले, अन् मीं तिला रस्त्यात ओळखलें देखील नाही.

" लीला, अग आपला बापू आला आहे. विसरलीस वाटत ? तुमचीं भांडण तोडता तोडतां मला रडकुंडीस आणलस कीं— " मीं लाजून लिलीकडे पाहिलें अन् मला वाटत तीहिपण लाजली असावी आमचें लहाणपण माझ्या मैत्रिणीना ऐकायला लागू नये म्हणून मी गडबडीनें म्हणालों, " मावशी, आमच्या जेवणाची काळजी करू नकोस. आमचे डबे भरलेले आहेत– "

" ते भरलेलेच राहू द्या चावटपणा पुरे कर. आधीं सगळ्या पोराना इकडे बोलावून आण पाहू. आंबेमोहोराचा भात करतें. लिली छानदार पिठल करील. रेशन असेल तर तें तुमच्या शहरात हें पुणं नाहीं. जेवल्याशिवाय झोपलात तर मला झोंप येईल का–? " मावशी प्रेमळपणानें म्हणाली. मला नाहीं म्हणवेना लिलीकडे मीं सहज मान वर करून पाहिलें. तिच्या नजरेंतील आतुरपणा मला दिसला. जेवणाचें मीं ठरवून टाकलें.

रात्रौ मी मावशीजवळ बसलों. लिला थोडें अंतर ठेऊन तिच्या दुसऱ्या अंगास बसली माझ्या मैत्रिणी व मित्र पुढच्या ओसरीवर काहीं तरी आपापसात बोलत पडले होते, रत्ना फक्त मावशीच्या समोर बसली.

" ही मुलगी कोण ? लग्न झाल नाहीं वाटतं अजून ? " मावशी रत्नाच्या कपाळावरचे केस बाजूस करून म्हणाली.

" ती माझ्या वर्गात शिकत आहे. रत्ना तिचं नाव– " मीं लाजलेल्या रत्नाकडे पाहून उत्तर केलें.

" नाव छान आहे " लीला आईच्या अंगावर रेलून म्हणाली

" अन् रूपही किती छान आहे ! " मावशी कौतुकानें म्हणाली. रत्ना जास्तच लाजली मला मोठी मौज वाटली. मावशीने माझ्या पाठीवर हात ठेवून आकस्मात् म्हटले, " बापू माझ म्हातारीच ऐक. हिच्याशी लग्न कर. तुझ्या आईला ती फार आवडेल तिला मुलीची फार आवड आहे, हिला ती देवघरात बसवील–" रत्ना पायाच्या आगळ्यानें जमीन उकरू लागली. मी आढ्याकडे पाहू लागलो. मध्येंच मीं लीलाकडे पाहिले लीला माझ्याकडे रोखून पहातांना मला दिसली. मला कसंसच वाटल ! गोंधळ थांबावा म्हणून मी म्हणालो,—

" मावशी, रत्ना लग्न करायच नाहीं म्हणते आहे. ती देशसेवा करणार आहे—"

" आमच्या लिलीसारख ! तिलासुद्धा लग्न म्हटलं कीं कपाळाला तिडीक उठते. पण म्हणावं, सोनसुतळ्यानो, किती दिवस उड्या माराल ? बापू, पुण्याला एकादा छानदार मुलगा असला तर लिलासाठीं पहा म्हणाव. मनूला साग माझा निरोप. म्हणाव–"

" आई, मी उठून जाऊ का ? " लीला तिच्या तोंडावर हात ठेवून म्हणाली.

लिलीला बरोबर घेऊन येण्याचा निरोप सांगण्याची ही वेळ होती. पण मी बोललों नाहीं. माझ लक्ष लिलीच्या बारीक निरीक हालचालींत गुंतल होतं. लिलीला मी शत्रु मानीत होतों ही माझी केवढी अक्षम्य चूक होती हें मला पटत होतें. लिली आता फार बदलली होती. आजवर रत्ना माझ्या दृष्टीनें बेफाम सुदर ठरली होती–पण एका स्मितानें रत्नाला बाजूला सारायचें सामर्थ्य लिलींत होतें रत्ना कुंभाराचें गाडगें. लिली नक्षीकाम केलेली ग्वाल्हेरी सुरई !

लीला सुदर होती तिच्या उजव्या गालावर बारीक तीळ होता. तिच्या गळ्यावर बारीकसा कंगोरा होता ती मान वर करून पाहू लागली म्हणजे तो स्पष्ट दिसे. छे ! माणसाला भान राहावे तरी कस ? मी धिटाईनें लिलीच्या बाधेसूद अगलटीकडे निरखून पाहू लागलों. लिलीची भरदार छाती पाहून जगाला आग लावावी असा भयकर विचार डोक्यात येऊ लागला. तिचे उघडे दड घट्ट घट्ट पकडावे, तिच्या नाकाला नाक घासावे, तिच्या लालचुटुक ओठाना एकदा तरी स्पर्श करावा असले भयकर विचार माझ्या डोक्यांत थैमान घालू लागले.

मी झोपायला बाहेर जाऊ लागलों तेव्हां लिली मला म्हणाली, " मी येते किल्यावर. येऊ ? " " मावशी सोडीत असेल तर माझी हरकत नाहीं. तू काय माझ्या डोक्यावर थोडीच बसणार आहेस ? " मी म्हणालो.

" अन् बसलें तर काय टाकून द्याल मला ? म्हटल, मी जरी रत्ना नसलें तरी माझाही काहीं तरी हक्क आहेच— "

" कबूल— " मी त्या नुसत्या कल्पनेन मोहरून गेलों होतों.

—सकाळीं आम्ही शिवनेरी पाहून आलों. दुपारी जेवण खाण करून मोटारनें पुण्यास जाण्याचा आमचा बेत होता. मैना पराजपे तर परस्पर मोटार स्टॅडवर जायला उत्सुक होती तिला रात्रभर शेणाच्या वासानें झोंप आली नाहीं. ज्या गावात भर रस्त्याने गाढवं हिंडतात त्या गावात एक क्षणभर राहण्यास ती तयार नव्हती. सर्वजण जाण्याच्या तयारीला लागले. पण मीं राहण्याचें ठरवलें.

माझा बदललेला बेत ऐकून एकजण म्हणाला, " का रे राजा, इतका मावस बहिणीवर फिदा झालास ? "

मी किंचित् ओशाळत्या मुद्रेनें म्हणालों, " बद कर वटवट- "

" कां ! सकाळीं किल्यावर जाताना अन् येतांना सारखा तिच्यापुढें कशाला रे गोंडा घोळीत होतास ? तुला काय वाटल, आम्ही बोंडल्यान दूध पितों ? "

मी बोललों नाहीं मला ही थट्टा मनापासून आवडत होती, लोकांच्या डोळ्यावर येईल असा मी लिलीशीं भेदभावानें बोलत होतों. रत्ना माझ्या-

वर खप्पा झाली होती. पण मला माझें खरें रत्न सापडलें होतें. आता नावाच्या रत्नाला कोण जवळ करतो.

मावशीने मला चार दिवस राहण्याचा आग्रह केला. मीं आढेवेढे घेतले नाही माझे सवगडी दुपारी मोटारनें निघून गेले. रत्ना खवचटपणानें म्हणालीच,

" बापूसाहेब, म्हटलं, गरीबाची आठवण ठेवा ह. पुण्यात कधींकाळीं आलात तर लिलाबाईना अवश्य आमच्या घरीं घेऊन या. अशी गोड माणस नेहमींच मिळत नसतात— "

हेंही जहर मीं पचवून टाकलें. लिला आणि मी परत घरीं आलों. आठ दिवस मी मावशीच्या घरीं राहिलों.

लीला माझ्याबरोबर हिंडायला मोकळी असे आणि उत्सुक असे. रोज सध्याकाळीं आम्ही शिवनेरीच्या पार मागच्या बाजूस हिंडून येत असू. तिसऱ्या का चौथ्या दिवशी आम्ही नेहमीपेक्षा खूप लाब गेलों. संध्याकाळ होण्याची वेळ होती. परत यायला पाहिजे होतें. पण जरा हुशारी वाटावी म्हणून रस्त्याच्या कडेला एक दगड होता, त्यावर टेकलों. पलीकडे एक लहानसा ओढा होता. ओढ्याला पाणी नव्हते पण एके ठिकाणीं लहानसा झरा दिसला. तहान लागली होती. झऱ्याचें पाणी पोटभर प्यायलों. लिलेनें माझ्या रुमालानें तोंड पुशीत म्हटले, " ह्या झऱ्याची कीर्ति आहे. त्याला अमृतकुंड म्हणतात. ओढ्याचं पाणी पार आटल तरी या कुंडांत बारमाही पाणी राहत किल्यावर रामकुंड आहे तें, त्याचंच पाणी या ठिकाणीं येतं असे म्हणतात. "

" पण कीर्ति नाहीं सागितलीस— " मी तिच्या हाताला स्पर्श करून म्हणालों.

" मी सांगणार नाहीं. चेष्टा कराल तुम्ही माझी— " लीला गोड हसून म्हणाली.

" हक्क आहे माझा. पर्वा माझ्या डोक्यावर बसण्याचा तुझा हक्क होता मग चेष्टा करण्याचा माझा हक्क कां नसावा ? लीला, बऱ्या बोलानं साग, नाहींतर— "

"नाहींतर काय कराल ?"

मी वेभानपणानें बोलून गेलों, "तुझ्या गालाला चावेन—" आणि अखेरीस मीं तिच्या गालाला माझ्या ओठानी ओझरता स्पर्श केला ! आतां माझी शुद्ध बहुतेक हरपली होती.

"इश्श !" म्हणून लीला थोडी दूर झाली पण लगेच माझ्या खांद्याला टेकून म्हणाली—"बर नाहीं हं, हें ! आपल नात लक्षांत आहे न !"

"तें नसत तर मी तुला पुण्याला पळवून नेली असती पण तुझ्या अमृतकुंडाची कीर्ति सागतेस कीं नाही–" माझ्या खाद्यावर जास्तच भार टाकून ती म्हणाली, "या कुंडाच पाणी प्यायल म्हणजे आयुष्यात मनाजोगा जोडीदार मिळतो. लोक म्हणतात. लाब लाबचे लोक इथ येतात अन् कुणाला नकळत चोरून पाणी पिऊन जातात—"

आता मात्र मीं स्वतःला सावरून धरण्याचे साडून दिलें. लिलीनेंहि पण विरोध केला नाहीं. अंधार दाटू लागला होता तरी तिच्या डोळ्यातील ओसडणारें समाधानाचें तेज मला स्पष्ट दिसलें.

पण दुसऱ्याच क्षणीं मी अस्वस्थ झालों. आमच्या लग्नाला वडील माणसांची परवानगी कशी मिळेल ? आईला हे पटेल ?

आम्ही अंधारात घरीं परत आलों. घर जवळ आल्यावर लिलेनें माझा हात सोडला व ती जरा अंतर ठेऊन चालू लागली. त्या दिवशीं रात्रीं दिव्याच्या उजेडात तिन माझ्याकडे डोळा वर करून पाहिलें नाहीं.

—आठ दिवस मीं लिलीच्या सहवासात काढले लिलीला माझ्या बरोबर पाठविण्याची मावशीची तयारी होती पण लिलीचा दादा मुबईहून आला, आणि त्यानें तिला मुबईला नेलें कशाला काय तें मला कळलें नाहीं. मुबईहून परत आल्यावर लिलीला पुण्याला पाठवून देण्याचें मावशीनें कबूल केलें.

—लीला आमच्या घरीं कधींच आली नाहीं. नतर महिन्यानें कळलें कीं मुबईला तिचें लग्न झालें. आम्हांला पत्र आलें नाहीं. आमच्यापैकीं कुणी लग्नाला गेलें नाहीं. खुद्द लिलेचे पत्र लग्न झाल्यावर आठ दिवसानीं आलें

तेव्हा मला समजले. तिच्या पत्रातलें एक वाक्य मला विसरता आल नाहीं.
" पुन्हा केव्हा तरी भेटेनच भेटेन– "

—सहा वर्षांनी ती मला पुण्याला भेटली. मावशी तिला घेऊन आमच्या घरीं आली. माझं लग्न होऊन दोन महिने झाले होते रत्ना नाहीं. दुसरीच एक. लीला वचनाप्रमाणें मला भेटली खरी, पण मी तिच्या किडकिडीत देह-यष्टीकडे पाहू शकलो नाहीं. लीलेचें त्यावेळचे मादक सौंदर्य मातीला मिळालें होतें.

तिच्या गळ्यावर आता हजारों रेषा उमटल्या होत्या अन् त्यामुळें ती अकालीं म्हातारी दिसत होती तिची भरदार छाती आता खोल गेली होती तिचे पूर्वीचे लाल ओठ, फिके, निस्तेज झाले होते तिच्या तोंडावर कळा उरली नव्हती तिच्या पाठीला पोंक आलें होते, तिचा आवाज पूर्वीप्रमाणें छनछनत असला तरी तो कानाला गोड वाटत नव्हता लीला अजून सौभाग्यवती होती, पण नवरा जिवत असलेली विधवा म्हणून ती मावशीच्या घरीं पळून आली होती सहा वर्षे तिनें नवऱ्याचा जाच सहन केला आता तिची सहनशक्ति सुटली होती.

लीलेला विरोध करण्याचें त्यावेळीं धैर्य झालें नाहीं. मीहिपण प्रवाहाच्या विरुद्ध पोहोण्याचे धाडस दाखविले नाहीं. बिचाऱ्या लीलेला जिवंतपणीं नरकवास सोसावा लागला.

तिचा नवरा व्यसनी नव्हता. तो दुष्ट होता, लहरी होता आणि कमालीचा अहमन्य होता. त्याच्या आत्यंतिक लहरीपणात वेडाची झाक मारीत असे. जरा कुठें विरोध दिसला की तो बेफाम होई, तोंडाला येईल तें अद्वातद्वा बोलून घेई आणि डोक्यात राख घालून मारायला उठे. संसारात पतिपत्नीचे खटके नेहमींच उडतात. ते जितक्या सहजतेने निर्माण होतात तितक्या लीलेनें नाहींसे होतात

घरात इतर माणसें असलीं म्हणजे एकप्रकारचा बाध असतो. पण लिलीचा नवरा एकटा होता. म्हणूनच मावशीला आवडला. आणि त्याच कारणानें लिलीच्या जन्माचें वाटोळें झालें.

लग्नानंतर त्याच्या त्या वेडाची ओळख लिलीला पहिल्या पधर-

बड्यांतच आली. तो म्हणाला, बाहेर चल ती म्हणाली, आज नको उद्या. एवढ्या क्षुल्लक कारणावरून स्वारी भडकली त्यानें बेताल होऊन तिच्या तोंडात मारली. तेव्हा तीही हट्टास पेटली. रागाने तो अगावरचा सदरा फाडू लागला. तेव्हा लिलीला धक्का बसला. त्यानंतर लिली आपण होऊन त्याच्या वाटेस गेली नाहीं. पण तोच काहींतरी कारण उपसून काढी आणि बेफाम होई ती लहर गेली म्हणजे ठीक असे. पण या वेडाची लहर दिवसें दिवस वाढतच गेली त्याला एखाद्या डॉक्टरकडे जाण्याचा आग्रह लिलीनें केला म्हणजे तो म्हणे मला काय झाल आहे ? या मुद्यावरून पुन्हां तो चिरडीस जाई.

या वेड्याच्या लाथा खाऊन लिली हताश झाली होती. सुदैव, अशात तिला मूल झाले नाहीं पण हाल सोसण्याची मर्यादा तिनें गाठली होती. रात्रीं, अपरात्रीं तो वेडा गार पाण्याने तिला ओलीचिंब करून सोडी ! एकादे वेळीं रस्त्यावर हाकलून देई आपण काय करीत आहों याची त्याला जाणीव राहिली नाहीं लिलीच्या दोघातिघा भावांनीं मध्यस्ती केली. त्याला खूप उपदेश केला पण काहीं उपयोग झाला नाहीं. झालाच तर उल्ट झाला. बायको भावाना जवळ करते आणि पतिव्रता धर्माला बट्टा आणते हा त्या मूर्खानें तिच्यावर आरोप केला. काय लागेल तें.

एक महिन्यापूर्वीं त्यानें नोकरी सोडून दिली. पत्नीच्या रागावर. ‘ मीं मिळवून आणलें नाहीं तर तू कशी जगशील तें पहातों ’ या हट्टाला तो पेटला. ती चिडून जुलरला आईकडे आली.

माझ्या आईला हें सर्व सांगावें आणि तिच्यामार्फत लिलीच्या नवऱ्याची समजूत काढावी ह्या उद्देशानें मावशी माझ्या आईकडे आली तिचें म्हणणें बरोबर होतें. नवरा जिवत असतां, बायकोनें दूर कसें राहावें ? पण लिलीचेंही म्हणणें तितकेंच रास्त होतें ती म्हणे, त्यापेक्षा आईनें मुलीला आडात ढकलून दिलेलें काय वाईट ? माझ्या आईला अतिशय वाईट वाटले. पण ती तरी काय करणार ? हा पेंच बिनतोड होता, एका शिकलेल्या वेड्याशीं गाठ होती.

लिली नवऱ्याच्या तावडींत सापडावयास तयार नव्हती. तिनें मला स्वच्छ सांगितल कीं "वाटलें तर गळ्यांतल मंगळसूत्र तोडून देते, कुंकू पुसून टाकतें. मी जिवत नवऱ्याची बायको आहे ही आठवण मला कुणी देऊ नका. मी पुण्याला तुमच्या आश्रयाला राहीन. मॅट्रीक झालें आहे, पुढें शिकेन. नोकरी करून तुमच्या उपकाराचें ऋण फेडीन पण मला आता आई नको, भाऊ नको, बहीण नको—कुण्णी कुण्णी नको. जुन्नरला आईजवळ राहिलें तर मला वेड लागेल. अमृतकुंड आठवतय् ! "

मीं मानेनेंच होकार दिला—!

तिच्या डोळ्यातून पाणी वाहू लागलें.

• • •

# शैतान

## २

कचऱ्याच्या उतूं जाणाऱ्या पेटीशेजारीं गटार होतें. त्या गटारांत एक नुकतेंच जन्मलेलें मूल कपड्यानें गुडाळलेल्या स्थितींत पडलेलें होतें. भोंवतीं तमासगिराची ही गर्दी उसळली होती.

" जिवत आहे का हो ? "

" अरे, अरे ! कुणा चांडळणीला ही दुर्बुद्धि झाली ? "

" बया ऽऽ ! पटकी आली तिला ! प्वार अक्षी नहानं हाये वो ! "

" बाबू, काय पाह्यचं आहे तिथं ? घरीं चल पाहू — लहान मुलांनीं असल काहीं पाहू नये — "

" अरे हाड ! त्या कुत्र्याला एक धोंडा मारा हो — "

" नमः शिवाय ! नमः शिवाय ! जेहेत्ते याला कलियुग म्हणतात. बुद्धिभ्रष्टतेचा हा परिपाक आहे. "

सोलापूरला बाळ्याच्या वेशीजवळ ही कचऱ्याची पेटी आहे. रोज सकाळीं रस्ता झाडणारी बाई आजूबाजूचा कचरा गोळा करून आणते आणि त्या पेटींत भरून ठेवते. भोंवतालचीं माणसें यथाशक्ति ह्या कचऱ्यात भर टाकतात. पेटी भरून जाते आणि कचरा रस्त्यावर पसरतो.

कोणी तिकडे वळून देखील पाहत नसे. पण आज त्या स्थानाला अवचित महत्त्व आलें होतें. त्या कचरा पेटीला ज्याच्यामुळें एवढें स्थान-महात्म्य प्राप्त झालें, तो जीव मात्र मळक्या चिंध्याच्या गाठोड्यांत शांतपणें

पडला होता. अजून धुगधुगी असल्याची जाणीव मधूनमधून तो विव्हळून देत असे एकाही बाईनें त्याला उचलून घेतलें नाहीं. एका देखील पुरुषाला औदार्याची कल्पनाहि शिवली नाहीं.

रस्ता झाडणारी बाई बिचारी दूर बसली होती फुटकें घमेले आणि झिजलेला खराटा या दोन वस्तूवर दृष्टि केंद्रित करून ती स्वतःशीच विचार करीत होती. पोरगा दिसायला चांगला होता. कुणाचा का असेना, आपण उचलून घ्यावा, वाढवावा असें तिला मनापासून वाटत होतें तिच्या रागड्या डोक्यात पापाची कल्पना औषधालाहि वास करीत नव्हती पण ती तरी काय करणार ? स्वतःचीं चार मुलें तिच्या घरात खादीला होतीं.

तुळजापूरच्या वाटेनें एक मोटार मागच्या बाजूनें धूळीचे लोट उठवीत येतांना तिला दिसली.

ड्रायव्हरनें तडकाफडकी ब्रेक दाबले. कर्कश आवाज हवेंत दुमदुमला—आणि गाडी उभी राहिली.

एक घाऱ्या डोळ्यांचा, उचापुरा मनुष्य गाडींतून बाहेर आला. पोषाखावरून त्याची जात उघड होती. त्यानें सर्व प्रकार डोळयानें पाहिला, लोकांकडून मिळालेली माहिती ऐकून घेतली आणि ड्रायव्हरला खूण केली. नरो वा कुजरो वा अशा आविर्भावानें तें गटारांत पडलेले गाठोडें ड्रायव्हरनें उचलून घेतले आणि मोटारींत मागच्या बाजूस आणून ठेवलें. पोंगा वाजला आणि निमिषार्धात गाडी तुळजापूरच्या दिशेनें धावू लागली फुटकें घमेलें काखोटीला मारून झाडूवाली ताडकन् उठून उभी राहिली आणि मोटरीच्या दिशेनें दोनचार पावलें टाकून मोठ्यानें ओरडली, " अवो, त्यो मुसुलमान हाये, त्येच्याकड कशापायीं लेकराला जाऊं देता वं ? " आणि इतकें बोलून रस्त्यातच ती कपाळाला हात लावून मटकन् खालीं बसली. फार जीव पुटपुटला—पण ती तरी काय करणार ?

अहमदला आपल्या जन्माची हकीकत वयाच्या पधराव्या वर्षी प्रथम समजली, तेव्हां त्याला अतिशय वाईट वाटलें.

बापाचा पत्ता नाहीं, आईनें अंब्याचीं टरफलें मानून आपल्याला

कचऱ्याच्या पेटींत फेकून दिलें. खानसाहेबानीं आपल्याला त्या वेळीं जवळ केलें नसते, तर आपण मेलों असतों.

आपल्याला जात नाहीं, गोत नाहीं, धर्म नाहीं. आगापिछा नाहीं, कशाला आपल्याला या लोकानीं जगवलें ? उपकारकर्त्याविषयीं असा कृतघ्नपणाचा विचार डोक्यात आणणे चांगले नाहीं हे जाणून देखील त्यानें मरणाच्या दारात पडलेल्या खानसाहेबांना म्हटलें, " चचाजान, बिलकूल चूक केलीत तुम्हीं ! तुम्हाला स्वत.चे दोन लडके असतांना मला कशाला घेऊन आलात ? "

पिकलेल्या दाढींतून वाळलेलीं बोटें फिरवीत खानसाहेब खोल आवा जात म्हणाले, " बेटा, अल्लाची कुदरत आहे. पाक इस्लामला एक जोड मीं मिळवून द्यावी अशीच त्याची इच्छा असावी—लेकिन डरना नाहीं. कासम आणि रसूल माझ्या मागें तुला खायला प्यायला देतील. मै उनको बोल दूगा— "

कसचे काय आणि कसचें काय ! खानसाहेब गेल्यावर दोघा भावानीं चार महिन्याच्या आत अहंमदला रस्त्यावर आणून उभें केलें. सोळा वर्षांचा पोरगा जाणार कुठें ? करणार काय ?

गाव सोडून जावे असें प्रथम त्याच्या मनात आलें. पण तो विचार कृतींत येण्यापूर्वींच खड्डू पवार त्याला शेताच्या बाधावर भेटला. दोन महिन्यापूर्वींच खड्डू सोलापूरला जाऊन आपली कारभारीण घेऊन आला होता. खंड्डू फार तर वीस, एकवीस वर्षांचा असेल. त्याच्या पत्नीला ' जाणतेपण ' आलें नसल्यामुळें ती सोलापूरला माहेरींच इतके दिवस राहात असे. आता सासऱ्याच्या निरोपावरून त्याने तिला आपल्या घरीं आणलें होतें. खड्डूचा बाप दोन वर्षांपूर्वींच वारला होता. आई अजून होती, पण डोळ्यांत वडस वाढल्यामुळें तिचा शेतीच्या कामाला प्रत्यक्ष असा फारसा उपयोग होत नव्हता.

खंड्डूला एक मनुष्य हाताखालीं पाहिजे होता, आणि तो स्वस्तांत मिळाला तर पाहिजे होता ! त्याची खूप तारांबळ उडाली होती. शेताकडे पाहायला पाहिजे, पण सारें लक्ष घराकडे लागलेलें असे. जवानीची मस्ती

त्याला निर्वेधपणे शेतात खपू देईना. चोरट्या क्षणाची गोडी त्याला जास्तच अधीर करून सोडू लागली. म्हातारी आई त्याला शेतावर भाकरी पोहोचवायला गेली कीं तो मनांतल्या मनात चिडून जाई. बायको आली म्हणजे त्याच्या जिवाची जास्तच काहिली होई ! चोरट्या सहवासानें जिवाला थडोसा मिळण्यापेक्षा डोक्याला गरमाई फार करते हें पाहून तो अस्वस्थ झाला होता. यतून अशा रीतीने आपली सुटका होणार हें पाहतांच त्याला अत्यत आनद झाला !

अहमदला त्याने आग्रहाने आपल्याकडे ठेवून घेतलें.

घरात वरकाम आणि शेतावर पडेल ते काम करण्याच्या बोलीनें अहमद खंडूच्या घरीं राहिला.

—सुमारें दोन वर्षे वगण घातलेल्या चाकाप्रमाणें ही व्यवस्था कुरकुर न होता चालली. घरात खालच्या मानेने अहमद वागला. त्यानें खडूला अग झाडून मदत केली. सुगीच्या दिवसात खडू गाड्या भरून तालुक्याच्या गांवीं गेला तर घरात काय हवे—नको ते पाहण्याचें काम अहमद पाहत असे. खडूला एकादें वेळीं जाववले नाही तर अहमद गाडी भरून नेई. इतके दिवस गांवातला होता, पण गेल्या दोन वर्षांत अहंमद त्याच्या घरातचा झाला

एक दिवस उगवला त्या दिवशीं खडूची बायको मागच्या परड्यांत पडक्या भिंताडाच्या आडोशाला दुपारची नहात होती. म्हातारी ओसरीला फाटकें पोतें उशाला घेऊन लवडली होती. खंडू शेतावर होता. आणि त्यानेंच अहमदला घरून कुऱ्हाड आणायला पाठवलें होतें. सध्याकाळीं सरपणासाठीं काटक्या तोडून आणायचा त्याचा बेत होता.

घरात हुडकले, पण कुऱ्हाड गवसेना म्हणून अहमद मागच्या परड्यांत गेला. त्यानें परड्यात पाऊल टाकायला आणि खडूची बायको विवस्त्र स्थितींत ओलेत्यानें उठून उभी राह्यला एक गाठ पडली !

भिंतीवर ठेवलेलें कोरडें लुगडें घेण्यासाठीं ती पाठमोरी उभी असल्या-मुळें अहमदला तिच्याकडे त्या स्थितींत डोळे भरून पाह्यला मिळालें. विजेचा लोळ अगाला चाटून जावा असें त्याला झालें. खडूची बायको

चारपाच महिन्यांनीं पोटीशीं असल्यामुळें तर तिच्या देहावर विलक्षण कांति आली होती. सर्व अवयव पुष्ट झाले होते. तिचे दोन्ही लाबसडक मांसल बाहू जोगवल्यासारखे झाले होते सबंध पाठाड भरून आले होतें. नितंब घोटीव दिसत होते—आणि सूर्याच्या उन्हामुळे तिच्या अंगावरून निथळणारें पाणी चमकत होतें. त्यामुळें तर त्या देहाची शोभा जास्तच खुलून दिसत होती.

अहमद खिळून जागच्या जागीं उभा राहिला ! स्वतःच्या मनाला त्यानें बिलकूल आवरून धरलें नाहीं. हें सुख आपल्या नशिबीं या जन्मीं नाहीं हें त्याला स्वच्छ समजत होतें. अनिमिष नेत्रांनीं त्यानें तें विलोभनीय दृश्य आधाशाप्रमाणे पाहून घेतले. खडूची बायको अजून पाठमोरी उभी होती. तिला कसलीच कल्पना नसल्यामुळें ती सथपणानें लुगडें उलगडूं लागली. मध्येंच लुगडें बाजूला ठेवून तिने केसाचें पाणी दोन्हीं हातांनीं झटकून टाकलें.

असली एकही औरत आपल्याला मिळायची नाहीं. पाक मुस्लिम आपल्याला जवळ करणार नाहीं आणि हिंदूच्या घरात आहे यापेक्षा जास्त अधिकार आपल्याला कसा मिळणार ! आपल्या नशिबीं हें सुख नाहीं. इष्काचें सुख नाहीं, मग— ?

आणि इतक्यात खडूची बायको कोरडें वस्त्र गुडाळून आंत येण्यासाठीं वळली. अहंमद शुद्धीवर आला. गुंडाळलेल्या वस्त्राआड दडलेल्या वक्षस्थळाचें वैभव चोरट्या नजरेनें धुंडाळीत तो कुऱ्हाड पाहण्यासाठीं गडबड करूं लागला. खंडूच्या पत्नीच्या मनात कसलीच शंका नसल्यामुळें ती शांतपणानें घरांत निघून गेली कुऱ्हाड घरातच सांपडली. अहंमदनें कुऱ्हाडीच्या पात्याकडे पाहिलें. तीच—तीच—चमक त्याला त्या समोर उभ्या असलेल्या परीच्या डोळ्यात दिसली. क्षणभर त्याला वाटलें—पण त्याच क्षणीं खडूच्या बायकोनें त्याच्याकडे सहज पाहिलें-आणि अहंमद कुऱ्हाड काखोटीस मारून घराबाहेर पडला.

आठ दिवस त्याला चैन पडलें नाहीं. रोज कांहीं तरी निमित्त काढून तो दुपारचा एकटाच घरीं येऊन जाई. पण ज्या दृश्यासाठीं तो हपापलेला

होता, ते दृश्य पुन्हा त्याला दिसलें नाहीं. रात्रींचा तो ओसरीला एक फाटकें पोतें पसरून पडे. पण खद्ध त्या वेळीं पत्नीशीं जी सलगी दाखवीत असेल, ती अंतःचक्षू पुढें उभी राहतांच त्याच्या तळपायाची आग मस्तकाला जाऊन भिडे !

* * *

—आणि याच सुमारास हैदराबादी गर्जना आसमतात् ऐकू येऊं लागल्या प्रथम प्रथम त्या गर्जना दूर होत्या. एकादा पुसटता प्रतिध्वनी मधून मधून कानावर येई. पण तो लगेच हवेंत विरून जाई. दोनतीन महिने असेच निघून गेले. उस्मानाबाद जिल्ह्यात सर्वत्र शात होतें. लोकांचे नित्याचे व्यवहार यथापूर्ण चालू होते. संध्याकाळीं शिळोप्याच्या गप्पा निघत. कुणी म्हणे हिंद सरकार हैदराबादवर स्वारी करणार आहे. कुणी म्हणे, हैदराबाद संस्थानी कॉंग्रेसच्या ताब्यात जाणार आहे. कुणी काहीं म्हणे, कुणी काहीं म्हणे, कुणाचेंही म्हणणें कुणीही मनावर घेतलें नाहीं.

पण महिन्या दोन महिन्यानीं वातावरण बदललें. हळूंहळूं गांवांतल्या लोकाच्या लक्षात येण्यापूर्वींच तें बदललें. त्याची गती फार जोराची होती.

एके दिवशीं सध्याकाळीं चार सशस्त्र अरब गांवात वस्तीला आले. रात्रभर कासम आणि रसूलच्या वाड्यावर राहिले. आणि दिवस उजाडायच्या आत निघून गेले. आणखी चार दिवस गेले.

नंतर पांचपंचवीस लोक आले. गर्जना करीत आले. आरोळ्या ठोकीत आले. गांवांत रस्त्यानें एक शेतकरी गवताचा भारा डोक्यावर घेऊन घराकडे निघाला होता. त्याच्या डोक्यावरचें गवत हिसकावून नेण्यात आलें. त्याचें मुडासें फेकून देण्यात आलें. त्याची पैरण फाडली गेली. तो बिचारा घाबरून पळाला तो घरात जाऊन दारें लावून लपून बसला !

रात्रभर खानसाहेबाच्या वाड्यांत त्याचा मुक्काम होता. बाहेरच्या लोकांना काहीं कळेचना. अहंमदला इतर लोकाप्रमाणें कुतूहल वाटू लागलें. खाटकाचा पोऱ्या त्याचा दोस्त होता. त्याला त्यानें विचारलें—

हुसन्यानें बोकड मारण्याचा आविर्भाव हातानें दाखवून म्हटलें,

" भाई अहमद ! तुम् तो बिलकूल पागल है ! अरे यार, ये सब लोग आपले बडे दोस्त आहेत. ते म्हणताहेत कीं हैदराबाद तो आपनाहि है–"

अहमद डोक्यावरची वाटोळी टोपी पुढें सारून आश्चर्यानें म्हणाला, " हां ! जरूर वो तो अपनाहि है, मग यांत ताजूबकी बात तूनें क्या कहा ? "

" दीवाने बन गये तुम् ! खंडूके औरतने तुझे दीवाना बनाया है— अरे दोस्त अहमद, ऐसा नहीं मेरा मतलब ये है के आपना हैदराबाद मुस्लीम भाईओंका है ! भाई, खंडूची औरत तुझी झाली पाहिजे असा याचा अर्थ आहे. "

अहमदच्या डोक्यात प्रकाश पडायला आणखी दोन दिवस जावे लागले.

एके दिवशीं सध्याकाळीं खंडूच्या बरोबर तो शेतावरून परत आला आणि बैल बाधणार तोंच नुकत्याच जन्मलेल्या मुलाचें रडणें त्याच्या कानांवर पडलें. खंडूनें अहमदच्या पाठीवर प्रेमाने हात ठेवून म्हटलें, " मुलगा आहे. पैज तुझी माझी."

अहमद बावळट मुद्रा करून त्याच्याकडे पाहातच उभा राहिला ! एकाएकी त्याला खंडूचा हात कुऱ्हाडीनें तोडून टाकावा असें वाटलें. रात्रीं त्याला झोंप आली नाहीं. रात्रीं एक दोन वाजता तो घराबाहेर पडला !

अहमदनें इतस्ततः पाहिलें. आकाशाकडे पाहिलें. मागें राहिलेल्या खंडूच्या घराकडे पाहिलें. सर्वत्र सामसूम होतें. थोडया वेळानें चालताचालता त्यानें मान वर केली. खानसाहेबाच्या वाडयासमोर तो उभा होता. आंतल्या बाजूस अंगणांत गॅसच्या बत्त्या होत्या. त्याचा प्रखर उजेड बाहेरच्या गर्द काळोखाला जास्तच भेसूरपणा आणीत होता. त्याचा दोस्त, खाटकाचा पोरगा दारातच उभा होता. त्यानें अहमदला पहेचानलें, त्यानें अहमदला आंत ओढून घेतलें आणि कानांत सागितलें–, " हमारा जंग शुरु हुवा— तलवारींचा अन् जंबियांचा ढीग येऊन पडला आहे. आपल्या मदतीला एक सौं, दोन सौं, लागेल तितकी आसामी तय्यार आहे. आंत बोलणीं चाललीं आहेत. दिन मुक्रर करणार आहेत. "

आलेली जांभई आवरून धरून अहमद आश्चर्यानें म्हणाला, " कोण लोक आहेत आत — ! "

" रझाकार मर्द आत बसले आहेत आता आपल्याला काय कमी आहे ! शेतीवाडी आपली, पैसा आपला, औरत आपली, साले, दोन दोन जोरू–. एक काय म्हणून—! "

खाटकाच्या पोरानें आणून दिलेला जंबिया दिव्याच्या उजेडांत न्याहळून पहात असता अहमदचे डोळे चमकले. कुऱ्हाडीचें पातें, विवस्त्रबाईच्या डोळ्यातील चमक, जंबियाचा लखलखीतपणा — !

अहमद पहाटेच्या सुमारास घरीं परत आला. बरोबर आणलेला जंबिया त्यानें धान्याच्या कणगींत लपवून ठेवला.

अहमद एके दिवशीं सहज बोलून गेला, "दिवस तर फार वाईट आहेत. तू मावशींना दूर कुठे तरी पोहचवून ये. तूं येईपर्यंत मी बाळाला अन् त्याच्या आईला सभाळतों. अन् एकदोन महिन्यानीं त्यानाही सोलापुरीं घालवून ये. "

खडू मोठ्यानें हसला आणि अहमदच्या पाठीवर थाप मारून म्हणाला, " तूं डरतोस ! आमच्या हिंदू लोकात मिसळून तूही भित्रा झालास वाटतं–! बाकी, तूही हिंदूचाच बच्चा असशील ! कुणी सागावं—!" अहमदनें मोठ्या कष्टानें स्वतःला आवरून धरलें.

—वैऱ्याची रात्र एके दिवशीं तांडव नृत्य करूं लागली. रात्रीं एक दीडच्या सुमारास आग लागली म्हणून एकाएकी ओरड झाली. जनावरांसाठीं साठवून ठेवलेल्या कडब्याला प्रथम आग लागली. लोक सैरावैरा धावू लागले. ' मारो ' – ' काटो — ' या आरोळ्यांनीं वातावरण दुमदुमून गेलें. एकाएकी अनोळखी माणसाची गर्दी वाढू लागली. लोक आग विझविण्यात दंग होते. तेवढ्यात हें नवीन संकट काय आलें तें पाहण्यासाठीं माणसें गटागटानें जमूं लागलीं इतक्यात पलीकडील गल्लींतून कोणीतरी ' मेलों—मेलों ' म्हणून ओरड केली.

आग धुमसत होती पण ती विझवणार कोण ! निवाऱ्याची जागा शोधून काढण्यासाठीं माणसें झोपीं गेलेल्या पोराबाळांना उठवून रस्त्यानें धावत सुटलीं. मुलें रडत होतीं. बायका रडत होत्या. त्यांना गप्प

बसवण्यासाठीं पुरुष माणसें डोळ्यांत पाणी आणून विनवू लागलीं. इकडून रस्ता रोखला आहे असें कुणीतरी सांगताच तो प्रवाह पुन्हा आल्या वाटेनें परतूं लागे.

कोणाचा पायपोस कुणाच्या पायांत राहिला नाहीं. त्यांतून रात्र अंधारी. पेटणाऱ्या घराच्या ज्वाला येवढाच काय तो उजेड. पण तो पाहाण्याची कुणाला छाती होणार— ?

-अहमदनें कणगींत लपवलेला जंबिया बाहेर काढला. गल्लीच्या तोंडाशीं खड्डू हातात कुऱ्हाड घेऊन प्रतिकाराच्या तयारीनें उभा असलेला त्याला अंधुकसा दिसला. अहंमद लपत छपत जवळ गेला.

एक झाप घेऊन अहमदनें खड्डूला जमिनीवर लोळवलें. आणि हातातील जंबिया दूर फेकून त्याच पावलीं धावत घराकडे गेला.

खड्डूची आई त्याला कुठेंच दिसली नाहीं. आणि ती जहान्नममधें गेली असली तरी त्याला काय पर्वा होती ? भुकेल्या डोळ्यांनें तो आतल्या खोलींत जाऊं लागला—!

—आणि रडणाऱ्या मुलाला शांत करण्यासाठीं निशःक मनानें उघडे केलेले स्तन पणतीच्या उजेडांत त्याला दारातून स्पष्ट दिसले. खड्डूची बायको नुकतीच जागी झाली असावी. अजून तिला बाहेर काय गोंधळ उडाला आहे याचा पत्ताही नसावा. पधरा दिवसांची बाळंतीण बाई खोलींतून बाहेर येईल कशाला ?

मुलगा रडू लागला होता. भुकेची जाणीव त्याला झाली होती. आईनें हातांत धरून पुढें केलेले अमृतकुभ अजून त्याला पटकन् तोंडात धरतां येत नव्हते. तोंडापासून स्तन दूर झाला कीं तो आकांत मांडी. पुढें वाकून आई त्याला दुधाचा साठा कुठें आहे तें दाखवून देण्यांत गर्क होती.

—हें दृश्य पाहतांच अहंमद दारातच ताठ उभा राहिला ! कां कुणास ठाऊक ता निश्चल उभा राहिला ! आपल्या तोंडचें दूध असेंच कुणीतरी तोडलें असेल ! पण म्हणून आपण दुसऱ्या एकाद्या मुलाचें दूध तोडावें ? छट् ! कभी नहीं !

मुलाचें दूध तोडण्याची कल्पना त्याला सहन होईना. मुलाचें दूध पिणें

होईपर्यंत आपण धीर धरला पाहिजे या विचारानें तो तसाच पाय न वाजवतां माघारीं वळला ! दहा पांच मिनिटांनीं काय होणार आहे—?

तो बाहेर आला ! रस्त्यावर लोकांची गर्दी वाढल्याचें त्याला दिसून आलें. आरडाओरडा करीत लोक त्याच्या घराकडे येऊ लागले असावे ! छेः छेः ! बाळाचें दूध पिणें होईपर्यंत एकालाहि येऊं देता कामा नये.

विचारासरशीं तो रस्त्यावर आला. अंधारांत अवचितपणें त्याच्यावर दहा बारा जण तुटून पडले. 'मारो' 'मारो'—या आरोळ्यांनीं त्याचे कान बधिर झाले. लोकाची गैरसमजूत झाली असावी, खड्डू म्हणून त्यांनीं आपल्याला लोळवलें असावें हें निमिषार्धात त्याच्या लक्षांत आलें. पण त्याच्या तोंडून एक अक्षर बाहेर पडलें नाहीं. आणि जरी बाहेर पडलें असतें तरी ऐकून घेण्याच्या स्थितींत कुणी होतें का—?

दहाबारा जणांनीं त्याला बेशुद्ध होईपर्यंत चोपला, लाथाडला, बुकलला. अखेरीस तो मेला असावा अशा समजुतीनें ते मवाली पुढें निघून गेले.

थोड्या वेळानें अहंमदनें डोळे उघडले. त्यानें उठण्याचा प्रयत्न केला—पण त्याच्या छातींत विलक्षण जोरानें कळ आली. एक रक्ताची गुळणी तोंडावाटें बाहेर आली—आणि त्यानें डोळे मिटले.

अर्धवट ग्लानींत त्याला एक परी दिसू लागली. आणि पहाता पहातां तिनें आपलीं वस्त्रें फेकून दिलीं. त्या परीचें तोंड त्याच्या परिचयाचें त्याला भासलें. पण कुणाचें तें त्याला आठवेना. नतर एक बाजलें आणि त्यावर बसलेली एक बाई दिसू लागली. ती बाईही त्याला ओळखीची वाटूं लागली. तिचे स्तन उघडे होते. एक मूल तें धरण्यासाठीं पुढें झालें. त्या मुलाचा चेहेरा त्याला स्पष्ट दिसला. त्याचाच चेहेरा होता तो. समाधानानें त्यानें तोंड पुढें केलें—आणि अवसान न राहून तो तोंडावर पडला !

एकच विचार त्याच्या डोक्यात चमकून गेला. अल्लानें आपलें दूध तोडलें—पण आपण एका लेकराचें दूध तोडलें नाहीं. बस्स् ! पुढें काहीं का होईना !

● ● ●

# बहेन !

३

शमसुद्दीन हा आमचा दूधवाला. पाचसहा म्हशी त्याच्याजवळ नेहमी असावयाच्या, आणि त्या साऱ्या म्हशी बहुतेक दिल्लीच्या असावयाच्या. तालुक्याच्या गांवीं आठवड्याचा बाजार भरे तेथें हलवायाच्या कामासाठीं त्या दुधाचा उपयोग होई.

शमसुद्दिनानें दात कोरण्याची अनुदार वृत्ति कधींही दाखवली नाहीं. गांवात अडीअडचणीला कुणी दूध मागितलें तर त्यानें उदारपणानें दूध पुरवलें. मापाचें भांडें तर वाहून जाईच शिवाय धार म्हणून अर्धी वाटी दूध त्याच्या हातून सुटावयाचेंच ! आणि सर्वांत मौज ही कीं रोख पैशा-साठीं तो कधींहि अडून बसला नाहीं.

आमच्या गावांत एकदर चार मुसलमानाचीं घरें—त्यांत पहिलें मानाचें स्थान शमसुद्दिनाच्या घरानें पटकावलें होतें.

मनाचा तो उदार होता यात शकाच नाहीं. गावातलीं सारीं बेवारशीं मांजरें धारेच्या वेळीं त्याच्या अगणात गोळा होत विशेष सणासुदीचा दिवस असेल तर ओशट मिळण्याच्या आशेनें कुत्रीं त्याच्या घराभोंवतीं घिरट्या घालूं लागत. एकाही प्राण्याला शमसुद्दिनानें दगड मारून घालवून दिलें नाहीं.

आमचें घर अगदीं त्याच्या घरासमोर होतें.—

त्याचीं मुलें आमच्या मुलांत खेळायला हमेश यायचीं. आमचीं मुलें

त्याच्या मुलात खेळायला जायची. मुलांची भांडणें समुद्राच्या भरती-ओहोटीप्रमाणें नित्यनियमानें चालू असावयाची. पण तटाबखेडा झाल्याचे कुणाच्या ऐकिवांत नाहीं. त्यांनीं आपल्या पोराना चापावे आणि आम्हीं आमच्या पोराना दरडवावें—असें चालें.

सहा वर्षांचा एवढा मोठा संहार बाहेरच्या जगांत चालू होता. आम्हीं वर्तमानपत्रांतून प्रत्यहि वाचत होतों. त्यावर निर्विकार मनानें आपसांत चर्चा करीत होतों. पण आमच्या गावातली चिमणी देखील भेदरली नाहीं.

खालसा मुलखात अन्नधान्य, कापड इत्यादि नित्योपयोगी वस्तूंवर नियंत्रणें बसल्याचे ऐकून आम्हीं पोट धरधरून हसू लागलों माणसानें तोलून मापून जेवायचें ही कल्पनाच आम्हाला खुळेपणाची वाटली. माणसानें दहा वार कापड वर्षभर पुरवावें हा नियम आम्हाला हास्यास्पद वाटला !

मी म्हणावें, "शमसुद्दीन ! आपली निजामी जनता किती सुखी आहे नाहीं ? साखर थोडी महागली आहे म्हणून नाहींतर रोज बासुंदी अन् श्रीखंड करावें एवढी सुबत्ता अजून आपल्यात आहे."

शमसुद्दीन दाढीचें टोक मुठींत धरून म्हणे, "जी हां ! राजाराजाचा तटा. त्यानीं फैसला करून घ्यावा !-प्रजेला का हकनाक जुलूम जबरदस्ती!"

धान्याचा प्रश्न आमच्यापुढें कधींही 'आ' वासून उभा राहिला नाहीं. शेतात भरपूर पिकत असे. खायला बक्कळ मिळे. दुधातुपाची चंगळ असे.

ते दिवस आमचे फार सुखाचे अति समाधानाचे गेले. एका दिवाळींतला प्रसंग मला आठवतो आहे ! युरोपातील लढाई संपून एक वर्ष लोटलें होतें. मुंबईहून माझा एक मावसभाऊ दिवाळीसाठीं मुद्दाम आमच्या गांवीं आला होता. माझ्या आग्रहावरून त्यानें पत्नीला आणि आपल्या दोन मुलांना बरोबर आणले होते. बोलता बोलता गोष्टी निघाल्या. तो म्हणाला—"तात्या, कांहीं म्हण पण आपण तर बुवा बायका-मुलांना बरोबर आणायला भीत होतों —"

"तें कांरे, बाबा !" मी आश्चर्यचकित होऊन म्हणालों.

चटकन् त्याचें उत्तर आलें, " आला हजरतांचा मुलूख आहे तुमचा ! संस्थानचा भरंवसा कुणी द्यावा ? " मी टोमणा देण्याचे हेतूनें म्हणालों, " अन् तुमच्या मुलखाचा तरी भरंवसा आहे का ? मुंबईत काय चालूं आहे ? भरदिवसां एकमेकांचे गळे कापले जातात तो मुलूख भरवशाचा अन् जिथें झाडाच पान देखील हालत नाहीं त्या मुलखाची तुम्हाला भीति ! गुरु आहांत झालं ! "

माझा मावसभाऊ शांतपणानें ऐकून घेत होता. अरबी भाषेतील सुरस गोष्टी याहून चमत्कारिक कशा असतील अशा भावनेनें तो आमचे खुलासे ऐकून घेऊं लागला. चार दिवसांनीं त्याची खात्री झाली.

भाऊबिजेच्या दिवशीं माझ्या पत्नीला ओवाळणी घालण्याचा त्याचा विचार होता. हें कळल्यावर माझी पत्नी खुशींत येऊन मला म्हणाली, " भाऊजींना कांहीं तरी गोड धोड करायला हवं— "

" अन् ओवाळणी घालणार नसेल तर ज्वारीची भाकरी का ?— " मी चेष्टेनें हंसून म्हणालों.

" इश्श ! तुमचं कांहीं तरीच, मी म्हणतें रामला पाठवून शमसुद्दीन-कडून थोडस जास्ती दूध आणाव. "

" छान ! ओवाळणी तुला अन् भुर्दंड मला ! "

राम माझा थोरला मुलगा. असेल सुमारें अकरा, बारा वर्षांचा ! शम-सुद्दीन घरीं आहे का म्हणून पाहण्यासाठीं मीं रामला समोर पाठवलें. राम हात हालवीत परत आला !

" बेहेन म्हणाली, उद्या बाजार आहे तालुक्याला ! शमसुद्दीन सकाळींच चरव्या घेऊन गेला आहे– " हा रामचा निरोप ऐकून मी बुचकळ्यांत पडलों. गांवांत इतर ठिकाणीं हुकमी दूध मिळणें कठीण होतें. मी विचा-रांत पडलों हें पाहून राम थोडा वेळ गप्प होता. नतर तो माझें बोट धरून म्हणाला, " तात्या, बहेन विचारीत होती कीं आज इतक दूध कशाला पाहिजे ? "

" मग सागायच होतंस कीं– " मी म्हणालों.

" सांगितल कीं. म्हटल, आमच्या घरीं आज भाऊबीज आहे. आमची

आई पाहुण्याना ओवाळणार आहे अन् मुबईचे मेहेमान आमच्या आईला आज ओवाळणी घालणार आहेत. तशी बहेन म्हणाली, ओवाळायचं म्हणजे काय रे ? मीं तिला खूप समजावून सागितल. पण तिच्या कांहीं लक्षात येईना. तात्या, त्यांच्या लोकांत का ओवाळीत नाहींत— ? ”

“ पद्धत नाहीं. सगळ्या धर्मांच्या चालीरीति सारख्या नसतात. बरं पण पुढें काय म्हणाली बहेन—?”

राम माझ्या हाताचा झोका करून म्हणाला, “ तात्या, ती आज रात्रीं मला ओवाळणार आहे ”

मी आश्चर्यानें म्हणालो, “ बहेन तुला ओवाळणार आहे ? चेष्टा केली असेल तिन—”

पण राम आवेशानें म्हणाला,

“ नाहीं. चेष्टा नाहीं. मीं तिला सगळ सांगितल आहे. ती म्हणाली, माझा एक छोटाभाई होता. अगदीं तुझ्यासारखा. तुला पाहिल म्हणजे मला त्याची याद येते. म्हणून स्वतःचा भाई समजून बहेन मला आज ओवाळणार आहे—जाऊ मी तिच्या घरीं—? ”

“ बर, तें सध्याकाळीं पाहूं. पण आता एक काम कर. शमसुद्दिनला सांगणार होतों पण तो घरीं नाहीं. तर तूं बहेनकडून दहा शेर दूध घेऊन ये-”

शमसुद्दीनच्या घरीं त्याच्या जातीरिवाजाप्रमाणें गोष्याची पद्धत होती. पण मुलाना थेटपर्यंत जाण्यास कोण अटकाव करणार? आणि म्हणून दुधाची कामगिरी मीं रामवर सोपवली.

बाजारच्या आदल्या दिवशीं एकदम इतकें दूध मिळणें कठीण होतें. पण बहेननें आमचें अडूं दिलें नाहीं. त्यांची एक म्हैस केव्हाही दूध देणारी होती. पण धार काढणार कोण हा प्रश्न होता. घरांतलें सारें शिल्की दूध तिनें मोजून दिलें. आणखी तीन शेर पाहिजे होतें. बाई घोराची. रामला तिनें अंबोणाचें घमेलें पुढें ठेवण्यास सागितलें-आणि स्वतः धार काढायला बसली. धार काढण्याची तिला संवय नव्हती. पण दुधाची भरपाई तिनें खंडित होऊं दिली नाहीं. रामनें नतर मला सांगितलें कीं, ‘ धार काढल्यावर बराच वेळ नंतर बहेन हाताचीं बोटें दाबून धरीत होती. ’

आपल्या म्हणून मानलेल्या माणसाची तिऱ्हाईतादेखत फजीती होता कामा नये ह्या ईर्षेनें बहेननें आमच्यासाठीं इतकी तसदी घेतली. कौतुक वाटलें मला त्या बाईचे !

आणि रात्रीं दहा वाजतां घरात ओवाळणीचा थाट उडाला.

माझ्या मावस भावानें माझ्या पत्नीला मुबईहून मुद्दाम बरोबर आणलेलें जरीचें पातळ आणि सुरती दहा रुपये ओवाळणी म्हणून घातले. बायको खूष–मुली खूष. सर्वत्र आनंदी आनद होता !

आणि सकाळची आठवण होऊन मी चपापलों ! रामला बहेन ओवाळणार होती ही गोष्ट मी अजिबात विसरत होतों ! छे ! परधर्मीय असली तरी ती स्त्री आहे ! बहिणीन भावाला ओवाळण्याची इच्छा प्रदर्शित केली तर आपण का आड यावें ? बहीण भावाचें पवित्र नातें जगातील सर्व धर्मांना मान्य आहे.

रामला मीं हाक मारली, घरातून निरजन, ताम्हन, घेऊन यायला मीं त्याला सागितले. माझा बेत ऐकून तोंडाला पदर लावून पत्नी हसत म्हणाली, "इश्य ! मुसलमानाच्या बायका का कधीं ओवाळीत असतात ?"

पण पत्नीचे हे उद्‌गार मीं मनांवर घेण्याचें नाकारलें.

माझा खुळचटपणा पत्नीनें श्रोतृवृंदाला रगवून सागायला प्रारभ केलेला पाहून मी घराबाहेर पडलों.—आणि खरोखरच बहेन रामची वाट पहात होती. प्रथम मी बाहेर उभा होतों. नतर रामनें मला आत बोलावून नेलें. बहेननें गोषा दूर केला होता. आज प्रथमच तिचा चेहेरा मला पाह्यला मिळाला होता. बहेन तशी दिसायला अगदीं सामान्य होती.

मी दबकत दबकत पुढें झालों पण मला पाहून बहेननें चटकन् हांतरी झटकली आणि तीवर एक घोंगडें टाकलें.

"या बसा. रामला विचारल, अम्माजान आल्या का ? पण त्यानं सागितलं तुम्ही खुद्द आलांत." ती हसून म्हणाली.

खोटेंच मी म्हणालों, "घरात माणसांचीं जेवण चालू आहेत. तिला वेळ नव्हता म्हणून मी आलों—"

"बेश झाल. हरगीज नाहीं. हें काय करायच असतं तें सांगायला

कोणीतरी घायलाच पाहिजे होतं—आमच्या लोकात हें असल कांहीं नसतं–" दिल्लगीच्या सुरात ती म्हणाली.

मीं तिला सर्व कांहीं समजावून सांगितलें. निरांजन लावून दिलें. ताम्हनांत कुंकवाची कोयरी होतीच—आणि सुपारी, अक्षदाहि होत्या. या सर्व वस्तूंचा उपयोग कसा करावयाचा हे तिनें लक्षपूर्वक ऐकून घेतलें. ताम्हन हातात धरून कसें फिरवायचें ह्याची एकदोन वेळां रंगीत तालीम झाली–आणि बहेन एकदम गभीर मुद्रा करून म्हणाली, " तात्या, हें अम ताट फिरवल्यान काय होत—? "

तिची चूक सुधारून मी म्हणालों, " त्याला ताट म्हणत नाहींत, ताम्हन म्हणतात. भावाला ओवाळल्यान त्याचं आयुष्य वाढत अशी आमच्यात समजूत आहे. फार पवित्र कल्पना आहे ही. भाऊ नसेल अशी आमच्यातली दुर्दैवी स्त्री आजच्या दिवशीं चंद्राला तरी ओवाळल्यावाचून रहात नाहीं. चंद्राला ती आपला भाऊ मानते—"

आश्चर्यानें ती डोळे मोठे करून म्हणाली, " सच ! कितीं मिठी कल्पना आहे ! चाद हा आपला भाई—"

आणि लगेच खालच्या सुरात ती म्हणाली, " माझा करीम देखील चांदसारखा गोड होता खुदाला मानवलं नाहीं—" स्वतःशींच ती बोलून गेली. लगेच तिनें स्वतःला सावरून धरलें—

रामला तिनें ओवाळलें, रामने तिच्या हातांतील ताम्हनात रुपाया टाकला-आणि त्याच रुपयावर पाण्याचा एक थेंब पडला. मी चमकून बहेनच्या तोंडाकडे पाहिलें—रुपायावर पडलेल्या थेंबासारखे मोती तिच्या डोळ्यांच्या शिंपल्यांतून ओघळत होते–

आणि पुढच्या दिवाळीला हें सारें स्वप्न ठरलें ! दिवाळी कसची आणि काय कसचें ?

दिवाळीच्या आधीं कांहीं दिवस चार पाच नवीन माणसें गावात हिंडून गेलीं. हे धिप्पाड जवान होते. काळे कभिन्न राक्षस दिसत होते. डोक्यावरचे केंस लाब लाब वाढवलेले होते. दाढ्यांची गुतावळ अस्ताव्यस्तपणें छाताडावर लोळत होती. प्रत्येकाच्या खांद्यावर बंदूक होती आणि कमरेला

तलवार होती. शिवाय कमरेला बांधलेले चार चार जंबिये खोवलेले दिसत होते. त्यांचें तें अक्राळ विक्राळ रूप पाहून बायकामुलें भेदरून गेलीं. मौलवी साहेब त्यांतल्या त्यांत सुशिक्षित होते. त्याना गाठून मी म्हणालों, " कुछ गडबड मालूम होता है गांवमे ? "

आणि माझी भीति मीं त्यांना सांगितली. पण मौलवीसाहेब मान हलवून म्हणाले, " कुछ् नहीं, तात्यासाहेब, लेकिन मै तलास करूगा. जरा शमसुद्दीनको बोल देना. मै उसको मिलना चाहता हूं-"

ते सशस्त्र अरब डोळ्यानें पाहिल्यावर माझा धीर सुटला. पळून जावें असें एकदां वाटलें. पण पिढ्यान् पिढ्या ज्या गांवांत काढल्या तो गाव सोडणें मनाला पटेना. आणि अजूनहि धीर वाटत होता, कीं गावची परधर्मीय मंडळी आमच्यावर उलटायची नाहीं.

आमचीं शेतें ते पिकवीत होते. आमचें अन्न ते खात होते. आमच्या अंगणांत पाऊल टाकतांना देखील त्यांची मान खालीं असे. रागाच्या सपाट्यांत कांहीं बोललों तरी मुकाट्यानें ऐकून घेण्याची त्यांची आजवरची वहिवाट होती. " हम तुम्हारे बच्चे है ! " म्हणून अनेकवार आमच्या पायां ते पडले आहेत.

पण काळानें डाव उलटा टाकला. बाहेरचीं माणसें, आजवर कधींही दृष्टींस न पडलेलीं माणसें गांवांत सर्रास हिंडूं लागलीं. त्याच्याशीं बोलण्याची सोय उरली नाहीं. त्यांच्या हातांत शस्त्रें होतीं. आणि शस्त्रांचा उपयोग करण्यास ते केव्हांही तयार होते.

हळूहळू सहन करण्याच्या पलीकडे गोष्टी गेल्या ! खंडू जामदाड्याचे बैल परागदा झाले. भिकू सावंताची मोट नाहींशी झाली. गेनू चौधरीच्या मळ्यातील उभीं पिकें पायाखालीं तुडवलीं गेलीं. आतां गप तरी कोठवर बसणार ? मनाचा हिय्या करून आम्हीं दोघातिघानीं मौलवीसाहेबाला पृच्छा केली.

मौलवीसाहेबांनीं कपाळाला सतराशेंसाठ आठ्या घालून म्हटलें, " बंदोबस्त तो जरूर करना पडेगा ! आदमी है या जानवर ? तात्यासाब, बिलकूल डरना नहीं. खुद मै देख लूगा---"

अखेरीस ठरवलें कीं मुलामाणसासह गांव सोडलेंच पाहिजे.

दिवाळीचा सण दोन दिवसावर येऊन ठेपला होता. विचार केला कीं, दिवाळी घरींच साजरी करावी. फारसा बोभाटा न करतां मुकाट्यानें सण साजरा करावा—आणि भाऊबिजेच्या दुसऱ्या दिवशीं सोलापूरची वाट धरावी. उघड उघड मोटारनें प्रवास करणें धोक्याचें होतें. म्हणून गेनू चौधरीच्या बैलगाडीतून जाण्याचें मुक्रर केलें.

मागच्या वर्षाच्या भाऊबिजेची आठवण झाली. तो दिवस किती शांत होता—आणि आज–?

आज सकाळपासून आकाश अंधारून आलें होतें. सोसाट्याचे वादळी वारे थैमान घालू लागले होते. काल रात्रींपासून परक्या लोकांची बेसुमार आवक जावक सुरू झाली होती. रात्रभर मी जागा होतों. काहींतरी विशेष बाका प्रसंग ओढवणार या चिंतेनें माझ्या डोळ्यास डोळा लागला नाहीं.

भाऊबिजेच्या सणाचा दिवस—पण आम्हाला त्या दिवशीं जेवणही सुचलें नाहीं. पोराना दोन दोन गार पाण्याच्या तांब्यानें अंघोळीं घातल्या. रस्त्यात गर्दी उडाल्यामुळें पाणी आणायला पत्नी घाबरूं लागली. मुलें विचारूं लागलीं कीं हीं माणसें कोण, कुठलीं, कशाकरतां आलीं ? काय सांगणार त्याना– ? अंगावर खेकसून त्यांना चूप बसवलें.

दिवे लागणीच्या सुमारास गांवाच्या पलीकडच्या टोकाला आरडा ओरड झाल्याचें समजलें. अंगावर काटा उभा राहिला.

पत्नीनें मुलांच्या ओवाळण्यासाठीं ताम्हण तयार केलें. ओवाळण्याचा समारंभ कसाबसा उरकून घेतला.–इतक्यांत बाहेरून कुणीतरी हलकेंच हाक मारल्याचा भास झाला.

अंगणात गेलों. पत्नी डोळ्यात पाणी आणून विनवू लागली कीं दार उघडू नका. मीं भीत भीत दार अर्धवट उघडलें.—आणि मला कमालीचें आश्चर्य वाटलें ! दाराला धक्का देऊन बहेन झटकन् आत आली. तिनें आतल्या बाजूनें दार घट्ट लावून घेतलें—आणि दाराला पाठ लावून ती

घाबऱ्या घबऱ्या म्हणाली, " आत्ताच्या आत्ता मागच्या बाजूनें पळून जा— "

मी आश्चर्यचकित होऊन तिच्या तोंडाकडे पाहू लागलों.

पण तिनें थोड्याशा चिडखोरपणानें म्हटले " तात्यासाब, बहेनवर रहेम करा. या क्षणाला घर सोडा. गेनूला मी गाडी जोडायला सांगून आलें आहे. ओढ्याच्या पलीकडे झाडाखालीं गाडी भेटेल. जा-- माझ्या रामला, माझ्या भाईला घेऊन आत्ताच्या आता जा. आज दुपारी मौलवीसाहेबाच्या घरीं शपथा झाल्या आहेत. आज रात्रीं तुम्हा लोकांच्या घराला आगी लावून देण्याच टरल आहे. त्या व्यवस्थेत सगळे लोक गुतले आहेत— तोपर्यंत पळून जा. "

शमसुद्दिनाच्या बायकोचे आभार मानायला देखील वेळ राहिला नाहीं. मी मागच्या दारातून बाहेर पडणार तोंच बहेन मला आपल्या हिंदु पद्धती-प्रमाणें नमस्कार करून म्हणाली, " तात्यासाब, फिक्र मत करो. बखत बहोत बुरा आया है अफसोस की बात है. लेकिन सोचता भी नही. अल्ला रहम करील—अन् म्होरल्या सालाला मी रामला ओवाळीन.— अच्छा, अलेकुम् सलाम !–"

" सलाम अलेकुम् " म्हणून उलट नमस्कार करून मी घराबाहेर पडलों! परधर्मातील एका गोषातल्या बाईनें सारी लाजलज्जा झुगारून, आपल्या माणसांची मुर्वत न धरतां, मानवतेच्या ऐसपैस नात्याच्या आधारावर मला आणि माझ्या कुटुंबाला जिवदान दिलें ही अद्भुत घटना मी या जन्मांत तरी विसरणें शक्य नाहीं !

● ● ●

# सखाराम ४

सखाराम आमचा तीन पिढ्यांचा खंडकरी. जमीन करतो, तिची मशागत करतो, तिला फुलवतो हसवतो तोच तिचा खरा मालक समजला गेला पाहिजे या तत्त्वज्ञानाप्रमाणें पाहिलें तर सखाराम आमच्या वाडवडिलार्जित जमिनीचा केव्हाच मालक होऊन बसायला पाहिजे होता—

पण सखारामाला हें तत्त्वज्ञान साफ नाकबूल होतें. चेष्टेत जरी त्याला कुणी मालक म्हटलें तरी तो दोन्ही हातांनीं कपाळ दाबून उद्वेगानें म्हणे,

"मालक, मालक म्हून तुम्ही गरिबाची अशी वगाळ थट्टा करू नगासा ! दोन पायातली काढून खुशाल दोन गालफडात लगवा—पर काहीं चुकलं माकलं तर पाटांत घ्या गरिबाला !"

वडिलांच्या पश्चात् वडिलार्जित जमिनीची मालकी सहाजिकच माझ्याकडे आली. वडिलांनीं मरतेसमयीं जशा इतर चार गोष्टी समजावून सांगितल्या त्याप्रमाणें सखारामाविषयीं ही सांगून ठेवलें होतें. वडिलांनीं मला बजावून ठेवलें होतें कीं 'या माणसावर विश्वास टाकून गाफील राहू नकोस गेल्या दहा वर्षांत त्यानें खंडाचा एक पैसाहि मला पचू दिला नाहीं गोडीन काहीं जमलें तर पहा---'

वडील जिवंत होते तोंवर मी निर्धास्त असें. शेताच्या कामासाठीं ते अधून मधून गांवीं जात येत असत एवढेंच माझें लक्ष असे. परतु पुढें कारणपरत्वें सखारामाचा आणि माझा परिचय वाढत गेला. तेव्हा मला वडिलांच्या सूचनेचा खरा अर्थ समजू लागला.

नोकरीनीमित्त मी मुंबईला राहू लागलों आणि जमीन पडली सातारा जिल्ह्यात.त्यामुळें जमिनीवर लक्ष ठेवणें याचा अर्थ जमिनीसबंधीं जे सरकारी कागदपत्र होते त्यावरून कधींकाळीं नजर टाकणें इतपतच होऊन बसला.

पण एका वर्षी दिवाळींत महमद डोंगराकडे जाण्याऐवजीं डोंगरच महमदाचा पत्ता काढीत त्याच्याकडे एका सुप्रभातीं येऊन खडा झाला ! सखारामला मी प्रथमच पाहात असल्यामुळें मला प्रथम ओळखदेख पटली नाहीं. सखारामानें आपण होऊनच सुरवात केली, " धनी, माझी वळख तुमाला नाहीं पटायची. मी तुमच्या पायाच खेटर सखाराम नाहीं का ! तुमची जिमीन गेली एक विसा अन् दहा वर्स मीच करतों न्हव का—? आतां पटली का वळख ? अंग आश्शी ! आता इसरू नगा बर का मला कंदी !"

" अरे, पण तू कसा इथें आलास ? अन् हें काय बरोबर आणलं आहेस ?—" मी त्याच्या पाठीवरील गाठोड्याकडे पाहून आश्चर्यानें म्हणालों. सखारामनें उत्तर देण्याचेऐवजीं गाठोडें पुढ्यांत घेतलें व जेमतेम दोन तीन रत्तल भरतील एवढे कादे गाठोड्यांतून बाहेर काढले. कादे पाहून तर मी जास्तच आश्चर्यचकित झालों.

सखारामानें उपरणें मोकळे करून पाठीशीं ठेवीत हसून म्हटलें, "कांदे. लढाईला बाप्ये मर्द जात्यात आन् कांदबी जात्यात नव्ह का ! रोग आला त्या लढाईला ! लई कहार उडाल्याया ! या शहर गांवातन माणसाना कांदा नदरं पडेना. आपल्या गावांत मिलट्रीच्या मोटारी रांगन पॉग पॉग करीत घुसत्यात अन् सार शिवार चिमणीवानी अगदीं शाप टिपून नेत्यात. घोळणा फुटला तर नाकाला हुंगायला बी कादा समद्या गांवांत भेटत नाहीं ! तवा म्हनल, जिमनीच्या मालकाला भेटाया जावं तर बरूबर काय न्यावं ? मनभर कांदं आननार व्हतो पर पुन्यांत कंट्रूल बसलाया कीं वं ! कांदं हकडचं तकडं जायचा न्हाई म्हून कलेक्टरनं छापून काढलया म्हनतात तवा वाटंन खायला म्हून शेरभर घेऊन आलों. म्हनलं, आपून चाकूर माणसं, धन्याची चाकरी करायची अन् त्येच्या मर्जीपरमानं शेतांत राबून पोट जाळायचं, खरं कीं नाहीं ? तवा सवताच्या जिमनींतला कादा तरी मालकाला देयाला होवा कीं नको !"

" अय्या ! आपल्या शेतातले का हे कांदे ? कित्ती छान आहेत हो—" आपुलकीचा उमाळा काहीं विलक्षण असतो भायखळ्याच्या मार्केटात या पेक्षा कितीतरी रसरशित कांदे मिळाले असते, पण बायकांच्या बुद्धीला हे ज्ञान पटणार नाही. या विचारानें मी सौभाग्यवतीच्या शिफारसपत्राकडे दुर्लक्ष करून सखारामाला उद्देशून म्हणालो—

" अरे पण सखाराम, कांद्यावाचून एवढ काहीं नडल नव्हत. मुबईत कांदा महाग मिळतो पण मिळतो. बर आता आणलेच आहेस तर असू दे ! पण पुन्हां लक्षात ठेव. असल काहीं आणण्याच्या भानगडींत पडू नकोस. अरे, किती झाल तरी तुम्हीच खरे जमिनीचे मालक ! बोलूं नकोस. अगदीं खर तेंच मी बोलतो आहे. पुढें मागें माझ म्हणण पटल्याशिवाय राहणार नाहीं. आम्ही फक्त नावाचे मालक. आम्ही जमिनीसाठी काय कष्ट करतों, सांग ! कधी नांगर हातात धरला आहे मीं ? खर तूच सांग आतां. जमीन तुम्ही कसता. तुमची मेहेनत खरी. आता कागदोपत्रीं जमिनी आमच्या आहेत. त्याकरता तुम्ही रक्कम मोजत असताच कीं नाहीं ? झाल तर ! कांदे पुन्हा आणू नकोस बर. तुझ्या पोराबाळांसाठी ठेवून दे. वेळ मोठी आणीबाणीची आहे. खेड्यांत धान्यसुद्धां एकादे वेळीं मिळत नाहीं म्हणून म्हणतात.—"

चकण्या डोळ्यानें सखाराम आभाळाकडे पहात ( परतु वास्तविक माझ्याचकडे ! ) म्हणाला, " धनी, तुमी समदी मानस लई गुणाची. उगीं कशाला गरिबाला लाजवता ? तुमच्या पायातली आमीं खेटर आहोंत ! तुमी आमचे मायबाप आहां ! गरिबाला सभाळून घ्या म्हजी सार पावलं—"

सखारामाचा सालसपणा मला एकदम पटला. आणि अशा या भोळ्या जिवापासून सावध राहण्याचा मला वडील उपदेश करीत होते ! छे ! जुन्या पिढींतल्या लोकाना काहीं काहीं गोष्टींत बेताचेंच ज्ञान असावें ! मोठ्या प्रेमानें मीं त्याच्या तोंडाकडे पाहून म्हटलें, " आलास, बरं झालं ! मीच येणार होतों तिकडे पुढच्या महिन्यांत. बर, पण तूं कसा नेमका इथें आलास ?-- तुला माझा पत्ता कुणी दिला इथला ?"—

एकवार मोठ्यानें हंसून तो म्हणाला, " आता ? हाये कीं नाहीं मज्जा !

धनी, तुमाला सय तर लइ राहती की वो! मागल्या शिमग्याला तुमीच नव्ह कारीट धाडल व्हत ! तुम्ही येणार म्हून म्या मायदाळ वाट पघितली कीं. दुरड्यासाठीं पाचपंचवीस ताट बी राखून धरली व्हतीं. पर तुम्ही आलाच नाहीं ! तवा म्हनल, धन्याला सय करून द्यावी ! अन् धनीनबाई दिसत्याल म्हून उठलों तों टाकोटाक मुंबईची वाट सुधारली म्यां ! बाई अक्शी निर्मोळ दिसत्यात--अक्शी कोल्हापूरच्या अंबाबाईच म्हणा की--" असें म्हणून खरोखरीच त्यानें तिच्यापुढे मोठ्या भक्तिभावानें मस्तक लव-विलें मीं हसून तिच्याकडे पाहिले. काय बायकांची गमत असते पहा. मी तिला अंबाबाई म्हणालों असतो तर तिनें मला फाडून खाल्लें असतें. पण तोच किताब त्या घाट्यानें बहाल करताच तिनें खुशींत येऊन चक्क ओठाचा चंबू केला !

सखाराम दोन दिवस आमच्या बिऱ्हाडीं खादीला होता. तिनें त्याला आग्रह करून ठेवून घेतलेंच मुळीं चार आठ आण्यांच्या कांद्यांच्या नैवेद्या-वर त्या देवतेला त्यानें चांगलीच फितवली.

' सुमारें आठ आण्याचें कांदे ही जमेची बाजू धरली तर खर्चाची बाजू पहा बर ! चार भरपेट जेवण. आठ कप भरपूर दूध घातलेला चहा, परत जाताना त्याच्या मुलासाठीं थोडासा चिवडा व काळ्याबाजारातून आणलेल्या जिनसाचे दहा पधरा लाडू, त्याच्या बायकोसाठीं सौभाग्यवतीनें दिलेलीं दोन जुनेरी, खुद्द त्याच्यासाठीं मीं दिलेला जुना लोकरीचा कोट आणि प्रवासासाठीं म्हणून मीं दिलेलें पाच रुपये !

निरोप घेताना सखारामाचे डोळे पाण्यानें भरून आलेले मला दिसले ! किती सालस हा मनुष्य !

सखारामाने आमच्या दोघांच्या पायावर डोकें ठेवलें. ती लाजून मागें सरकली. मी ओशाळा झालों. सखाराम गहिंवरून म्हणाला, " धनी, दिवा-ळीचा पाडवा आपल्या गावीं आवदा झालाच पायजे. आपल्या जमिनींत काहीं गवसलं नाहीं तरी हा पठ्ठ्या हाये तोंवर कायबी गुमान न्हाई! तुम्ही या. गहू कुठून तरी आनतों, गूळ आनतों—पुरणपुळी बिगार उठूं देणार न्हाई!"

मधेंच सौभाग्यवतीला शंका येऊन ती म्हणाली, " पण कायरे, दुसरी-

कढून कशाला गहू आणतोस ? आमच्या शेतांतला गहू आम्हाला दे कीं, दुसऱ्याच किडक धान्य मुंबईला आम्ही रोजच गिळतो आहोंत."

सखाराम कपाळाला हात लावून म्हणाला. " माय, आता काय सांगू तुमासनी ! अवो, तुमच्या जिमीनीत गवता बिगर काय हाती लागतया ! म्हून म्हनतों, तुमी सवतां येउन बगाच ! आवंदा कादे थोड लावल व्हतं पण पावसान वाटूळ क्येल. "

सखाराम निघून गेल्यावर आम्हीं पतिपत्नी कितीतरी वेळ एकमेकांच्या तोंडाकडे पहात तसेंच उभे होतों ! मात्र त्याच क्षणीं माझ्या मनाचा निर्धार झाला. प्रत्यक्ष पाहून आल पाहिजे अस आम्ही उभयतानीं ठरवलं! ज्याला आम्ही सोन्याचा तुकडा मानीत होतों तो अखेरीस खापराचाच तुकडा निघावा हा शोध आम्हाला बेचैन करून सोडू लागला !

× × ×

सखारामाच्या म्हणण्याप्रमाणे मुंबई सोडण्यापूर्वी आठ दिवस आधीं एक पत्र मीं त्याच्या नावावर धाडून दिलें. हल्लींच्या प्रवासाच वर्णन करण आम्हा मानवाच्या शक्तीबाहेरच काम आहे. वाटेंत खूप त्रास झाला गाडीनें त्रास दिला, मोटरने दगा दिला, पुण्याच्या स्टेशनवर रेशनखात्यानें रडकुंडीस आणले आणि शेवटीं आम्हाला नेण्यासाठीं मोटरच्या रस्त्यापर्यंत बैलगाडी येणार होती ती तेथे कोठेंच न दिसल्यामुळें सूर्याच्या उष्णतेबरोबर माझाही पारा खूप चढला. मोटरच्या रस्त्यापासून आमचें गाव तीन मैल आत होतें. अतर तस थोडें होतें पण सामान बरोबर घेऊन तें पायीं चालणें अशक्य होतें. अखेरीस लळतलोंबत भर दुपारीं बारा वाजता गावच्या वेशीवर येऊन दाखल झालों. सौभाग्यवतीनें लाल पडलेलें तोंड पदरानें पुसलें. कुंकू विसकटलेंच. गडबडींत श्रमानें व तान्हेने तिचे मूळचे लालबुंद ओठ खारकेच्या बी प्रमाणें चपटके आणि सुकल्यासारखे झाले होते. माझी चेहेरेपट्टी जवळ आरसा नसल्यामुळें मला दिसत नव्हती ही समाधानाची गोष्ट होती !

गांव लहानच होतें. सुमारे जेमतेम पांचपन्नास पडकीं घरें एकमेकाच्या आधारानें उभी असलेलीं दिसलीं. पण सर्कशींतला वाघ पाहावयास शहरात

जशी माणसे जमा होतात त्याप्रमाणें आम्हाला पाहाण्यासाठीं जमा झालेली माणसें आम्हाला नक्की उत्तेंर देईतच ना ! एकजण म्हणे सखाराम नांवाचा कुणी मनुष्यच त्या गांवांत रहात नव्हता. दुसरा सांगे, 'ह ! हाये हाये ! व्हता, व्हता ! पर त्या मागल्या शिमग्यालाच खपला नव्ह का !' तिसरा सागे सखाराम गावच्या त्या टोकाला राहतो. चवथा नुसताच फिदीफिदी हसे.

अगदीं चिडून गेलों ! पण करणार काय ?

सखारामाचें घर सांपडलें—पण सखाराम घरात होता कुठें !

एक जख्ख म्हातारी बाई परसदारीं कसलें तरी वाळवण करीत होती. तिला धड दिसत नव्हतें. धड ऐकायला येत नव्हतें. तिला लगडत चालावें लागत होतें आणि वयोमान म त्यामुळें लवकर समज पडत नव्हता !

सुमारें पधरा मिनिटें आम्ही जीव तोडून तिला विचारल्यावर ती आमच्याहि पेक्षां दुप्पट कर्कश स्वरात म्हणाली," त्या सखारामाचा मुडदा गेला! दारात येऊ द्ये त्याला. म्येला मला म्हातारीला फसवतो व्हय ! आन् तुमी कोन गा ! मला सखाराम ठाव नाय, तुमी ठाव नाय आन् तुमची जिमिनबी ठाव नाय–आरर थिरर्र ! "

शेवटचे उद्गार एका शेरडीला उद्देशून होते. आमची निराशा झाली. दिवाळीच्या पुरणपोळीचा तर नाद केव्हाच आम्हीं सोडला होता—पण आज दुपारच्या खाण्याची व्यवस्था कशी व कुठे होणार हा महत्त्वाचा प्रश्न आम्हाला भेडसावू लागला ! कुणी कांहीं सागावें, कुणी काही ठोंकून द्यावे. सगळे चोर एकमेकाला सामील होते. आम्ही परके होतों. सखाराम त्याच्या गांवातला होता. त्याला वाचवण्यासाठीं ते एकमेकांस साथ देत होते.

गांवचा तलाठी महत् प्रयासानें आम्हीं शोधून काढला. तो एका फाटक्या पोत्यावर ओसरीला झोंपला होता. त्यानें आम्हाला पहातांच कपाळाला आठ्या घातल्या परन्तु त्याच्या आठ्याकडे दुर्लक्ष करून मी त्याला अनन्य भावानें शरण गेलों व दहाची नोट त्याच्या हातात ठेवली. माझी दीनवाणी स्थिति ऐकून त्याला आमची दया आली असावी. आरडा ओरडा करून त्यानें स्वतःच्या बायकोला उठवलें व तासाभरानें आम्हाला

कण्या, किरमिजलेला भात आणि करपलेल्या भाकरी, मचूळ पाण्याच्या सगतींत गिळायला दिल्या. सखारामाची चौकशी केली. मला पुढील मनोरजक माहिती मिळाली. " त्या डांबीस माणसाशीं जपून असा. तो दिसतो तसा नाहीं. भयकर मनुष्य आहे तो ! उलट्या काळजाचा तो नाग आहे, पण कधीं सापडायचा नाहीं. काल तो गावांत होता. पण आज स्वारी कुठ गेली आहे, राम जाणे ! तुम्ही येणार हें पाहून त्यानें गुंगारा दिला असेल. तुम्ही गेलात म्हणजे उद्या, परवा परत येईल. आणखी चार पांच लोकाच्या जमिनी त्याच्याकडे खडान आहेत. पण एकालाहि तो खंड देत नाहीं. "

" पण मग हें अस कस चालेल ? आम्हांला खंड मिळाला पाहिजे; नाहीं तर आम्हीं कायदेशीर इलाज करू—" मी म्हणालों. एकवार चष्म्याच्या भिंगातून माझ्याकडे आपादमस्तक पाहून तो बेफिकीरीनें म्हणाला, " तें तुमच तुम्ही पहा ! तुम्ही शहरचे लोक ऊठसूट कायदा बोलतां. ती सवयच लागून गेली आहे पण विचार करून पहा काय होईल तें ! शेतकऱ्याचा कैवार घेणारें सरकार आहे. त्याला भरपूर सवलती मिळतील, आणि कोर्टकचेऱ्या करायला तो मोकळा आहे. जरी तुमच म्हणण खरं ठरलं तरी कोर्टाचा हुकूम अमलात कसा आणणार ! गावातले सगळे लोक त्याला घाबरतात. त्याच्या विरुद्ध एकजण तुम्हांला मिळणार नाहीं आणि एकादा सापडला तर तो त्याचाच हस्तक असेल . म्हणजे पुन्हां तुम्हांला कांहीं मिळणार नाहीं ते नाहींच "

हे सर्व ऐकून मी पत्नीच्या चिंताक्रांत मुद्रेकडे पाहिले व तिनेंही माझ्याकडे पाहिले !

" मग आम्हीं काय कराव अस तुम्ही म्हणता ! " गळेपडूप्रमाणें मी त्या तलाठ्याला म्हणालो.

" मी काय म्हणणार ? जमीन तुमची आहे, तुम्ही रास्त दिसेल तें करा!"

—त्याच दिवशीं सध्याकाळीं आम्हीं भाड्यानें एक बैलगाडी ठरवली व मोटारीच्या रस्त्यावर येऊन ठेपलो.

—आणि दुसऱ्या दिवशीं सकाळीं थेट मुंबईला बिऱ्हाडीं येऊन दाखल झालों !

दिवाळीनंतर आठ दिवसांनीं सखारामाचें लांबलचक पत्र आलें. पत्रांतील भाषा साखरेंत घोळली होती, तुपांत तळली होती आणि मधानें माखली होती. भावाच्या मौतीसाठीं तातडीनें निघून जावें लागल्याबद्दल त्यानें खेद प्रकट केला होता. परंतु त्या थेरडीनें मालकांना न ओळखतां त्रास दिला याबद्दल तिची दुसरी तंगडी तोडून टाकल्याचें वर्तमान त्यानें विदित केलें होतें व शेवटीं निर्लज्जपणानें विचारलें होतें कीं " धनी, पुन्हा कवा जिमीन पगाया येणार तें अदुगर सांगा ! आठ दीस कारिट आधीं लावून द्या मजी राजावानीं सरबराई ठिवतों. पायावर मुंडकं कापून ठिवणार नाहीं तर नांवाचा सखाराम न्हाई ! "

पांच वर्षें होऊन गेलीं. अजून मी शेताकडे गेलों नाहीं सखाराम पत्रें नेहमीं धाडतो पण खंड मात्र एक दिडकी त्यानें दिली नाहीं !

—आणि आपला शेतकरी कष्टाळू आहे. सालस आहे, निष्पाप आहे. त्याला मदतीचा हात देणं आपलं कर्तव्य आहे. इत्यादि वाक्यें उच्चारलेलीं आपण ऐकतच असतों.

● ● ●

## काजळी आणि ज्योत

## ५

गजरा सुमारें दहा वर्षांची असेल. तिच्या जन्मापूर्वी दोनच महिने तिचा बाप मरण पावला. दारूच्या नशेत एका मोटारीचा धक्का लागून तो गटारात फेकला गेला आणि त्या गटारातच त्याने प्राण सोडला.

तो मेल्याचे ऐकून गजरेच्या आईला दुःखाचा हुदकासुद्धा आला नाहीं. खायला काळ परतु ससाराची आबाळ करणारा तो राक्षस मेल्याचें ऐकून तिला बरेंच वाटले. दोन महिन्यानतर तिनें एका धर्मार्थ दवाखान्यात गजरेला जन्म दिला मुलीनें डोळे उघडले आणि आईनें मिटले. गजरेनें फोडलेला टाहो ऐकायला ती जिवत राहिली नाही.

गजराहि तिच्या पाठोपाठ जाईल असा लोकाचा तर्क होता. दवाखाना धर्मार्थ असला तरी अर्थ असल्याशिवाय धर्माचा दयाळू डोळा उघडत नसतो.

मध नसलेल्या पोळ्याला कोण हातात धरील ? गजरेची काळजी वाहण्याची कुणालाच गरज भासेना. एक दोन दिवसात गजरा आपला कारभार आटपून घेईल म्हणजे ही नसती ब्याद टळेल, या घटनेची सर्वजण वाट पाहात होते. पण गजरा मेली नाहीं. एक महिना होऊन गेला तरी ती हट्टानें जगू लागली. तिच्या दुधाची कुणी हेळसाड केली की ती ब्रह्मांड हलवून सोडी. अशी जोरजोरानें रडे कीं, तिचें तोंड बद पाडण्यासाठीं दाईला दुधाची बाटली तिच्या तोंडांत देणें भाग पडे. ती आपली स्वतःची मिजास व्यवस्थित ठेवून घेई !

गजरा सहा महिने त्या दवाखान्यात होती. एका झाडूवालीला तिची दया आली. तिला स्वतःचें मूलबाळ नव्हतें. तिनें त्या अनाथ पोरीला पदराआड करण्याचें ठरविलें. शेवतीच्या झोपडींत तिची रवानगी करण्यांत आली. पोरीचें नाव ' गजरा ' तिच्याच आवडीचें होतें.

गजरा मोठी झाली. पण वयाच्या वाढीबरोबर तिची अक्कल इतकी झपाट्यानें वाढेल अशी तिच्या दत्तक आईवडिलांना कल्पना नव्हती. शेवंतीनें सांगितलेलें कोणतेंहि काम ती राजीखुषीनें करीना. कडू बोलणी ऐकून घेण्याचा तिला सराव झाला. माराचा धाक तिला वाटेनासा झाला. शेवंतीच्या नवऱ्याची तिला प्रथम भीति वाटत असे. परतु तो मेल्यावर ती निर्धास्त झाली. सगळ्या गल्लीत गजरा एक अर्वाच्च मुलगी म्हणून ओळखली जाऊं लागली. तिच्याविषयीं कुणीहि चांगलें बोलावयास तयार नव्हता. गजरा दिवसेंदिवस कोडगी होत चालली. कपड्याची तिला शुद्धहि नसे. कमरेभोंवतीं एखादा फाटका आणि विटका धडपा गुडाळून घेतला कीं सारा गांव पालथा घालायला ती सज्ज होई.

तिला जेवणाची शुद्ध नसे. काळवेळाचीं बधनें तिनें कधींच मानलीं नाहींत. दोनदोन चारचार दिवस ती घरातून बेपत्ता होई. ' कुठें गेली होतीस ' या प्रश्नाचें तिनें कधींहि सरळ उत्तर केले नाहीं. अशा तऱ्हेचा वांडपणा करण्यात तिला एक प्रकारचा अननुभूत आनंद होत असावा. म्हातारी शेवती चिडून जाई. तिला मरेमरेतों बदडून काढी. एखादे वेळीं चऱ्हाटानें बाधून ठेवी. उपाशी ठेवी. काय लागेल ते केलें तरी गजरा मोकळी झाली कीं, पुन्हा वारा प्यालेल्या वासराप्रमाणे सैरावैरा धावू लागे. म्हातारीनें हात धरला तर ती दुष्टपणाने तिच्या हाताचा चावा घेई.

गजरा म्हातारीला मुळीच भीक घालीनाशी झाली चार दोन दिवस गजरा एखादेवेळीं मारापासून विश्रांति मिळण्याच्या इराद्यानें अदृश्य होई, परतु पुन्हां कोडगेपणानें म्हातारीचे गाडगेंमडके हुडकायला परत येई. म्हातारीनें खायला दिलें नाहीं तर ती चोरून खाई !

गजरेनें मित्रपरिवार बिलकूल गोळा केला नाहीं. तिच्या वृत्तीशीं पटवून घेणारीं मुलें मिळणें कठीण आहे. कुणालाहि चिमटे काढणें, चावे घेणें किंवा

गुद्दे चढवणें हा कार्यक्रम तिला मनापासून आवडत असे. ह्या तिच्या चढाऊ वृत्तीमुळें गल्लींतील मुलें तिला भीत असत. एकदा एका नवीनच आलेल्या परटाच्या धटिंगण पोरीला तिनें रस्त्यांत पालथें पाडून तोंडाला फेस येई-पर्यंत बुकलून काढलें होतें.

गजरा ज्या वाड्यांत भांडीं घासायला जाई तेथेंहि ती कोणाला आव-डली नाही. शेवतीनें आपली जात-कुळी दडवून गजरेला एका ब्राह्मणाच्या वाड्यांत काम लावून दिले होतें. भाड्याचा महिना भरला कीं म्हातारी गजरेच्या पाठीवर हजर असे. पैसान् पैसा ती त्या मुलीच्याजवळून हिस-कावून घेई.

गजरेच्या कामात खोड निघाली नाहीं असें एक घर नव्हतें.

" अग ए, पोरी, डोळे फुटले का तुझे ? ताटाना पाठीमागें खरकट दिसत नाहीं का तुला ?" " ए, नळावर कशाला भांडीं ठेवलीस ?" " पळी हरवलीस वाटत ? थांब तुझे पैसै कापतें— ' " काय मेली चाहाटळ आहे हो ! खुशाल जीभ काढून वेडावून दाखवते " अशा तऱ्हेचीं मुक्ताफळें रोज कानावर पडत गेल्यामुळें गजरा याहि ठिकाणीं कोडगेपणाने वागू लागली. जिन्यावरून खाली भांडीं आणताना वरच्या पायरीवरून एखादा टोप मुद्दा-मच खाली ढकलून देण्यात तिला गमत वाटू लागली.

गजरा दोन वर्षे हें काम करीत होती. पण तिच्याविषयीं एकहि माल-कीण भलें बोलत नसे. अडल्या हरीप्रमाणें अति होईपर्यंत गजरेचे काम चालवून घेण्यात येई. पण भांडीं आपटून आपटून फोडण्यात कमालीचा आनंद मानणारी मुलगी फार दिवस कोण ठेवून घेईल ? त्यामुळें गजरेचें कोठलेंहि काम आठ दिवसापेक्षा जास्त क्वचितच टिकलें. नाहीं म्हणायला एक घर अपवाद होतें.

एका शाळामास्तराच्या घरीं मात्र ती दोन वर्षे सतत टिकून होती. मास्त-रीणबाई यजमानाच्या कानींकपाळीं ओरडत होत्या. माधवराव पत्नीच्या तक्रारी शातपणानेऐकून घेत, परतु गजरेला कामावरून काढून लावण्यास मात्र कधींच समति देत नसत. गजरेला न कळत त्यांनी शेवतीजवळ अनेकदा बातचीत केली होती. गजरेच्या आजवरच्या जीवनाचा सागोपाग इतिहास

त्याना अवगत होता म्हणूनच की काय ते पत्नीच्या आहारीं गेले नाहींत.

योगायोग असा कीं, ते घरात असले म्हणजे गजरा मन लावून काम करी. त्या गृहस्थाच्या अबोलपणामुळेंच ती त्याना वचकून असे.

पण माणसाच्या सहनशीलतेलाहि काहीं मर्यादा असतात वाया गेलेल्या मुलीच्या नादीं लागण्यांत अर्थ नाहीं हे त्यांनाहि पटू लागलें. गेल्या महिन्यात गजरेने दोन पातेलीं हरवलीं. चार पाच डब्याना पोचे आणले, खोबरेल तेलाची कोनाड्यात ठेवलेली बाटली फोडून टाकली. पत्नीनें ही नुकसानी दाखविली व "नवीन भांडा आणा,नाहींतर त्या कार्टीला हाकलून नवी बाई आणा" असा अंतिम सवाल टाकला.माधवरावानी गजरेला बोलावून घेतले.

"बाळ, पहिल्या तारखेपासून कामाला येऊ नकोस बर का! तुझ्या म्हातारीला लावून दे, म्हणजे मी तिला सर्व काहीं समजावून सांगेन." माधवरावानी गजरेला कामावरून काढून टाकण्याचें निश्चित ठरविले.

—आणि दुसऱ्याच दिवशीं त्याच्या खिशातलें पैशाचें पाकीट सापडे-नासे झालें. पत्नीजवळ त्यानीं या चमत्काराची चौकशी केली खिशात पन्नास पचावन्न रुपये होते. सकाळच्या शाळेला उशीर होईल म्हणून ते गजरे-च्या येण्याची वाट न पाहता निघून गेले.

अकरा साडेअकराला ते परत घरीं आले. दाराशींच पोलिस अन् इतर बघे लोक याची गर्दी जमलेली पाहून ते आश्चर्यचकित झाले. पुढें उंबऱ्याच्या आतल्या बाजूस अजीजीला आलेली शेवती आणि बेरडाप्रमाणें सरळ टकाटका बघणारी गजरा त्याना दिसली. आणि हातात पाकीट घेऊन विजयी मुद्रेने आपणाकडे पाहात उभी असलेली पत्नी त्याना दिसली. काय झालें असावें तें त्यांनीं ताबडतोब जाणलें. शेवंतीचे घर पत्नीला माहीत होतें. आपण शाळेंत गेल्यावर पत्नीनें तिच्या घरीं जाऊन चोराला पकडून आणलें असावें. चोर मुद्देमालानिशी तिला सापडला असावा—आणि त्याला चांगली अद्दल घडावी म्हणून चौकातल्या पोलिसाला बोलावून घेतलें असावे. शेवंती चटकन त्याच्या पाया पडली!

माधवरावानीं गजरेच्या डोळ्यांकडे रोखून पाहिलें. गजरेनें त्याच्या डोळ्यास डोळा भिडवला. तिच्या नजरेंत बेपर्वाई पुरेपूर भरलेली दिसत

होती. माधवरावाना तिची दया आली. त्याच्या डोळ्यातील तिरस्कार एका-एकीं मावळला त्या जागीं वात्सल्यानें जागा घेतली.

गजरेच्या आयुष्यात जी उणीव होती ती तिला त्या क्षणीं जाणवली असली पाहिजे. जें मिळण्यासाठी तिचा अजाण जीव धडपडत होता, आणि तें न मिळाल्यामुळे ती वाड बनली होती तें वात्सल्य, ती माणुसकी तिला माधरावाच्या नेत्रात दिसून येताच तिची दृष्टि शरमेनें भुइकडे आपो-आप वळली. मनुष्य स्वभावतः दुष्ट नसतो, तो परिस्थितीनें बेरड बनत जातो.

धावत जाऊन तिने माधवरावांचे पाय धरले आणि डोळ्यातून सरसर ठिपकणाऱ्या कढत अश्रूनी ते भिजवून टाकले. तिच्या हृदयाच्या ज्योतीवर जी काजळी चढली होती ती त्या अश्रूनीं पार धुवून टाकली. माधवरावानीं तिला हलकेंच दडाला धरून उठवले. अत्यत समाधानाने ते पोलिसांकडे पाहून म्हणाले,

" नाईकसाहेब, तुम्हाला त्रास पडला. राग मानूं नका लेकर इथून तिथून सारखींच. मुलाच्या हातून चुका व्हायच्याच. त्याचा थोरानी राग मानून चालेल का? जाऊ द्या. काही तक्रार मला करायची नाहीं ! "

पोलिस आश्चर्यानें मान डोलवून निघून गेला, बघे लोक या आचरट-पणाच्या वर्तनावर साधकबाधक टीका आपापसात करीत पागूं लागले. माधवरावानी चोरट्या गजरेवर दया करावी हें कोणालाच रुचलें नाहीं.

" म्हणजे माझा सारा खटाटोप फुकटच का गेला ? " त्याची पत्नी आश्चर्यानें म्हणाली.

गजरेच्या डोक्यावर हात ठेवून माधवराव म्हणाले, " मुळीच नाहीं. तुझ्या या खटपटीमुळे या मुलीत माणुसकी जिवत आहे हा शोध मला लागला. बर का, आज या मुलीला अन् तिच्या आईला आपल्याच घरीं पोटभर जेवू घाल. अशी आश्चर्यानें माझ्याकडे पाहू नकोस तुला स्वतःचं एखाद मूल झाल म्हणजे माझ्या या वागण्याच तुला आश्चर्य वाटणार नाहीं—"

" इश्श !" म्हणून म्हणत त्यांची पत्नी घरात निघून गेली.

● ● ●

# भूक ६

आमची आशा जेमतेम सहा वर्षांची असेल. पण तिची भूक मात्र कमालीची दाडगी आहे. इतकी कीं कधीं कधीं मलासुद्धा तिच्याविषयीं काळजी वाटू लागते माझी पत्नी तर रोज उठून तिच्या भुकेसबंधीं कागाळ्या करीत असते. केव्हा केव्हा तर मी किंचित् चिडखोरपणानें पत्नीला म्हणतों देखील, " अग, तुझ्या पोटचं तें लेकरू. असें तुसड्यासारख काय तिला वागवतेस? लहान मुल म्हणजे देवाघरचीं लेणीं. फुलापेक्षा सुकुमार अन् दंवापेक्षा तजेलदार. त्याना अंजारावं, गोंजराव. त्याच हेतूनें देवानं आपल्याला हीं बाळ दिलेलीं असतात—"

" पुरें तुमचं कौतुक. देवाघरीं अर्ज घेऊन गेलें नव्हतें कांहीं ! दोन पोर घरामध्यें, पण घराचा नुसता पांजरपोळ करून सोडला आहे मेल्यानीं. देवान हीं फुलं आमच्या घरीं आणून दिलीं तर त्यांच्याबरोबर एखादा धटिंगण माळी का नाहीं हो धाडून दिला ? "

पत्नीचा हा आवेश माझ्या नित्याच्या परिचयाचा होता. धटिंगण माळ्याचें काम करायला परमेश्वरानें माझी योजना केली आहे असें चेष्टेचें उत्तर द्यावें असें मनात आलें होतें पण तें मनांतच ठेवून दिलें. बायकांशीं वाद न घातला तर पुरुष मुखदुर्बळ ठरतो आणि घातलाच तर गाढव ठरतो. मी कांहींच उत्तर करीत नाहीं हें पाहून सौभाग्यवती आवेशानें

पुढें बोलूं लागली, " तुमच पुरुषाच ठीक आहे. दोन्ही वेळेला जेवणापुरतें घरी असता पण सबंध दिवसभर ही कार्टी आमच्या डोक्याशीं– "

" अग पण, दिवसभर त्या मुलांना आमच्या डोक्याशीं ठेवून हा गाडा ढकलणार कोण ? अन् खर सागू का — ! तुम्हा बायकाना कीं नाहीं थोडं बालमानसशास्त्र अवगत असायला पाहिजे. ज्ञानार्जनाची भूक मुलाच्यात निर्माण करण हे शिक्षणशास्त्रात पहिल कलम आहे बालमनाचे सूक्ष्म व्यापार तुला थोडे जर माहीत असते तर आशाच्या बाबतीत तू स्वत.ला धन्य मानून घेतल असतस ! मुलानीं चौकसबुद्धि आपण होऊन दाखवावी हें आपल केवढ भाग्य आहे. ज्ञानसोपानाची ती पहिली पायरी आहे—" मी म्हणालों.

" हे पाहा—आणखी कितीहि लठ्ठ लठ्ठ भाषा वापरली तरी मी दबणार नाहीं. तुम्ही आहात मास्तर. इतराना न समजेल अस काहींतरी वेडवांकड बोलून वेळ मारून न्यायची तुम्हा मास्तरांची पद्धत मला आता चागली पाठ झाली आहे. हें तुमच शिक्षण अन् तें शास्त्र शाळेंतच ठेवीत जा अन् घरीं आल्यावर प्रथम दहा धपाटे त्या कार्टीच्या पाठींत घालीत जा. अन् तुम्हाला ते होत नसेल तर मी तिला सडकून काढीन. मग मात्र तिचा कैवार घेऊ नका. तुमच्या लाडान कार्टी अगदीं बेफाम झाली आहे– "

म्हणजे आज काहीं तरी विशेष घडलें असावे हे उघड दिसत होतें. काय इतकें तापण्याचें कारण तरी काय तें कळावे म्हणून मी म्हणालों, " आज आशान अस केल तरी काय ? "

" काय करायच आहे सागून ? ऐकल्यावर मोठ्यान हसून जिरवायलाच कीं नाहीं ? "

" हेंच तुझ चुकतं ! मी का तुझा दावेदार आहें ? ससारात पतिपत्नींनीं विश्वासान एकमेकाला आपल्या अडीअडचणी सागायच्या नाहींत तर– "

" तर—तर ! म्हणजे मला मूर्ख म्हणून हसायला कस तुम्हाला मिळेल ! मी सांगून ठेवतें कीं त्या पोरीच तोंड तुम्ही बद करणार असाल तर ठीक आहे. नाहींतर मी तिला चार लोकात आचारटासारखी पुन्हां कांहीं बड-

बडली तर चागली चेंचून काढीन. फूल असेल तर तुमच्या छातीवर चिकटून ठेवा तिला. मी यापुढे तिची मुळीच गय करणार नाही– ”

गभीरपणाचा आव आणून मी थोड्या वेळानें म्हणालों, “ आशा थोडीशी, हो, बोलकीच आहे म्हणा ! पण तो गुण तिन तुझ्यापासूनच घेतला आहे म्हणा— ”

माझी मात्रा अपेक्षेप्रमाणें बरोबर लागू पडली एकदम उसळून आनंदी म्हणाली—“ खबरदार मला उगाच कुणीं नाव ठेवलीं तर ! मी बोलतें म्हणजे हें अस अचावचा बोलते होय ? लहान पोर झाली म्हणून इतक बेसुमार बोलायच ? माझ्या मावशीला तिन अस बोलाव ? म्हणे तुम्ही तांबडच लुगड का नेसतां हो ? तुम्ही कुकूच का लावत नाहीं ? तुम्ही बागड्याच का घालीत नाहीं ? माती अन् मसण. अगदीं हसू नका ! असं बोलल्यावर एक बाई तरी आपल्या घरात पाणी प्यायला येईल का ? हें ऐकून मला तर मेल्याहून मेल्यासारख झाल ! अन् डोळ्यानं दटवायगा गेलें तर म्हणते कशी– ! ‘ मी काकानाच सागेन. ’ तुमचे लाड याला कारण ! तीं तुमचीं फुल तुम्हीच गोंजारून ठेवा. पुन्हां असला तमाशा केलान् कार्टीन तर फुकणीन सडकून काढीन— ”

हा वेळपर्यंत शेजारच्या घरांत खेळणारी आमची आशा धांवतच माझ्याकडे आली. ‘ काका, काका ’ म्हणत म्हणत तीं माझ्या गळ्याला घोरपडीप्रमाणें घट्ट बिलगली. मीं तिला दोन्ही दडाना धरून दूर उभी केली अन् कृत्रिम कोपानें म्हणालों, “ आशा, तू फार वाईट मुलगी आहेस. तू आईचें ऐकत नाहींस, लोकाना वाटेल तसं वाईट वाईट बोलतेस. मी तुझ्यावर खूप खूप रागावणार आहें-- ”

“ मग तुम्ही रागावलांत कीं मी तुमचा मुका घेईन-- ”

“ तरी सुद्धा मी राग सोडणार नाहीं– ”

“ मग--मग मीं रडेन -- ” असें म्हणून खरोखरीच त्या अर्भकानें तोंड वांकडें केलें. मला राहावलें नाहीं. मीं तिला पटकन् जवळ ओढून घेतली व तिच्या गालावरून माझे गाल घुसळीत म्हटलें, “ नाहीं ग बाई ती माझी ! माझ्या आशवर मी कध्धीं कध्धीं रागावणार नाहीं. लोकाना

काय होत आई बोलायला ? मुलासाठीं पार झिजवावे लागले म्हणजे समजत. देवाघरचीं लेणीं अशीं सुखासुखी मिळत नसतात ''

अर्थात् पुढील भाग पत्नीला उद्देशून होता पत्नीनें नाक उडवल्यासारखें करून म्हटलें, " गुळाचा गणपति अन् गुळाचा नैवेद्य. तिला अशीच डोक्यावर बसवून ठेवा. हेच तुमच शास्त्र ! अन् पुढें पोरगी बिघडली कीं आईच्या नावान हाका मारीत सुटा—ज्याला खस्ता खाव्या लागतात त्याच पाप उभ राहात. दिवसातन दोनतीन वेळेला जवळ घेतल म्हणजे झालं वाटत— ? "

" आता हा नवा मुद्दा काढलास—"

" काहीं नवीन नाहीं, चांगला नेहमींचाच जुना आहे मुलांच दुरून कौतुक करायला कांहीं बळ लागत नसत. आमच्यासारख दिवसभर त्याच्यामागें पहाण आल म्हणजे मग हें कौतुक टिकेल का ? मग तुमच शास्त्र काय म्हणेल तें मला सागा—"

हें आव्हान नेहमीं मी ऐकत आलों होतों. पण या खेपेस तें स्वीकारण्याची मला अचानक बुद्धि झाली मागचा पुढचा विचार न करतां मी एकदम म्हणालों, " ठीक आहे. उद्या तू माहेरी एकटी जा. मी दोन्ही मुलाना एक दिवस सभाळतों उद्यां मला सुटी आहे. एक दिवस मुलं माझ्याकडे लागलीं. "

—आणि खरोखरीच दुसऱ्या दिवशीं सकाळीं रमेश आणि आशा या दोघाना माझ्या हवालीं करून पत्नी एक दिवसाच्या बोलीनें माहेरीं निघून गेली.

निष्पाप मनाच्या कोवळ्या पोरांना घरोघरीं ज्या तिरस्कारवानी वृत्तीनें वागवण्यात येतें त्याची मला अत्यंत चिरड येत असे. लहान पोर म्हणून उगीच खसावसा करायचें अन् तोंडांत मारण्याची धमकी दिवसांतुन वारवार उच्चारून दाखवायची ही कायरीत झाली ? केशराच्या काड्या काय लोखडी चिमट्यानं उचलायच्या ? मुलांना आपलें घर म्हणजे स्वर्गाचें अंगण वाटलें पाहिजे. मोकळ्या मनानें त्यांनीं वाढलें पाहिजे. शरीराबरोबर मनाचीहि त्याची भूक आपण शमवली पाहिजे; तरच आपण देवाघरीं धन्य ठरूं.

घरातली दोन मुलं संभाळता येत नाहीत काय ? उगाच बाऊ करण्याची खोडच असते बायकांना !

आमचा रमेश आशापेक्षा दोन वर्षांनी मोठा होता. त्याचा विशेष त्रास नसे. निदान त्याच्यासंबधीं फारशा तक्रारी घरातून येत नसत. मुलगा तसा बुद्धीनें जेमतेम. फारसा कुणाशीं बोलायचा नाही. खेळायला बाहेर जाईल पण कुणाशीं मारामारी करायचा नाहीं, पण आमची आशा मात्र त्याच्या अगदी उलट होती. तिची भूक फार दांडगी. आपल्याभोंवतीं काय चाललें आहे हें जाणून घेण्याची तिला तीव्र इच्छा असे. प्रत्येक गोष्ट आपल्याला कळलीच पाहिजे हा दांडगा हव्यास तिला होता. स्वतःला समजले नाहीं तर प्रश्न विचारून ती दुसऱ्याला पुरेसे करून सोडी. पण मी म्हणतों, हा गुणच नाहीं का ? मुलाची जिज्ञासा निर्माण करणे हीच ज्ञानाची पहिली पायरी नाहीं का—?

मी स्टोव्हपाशीं बसून असलाच कांहींतरी उच्च विचार घोळीत होतों तोंच बहीणभावाची जोडी उठून स्वयंपाकघरात आली.

" आई कुठें गेली ? " आशानें डोळे चोळीत म्हटलें.

" तुला काय करायच आहे ? " रमेशने तिला प्रौढपणाने दाबलें.

" आई तुमच्यावर रागावून तिच्या आईकडे गेली आहे. तू तिला फार त्रास देतेस, म्हणून ती तुझ्यावर रागावली आहे. ती पुन्हा कध्धीं परत येणार नाहीं—" मी म्हणालों.

थोडा वेळ स्वतःशींच विचार करून आशा म्हणाली, " जाऊ दे, नाहीं आली तर नाहीं. मज्जाच झाली मग आमची. आई नसली म्हणजे मला कुणी मारणार नाही—"

" असं आईला म्हणू नये. आपली आई आहे ती " रमेशनें म्हटलें.

" तुला कुणी रे मधें बोलायला सांगितल ? काका, तुम्ही याचं ऐकूं नका हो. आई आली नाहीं तर तिला आणूच नका. त्यापेक्षा—मी म्हणतें, असं करू या आपण. ती पर्वाची सिनेमांत गाणं म्हणणारी आई आपण आणू या. "

" ती कशाला ? " आश्चर्यानें मी म्हणालों.

" गाणं म्हणायला ! ती बाई तुम्ही आपल्या घरीं आणा म्हणजे रोज ती गाणीं म्हणेल. मलाहि पण गाणीं म्हणायला शिकवील—" आनंदानें आशाचे डोळे लकाकत होते. तिच्या दृष्टीनें ठीक असेल, पण मला जगात अब्रूनें दिवस काढावयाचे होते म्हणून तो मार्ग अनुसरणें अशक्य होतें.

" बरं पण तुला चहा नाहीं का घ्यायचा ? " मीं मुद्दामच विषय बदलला.

" पण ती सिनेमांतली बाई केव्हा आणणार सांगा—"

" उद्यां—"

—दुपारीं जेवणें झालीं. तोंपर्यंत आशाशीं मला दहाबारा वेळां बौद्धिक झटापट खेळावी लागली. रमेश माझ्या बाजूला होता म्हणून दोनदा मीं बचावलों. दहा वेळां मला हार खावी लागली. माझें बालमनाचें ज्ञान रबराप्रमाणें ताणलें जाऊं लागलें—तरी पण मीं विवेक केला. मुलांच्या अंगावर ओरडणें रानटीपणाचें आहे. त्यांना नीट समजावून सांगितलें पाहिजे.

—पण दुपारीं माझा निश्चय टिकवणें मला अतिशय जड जाऊं लागलें. खरंच, मुलांना मुभा दिली म्हणजे तीं काय बडबडतील याला सुमार नसतो.

" काका, " आशानें माझ्या डोक्यावरचें पांघरूण सत्तराव्यांदा दूर सारून म्हटलें, " आमच्या शाळेंतल्या बाई गाढव आहेत काय हो ? "

" काय विलक्षण पोरगी आहेस ग तू ! मोठ्या माणसांना असे अपशब्द बोलावेत का ? " माझ्या आवाजात किंचित् चिडखोरपणाची छटा नकळत उमटू लागली असावी असा संशय येऊं लागला. पण आशाची गाडी आतां भरधाव निघाली होती.

" काका, अपश—अपशब्द म्हणजे काय हो ? "

" शिवी. एवढंही कळत नाहीं गाढवीला—" रमेश मधेंच म्हणाला.

" मग काका, तुम्ही परवां शिवी दिली होती ती कां—? " आशा आवेशानें म्हणाली.

" मी ? शहाणी आहेस. मी कशाला शिवी देईन ? "

" वा ! आपण मडईत चाललों होतों. अन् तिकडून लहान लहा घोडे आले होते. तेव्हां तुम्ही त्याना गाढव नाहीं का म्हणाला ? " आशानें खुलासा केला.

मला हसू आवरणें कठीण होतें. तरी पण आशा रागवेल या भीतीनें मी गभीर मुद्रा करून म्हणालों, " हा वेडे, अग तीं गाढवच होतीं–"

" पाहा, पुन्हा वाईट शब्द बोललात."

" अग, तस नाहीं आशा ! माणसाना गाढव म्हटलं म्हणजे शिवी असते – समजलीस ? "

" अन् गाढवाना माणस म्हटल म्हणजे शिवी असते का—"

" हें बघ, मला आतां जरा स्वस्थ पडू दे–" मी डोक्यावरून पांघरूण घेत म्हणालों.

थोडा वेळ ठीक चाललें होतें. नतर पुन्हां माझ्या तोंडावरचें पाघरुण दूर झालें.

" काका, आमच्या बाईना आई गाढव म्हणते—मग खर गाढव कोण ! तें लहानस घोड गाढव, का आई गाढव, का बाई गाढव ? " आशाची टकळी पुनश्च सुरू झाली.

मी कांहीं उत्तर करीत नाहीं असें पाहून आशानें माझें डोकें जोरानें घुसळायला सुरवात केली. आता मात्र विवेकाची मर्यादा संपली होती. मीं संतापानें तिचा हात झिडकारून म्हटलें, " एक अक्षर बोललीस तर याद राख— "

आणि लगेच माझ्या मनातला शास्त्रज्ञ जागा झाला. पण बाण सुटला होता. माझ्या खेकसण्यामुळें आशा हिरमुसली होऊन दूर बसली. तिच्या पाठीवर उशी फेकून मारीत मी लाडीकपणानें म्हणालों, " हा रुसुबाई ! इतकं रागवायला काय झाल ? चल ये इकडे झोपायला— "

मी तिच्या डोक्यावर पांघरूण टाकलें आणि करड्या स्वरांत म्हणालों —" आतां निजलीस तर बरं आहे. नाहींतर दोन मुसकाडींत ठेवून देईन--"

—संध्याकाळीं सौभाग्यवती परत आली. दोन्हीं मुलें मीं मोठ्या आनंदानें तिच्या हवालीं केलीं.

" काका, मी तुमच्याबरोबर बाहेर येतें "—आशा लाडिकपणानें मला बिलगून म्हणाली. मीं तिच्या दंडाला धरून पत्नीच्या पुढें ओढीत तिला नेलें आणि शांतपणे म्हटले, " तू, तुझी आई अन् हें घर—लागेल तो धिंगाणा घाला मला अजून दहापाच वर्षे जगण्याची इच्छा आहे—"

सौभाग्यवतीनें हसून माझ्याकडे पाहिलें. पण मी तिच्याकडे लक्ष नसल्या प्रमाणें तोंड चुकवून झटकन् घराबाहेर पडलों.

शास्त्रज्ञापेक्षा एखादा वैदूच एखादे वेळीं जास्त गुणकारी ठरत असतो. परदेशाहून शिकून आलेला बडा डॉक्टर हतबुद्ध झाला म्हणजे आजीबाईचा बटवाच उपयोगी पडतो. दहा शिक्षणशास्त्रज्ञाना एकटी माता भारी आहे—!

● ● ●

## ते दिवस पुन्हां येणार नाहींत

७

अत्यत आवडीचा मंगल सण म्हणजे दिपवाळीचा. असख्य मिणमिण तेवणाऱ्या पणत्या आपल्या सामुदायिक प्रयत्नानें अंधेऱ्या जगाला उजळा देण्यासाठीं धडपडत असतात. चार दिवस चैन, चगळ, लयलूट असते !

पण ऐन आनदाच्या क्षणीं सुद्धा डोळे भरून येणारीं हतभागी माणसें आपण थोडीं का पाहातों ? दुसऱ्याच्या आनदाला अपशकून न व्हावा या हेतूनें दुःखाचे कढत अश्रु गिळून टाकावे आणि उसनें हास्य तोंडावर आणून सण साजरा करावा अशा वृत्तीचीं माणसें आपल्या सहानुभूतीचे विषय आहेत.

मीही पण तुमच्या सहानुभूतीची भीक मागणारा एक दुर्दैवी इसम आहे. त्या शोकजनक घटनेने माझ्या हृदयाला खोल, खोल अशी जखम करून ठेवली आहे. ती घटना फार दिवसापूर्वीची आहे. ती घटना ज्या लोकाच्या देखत घडली ते लोक आज माझ्या आसपास नाहींत. आज माझ्यासभोंवती जो परिवार उभा आहे त्याना मीं एका शब्दानें त्या प्रसगाची अजून ओळख दिली नाहीं. माझ्या पत्नीनें व मुलानीं मला दिवाळीच्या चार दिवसात दुःखी कष्टी झालेला पाहू नये ही माझी तळमळ आहे. परतु नरकचतुर्दशीचा दिवस आला कीं माझ्या मनाची बेसुमार कालवाकालव होते. पुरुषाच्या नहाण्याच्या दिवशीं पत्नीनें किंवा थोरल्या मुलीनें माझ्या पाठीला तेल चोळण्यास प्रारभ केला कीं मला पोटभर रडावेसें वाटतें.

माझी आई माझ्या वयाच्या चौथ्या वर्षीच वारली. माझ्या जन्मापासून आईनें अथरूण धरलें होतें त्या अथरुणावरून ती उठली नाहीं. रोगाच्या भयकरपणाची यथार्थ कल्पना अखेरपर्यंत आली नाहीं तिला वाटे, हा श्रमाचा ताप आहे, बाळतपणात अतिशय हाल झाल्यामुळें सर्व नाड्या आखडल्या सारख्या झाल्या आहेत. आणि काहीं दिवसानीं खडखडीत बरे वाटेल. ह्यामुळें ती इतरांच्या देखत मला जवळ घेत नसे. पण घरांत वहिनी एकटी असली कीं तिच्या जवळून आई मला ओढून घेत असे व आपल्या जीर्ण शरीराच्या पोकळींत मला मायेचा उबारा पुरवीत असे. वहिनीला आपल्या सासूचा हा आततायीपणा आवडत नसे. तिनें एक दोन वेळा धीर करून आईला रास्त परिस्थिति पटवून देण्याचा व या वेड्या मायेचे परिणाम किति भयकर होतील ही सावधगिरीची सूचना देण्याचा अतिप्रसग करून पाहिला त्यावेळी आईनें तिला न भूतो न भविष्यति छेडून काढले.

"मी मरणार नाहीं. मी त्याची मुज होईपर्यंत जगणार आहे. त्याच्या बायकोची वेणी मी घालीन, अन् मग मी मरेन. चल, आण त्याला माझ्याजवळ! तुझ्यावर माझा काडीचा विश्वास नाही आण, आण, म्हणते न"

वहिनी तितक्याच हट्टीपणाने मान हलवून म्हणाली, "तुम्ही कितीहि ओरडलात तरी बापूला मी सोडणार नाहीं. तुम्ही त्याला जन्म दिला असेल पण त्याची आज तरी मीच आई आहे. उद्या मला मुल झालीं तरी तोच माझा पहिला मुलगा राहील. आता मुकाट्यान निजा पाहू.—"

आई सतापाने बेभान झाली. लटपटणाऱ्या पायांच्या खोट्या आधारावर ती ताडकन् उठून उभी राहिली. मला खाद्यावर टाकून कोपऱ्यात उभ्या असलेल्या वहिनीजवळ ती आली आणि मागचा पुढचा विचार न करतां तिनें फाडकन् वहिनीच्या तोंडात मारली. वहिनीचा तोल गेला. ती पाठी-मागें भिंतीवर कलडली—, आणि मी तोंडावर पडून जागा झालों व मोठ्यानें रडू लागलों आरडाओरडा ऐकून आजूबाजूच्या घरांतून बायका धावून आल्या. त्यानीं आईला हाताला धरून कॉटवर निजवलें. तिची समजूत काढली—आणि मला जें आवडेल तें करण्याचा सर्वांनीं विचार केला. मीं रडत वहिनींच्या लुगड्याला घट्ट धरलें. आईजवळ जाण्यास मी राजी

नव्हतों. वहिनीनें मला उचललें व मला घेऊन ती माडीवर गेली. मला कुशींत घेतलें व आवेगानें चुंबन घेतलें. तिचा उष्ण श्वास अनुभवून आणि गालावरील ओलेपणा स्पर्शून मला काय वाटले कुणास ठाऊक! मी तिला जास्तच बिलगून पडलों.

दुसऱ्या दिवशीं माझे वडील आणि बंधू शेताच्या गांवावरून परत आले. त्यांच्या कानावर या गोष्टी गेल्याशिवाय राहिल्या नाहींत वहिनीनें सांगितलें नाहीं तरी शेजाऱ्यानी वाच्यता केलीच. वांडलाचा राग आईनें शांतपणानें सहन केला. कदाचित् तिलाहि पश्चात्तापाचा झटका आला असावा. नंतर तिनें मला जवळ घेण्याचा हट्ट कधींच केला नाहीं. सहा महिन्यांनीं आई गेली. मरतेसमयीं तिनें मला वहिनीच्या ओट्यांत घातलें आणि डोळ्यांत पाणी आणून म्हटलें, "खरच हा तुझाच मुलगा आहे माझ्या रागावर त्याला छेडू नकोस तो तुझाच आहे. मोठा झाला तर त्याला माझी आठवण करून दे आणि आईची माया किती वेडी असते हें त्याला समजावून सांग. उणें आधिक बोललें असेन तर माझा अपराध पोटात घाल. रडू नकोस. त्याच्यासाठीं हसत जा—"

वहिनीनें आईला दिलेलें वचन ततोतत पाळलें! आई गेल्याचें मला आज स्पष्ट आठवत नाहीं. मीं रडून आकांत केला कीं नाहीं याची स्मृति मला नाही. मात्र त्या दिवसापापासून मी वहिनीला आधिकच चिकटलों.

दिवस जात होते. महिने उलटत होते, वर्षा मागून वर्ष लोटत होतें. वहिनीला पहिलें बाळ झालें तेव्हा मी दहा वर्षांचा होतों वहिनीला बाळ झाल्याचा आनंद तिच्यापेक्षा मलाच जास्त झाला असावा. वहिनीच्या बाळंतपणासाठीं सहा महिने माझी मावशी आमच्याकडे येऊन राहिली होती. ही मावशी माझ्या आईची सख्खी बहीण जेव्हा जेव्हा ती आमच्या आईकडे येई तेव्हां आईकडून तिला कांहींतरी दहापाच रुपये मिळाल्याशिवाय राहात नसत. आई गेली तेव्हा प्रथम तिनें वहिनीवर छाप पाडण्याचा प्रयत्न केला मावससासू या नात्यानें वहिनीनें तिचा योग्य तो मान ठेवण्यांत कसूर केली नाहीं. पण जेव्हा द्रव्याची मागणी पुढें आली

तेव्हा वहिनीनें कानावर हात ठेवले. मावशीला मागण्याची चटक लागली होती. पण वहिनीला हा चोरटा व्यवहार पसत पडला नाहीं.

मावशीनें वहिनीवर सूड उगवला तो माझ्यामार्फत ! बालमनांत कधींही आल्या नाहींत त्या गोष्टी तिनें पेरायला सुरुवात केली. वहिनी तुझी आई नाहीं. वहिनीला आता स्वतःच बाळ झाल आहे. तेव्हा तुझी गरज नाहीं. आता तुला भिकारणीकडे परत देऊन टाकणार आहे, अशा स्वरुपाचे अर्धवट थट्टेत, अर्धवट गभीरपणानें उच्चारलेले शब्द माझ्या कानावर आदळू लागले.

मी खूप सहन करीत असे पण एखादेवेळीं असह्य झालें म्हणजे रडत रडत वहिनीपुढे उभा राहून तिला याचा जाब विचारीत असें अगावर बाजू आल्याचें दिसतांच मावशी हसून वेळ मारून नेई पण वहिनी लगेच कमालीची गभीर होई व म्हणे " त्या मुलाला थट्टा समजत नाहीं. तुम्ही मोठ्या आहांत. माझ्याकडून तुमचा मान राखला जाईल अशा थोरपणान वागा—"

सहा महिन्यानीं मावशी आपल्या घरीं निघून गेली. वहिनी घरांत हिंडूं फिरूं लागली —मी दुपारीं शाळेंत जाई. घरीं असें त्यावेळीं माझा बहुतेक सारा वेळ वहिनीच्या राजाशीं खेळण्यात जाई. राजा मला फार आवडत असे. मीं त्याला वहिनीप्रमाणें सदऱ्याखालीं घेऊन पाजण्याचाहि एकदोनवेळा प्रयत्न केला राजाला माझ वागणें आवडलें नाहीं, का माझ्या आवळल्यानें त्याचा जीव घाबरा झाला कारण कांहीं का असेना तो चवताळून रडू लागला वहिनी धावतच बाहेर आली रागानें तिनें भान न राहून माझ्या पाठींत धपका घातला व खवळलेल्या राजाला चटकन् उचलून पदराआड केलें राजा चराचरा तोंड वाजवू लागला. आणि माझा खुलासा ऐकून वहिनीची हसता हसता मुरकुडी वळण्याची पाळी आली

माझ्या लहानपणी मानसशास्त्राचें थोतांड फारसें कुणालाच ठाऊक नव्हतें. फ्रॉईड, जुग वगैरे विद्वान मानसशास्त्रवेत्ते आणि त्याचा सुप्रसिद्ध 'लिबिडो' मला ऐकून देखील ठाऊक नव्हता आणि वहिनीला इग्रजी धड वाचतां

देखील येत नव्हतें. घरांत बायको मनुष्य कोणी मदतीला नव्हतें म्हणून ती मला रविवारीं नहाण्याचे वेळीं सत्तेनें हांक मारीत असे व माझ्या हातून स्वतःच्या पाठीला शिकेकाई चोळून घेत असे तिच्या मऊ आणि गोऱ्या-पान पाठीवर मी शाबासकीच्या थापट्या मारून तिची पाठ लालेलाल करून सोडीत असे. आपली वहिनी सुंदर असावी असा मला बारीक संशय येऊं लागला होता. तिच्या तोंडाकडे टक लावून मी पाहूं लागलों म्हणजे ती एकादेवेळी हंसून म्हणे, " पहातोस काय माझ्या तोंडाकडे ? माझ्या तोंडाला सोनंमोती का लावली आहेत ? "

मी निष्कपट बुद्धीनें म्हणें—

" तुझं नाक कस सरळ आहे तें पाहातों आहें. दादाच्या गालावर दाढी मिशा असतात. ते किती खराब दिसतात. पण तुझे गाल कित्ती मऊमऊ आहेत ग. ! "

माझा एक लटका गालगुच्चा घेऊन वहिनी म्हणे, "चहाटळ मेला !"

वहिनीवर मी नितांत फिदा होता. वहिनीची साधी इच्छा पुरविण्या-साठीं मी प्रसंगीं अचाट गोष्टी आवडीनें करून दाखवीत असे. एकदां श्रावणांतल्या सोमवारीं वहिनीला पूजेसाठीं बेल पाहिजे होता. माझे वडील म्हणाले, अक्षदा वाहा म्हणजे झाल. बधूंचा देवाधर्मावर काडीइतका विश्वास नव्हता. त्यांना बेल आणण्यास सांगण्याची सोय नव्हती. वहिनीच्या देवाधर्माची त्यांनीं चेष्टा केली नाहीं असा एक दिवस गेला नसेल. वहिनी नाराज झाली. सासऱ्याच्या सांगण्याप्रमाणें तिनें अक्षदा देवावर वाहिल्या व हात जोडून ती देवापुढ उभी राहिली. तिच्या थरथरणाऱ्या ओठावरून मीं ताडलें कीं हा उडवाउडवीचा प्रकार तिला मनापासून आवडत नसावा. मी तिला नकळत बाहेर पडलों. डोक्याला टोपी नाहीं, पायांत वाहाणा नाहींत, उन्हाचे चटके डोक्याला व पायाला बसत होते तरी ओठ घट्ट दाबून मी निश्चयानें रस्त्यानें चालूं लागलों. पाय श्रमानें बोलूं लागले होते, पण माझा निश्चय टळला नाहीं. बेल घेतल्याशिवाय घरीं जायच नाहीं हा माझा निश्चय कायम होता.

भर दुपारीं उन्हाचा बाहेर पडलेला मुलगा संध्याकाळीं दिवे लागणीच्या

वेळीं घरीं परत आला. पण हातात बेलाच्या झाडाची लहानशी फांदी घट्ट धरून आला. त्याचा सदरा चार ठिकाणीं फाटला होता. त्याच्या गुडघ्या-वर बरेंच खरचटलें होते. त्याचें तोंड सुकून गेलें होते. सोमवारीं संध्याकाळीं उपास सोडायचा म्हणून वहिनीनें स्वयपाक लवकर केला होता. सासरा व नवऱ्याला तिनें वाढले होतें. दिराची वाट पाहात ती चिंताक्रांत मुद्रेनें चुलीपुढें ताटकळत बसून राहिली होती. मला पाहताच तिचा इतका वेळ दाबून धरलेला क्रोध एकदम अनावर झाला. ' कार्ट्या , कुठरे दिवसभर तरफडला होतास. दुसऱ्याला सुखान अन्न खाऊ द्यायचा विचार नाहीं का तुझा ! ' असे म्हणून तिने दोनचार धपाटे माझ्या पाठींत एकामागून एक जोराने चढवले आणि माझ्या ऐवजी स्वतःच रडू लागली !

—आणि रात्रीं राजाला दूर सारून तिने मला जवळ घेतलें. माझ्या गालाला गाल टेकवून ती माझी क्षमा मागू लागली. मला राहवलें नाहीं. मीं तिला घट्ट बिलगून आवेगाने तिच्या ओल्या गालाचा मुका घेतला !

—वहिनीचा राजा एक वर्षाचा होऊन गेला. दात येण्याचें निमित्त पुरलें. चार दिवस जोराचा ताप आला आणि राजाने डोळे मिटले ते पुन्हा उघडले नाहींत. वहिनीने रडून आकांत केला, मी तिच्या बरोबरीनें रडलों. मृत्यू ही भयंकर घटना आहे या कठोर सत्याचा पहिला अविष्कार त्यावेळीं मला झाला. वहिनीच्या गळ्यात गळा घालून मी ओक्साबोक्शीं रडलों. नात्यातल्या बायकानीं वहिनीची परोपरीनें समजूत काढण्याचा भीमप्रयत्न केला—पण वहिनीनें चार दिवस अन्नग्रहण केले नाहीं.

आठ दिवसानीं घरात थोडीशी शांतता वावरू लागली. माझ्या शाळेला दिवाळीची सुट्टी होती म्हणून मावशी मला तिच्या घरी नेण्याची भाषा बोलू लागली. माझी जाण्याची इच्छा नव्हती. पण कोणीच विरोध दाखवला नाहीं. खुद्द वहिनी स्वतःच्याच दुःखांत चूर होती. तिनेंही नकार दिला नाहीं. वहिनीपासून दूर राहण्याची ती पहिली दिवाळी! माझी खाण्या-पिण्याची आबाळ झाली नाहीं. उलट घरीं वहिनी मला तेलकट फार खाऊं देत नसे, ते सारे पदार्थ मला मावशीनें आवडीनें करून घातले. पण नरक-चतुर्दशीच्या दिवशीं अंघोळाच्या वेळीं वहिनीच्या आठवणींनें मला कावरे

बावरें केलेंच! सर्व कांहीं ठीक होतें, पण वहिनी जवळ नाहीं म्हणून मी खट्टू होतों. दिवाळी आली आणि गेली—

चार दिवसांनीं मी परत घरीं आलों. वहिनी आजारी असल्याचें दृश्य पाहाताच मला एकदम रडू कोसळलें. खर सागायच तर मला दिवाळीलाच दुसरीकडे पाठवून दिल्याबद्दल मी चागला तिच्यावर रागावणार होतों पण वहिनी कण्हत कुथत बिछान्यावर पडलेली पाहून मला एकदम भडभडून आलें. ' पुन्हा तुला कुठेंही धाडणार नाहीं ' असें वचन मीं तिच्याकडून घेतलें तेव्हाच मी शांत झालों.

माझी शाळा सुरू झाली मीं आतां इग्रजी शाळेंत प्रवेश केला होता. फाव-ल्या वेळीं घरांत वहिनीच्या इंग्रजी ज्ञानाला उजळा देण्याचें काम मीं आवडीनें पत्करले वहिनीचा आजार बरा झाला होता.परतु अशक्तपणा अंगात असल्या-मुळें ती बहुतेक बिछान्यावर पडूनच असे. घरात स्वयपाकाचें काम वहिनीच्या आईनें अगावर घेतलें होतें.

वहिनीची आई आमच्या घरांत आली तो दुर्दिन असला पाहिजे. तिचें सोवळें ओवळें अतिशय कडक असे माझ्या वहिनींचें सोवळें नव्हतें असें नाहीं पण माझा कितीही घोर अपराध असला तरी वहिनी माझ्यावर सहसा रागवत नसे एकादे वेळीं मी हट्टानें तिला शिवलों तर वडील माझ्या अंगावर धावून येत, पण वहिनी मला पाठीशीं घाली आणि माझा मार चुकवी. पण तिची आई आल्यापासून गाडें उलटलें. हरएक क्षुल्लक गोष्टींत ती म्हातारी माझा रागराग करू लागली मीं वहिनीजवळ तक्रार केली तर ती माझी समजूत घाली—पण त्यात जिव्हाळ्याचा भाग बेतास बात असल्याचा मला दाट सशय यई मुलाना थोराची अक्कल नसेल परतु इतरांच्या सूक्ष्म भावना त्याना चटकन् कळत असतात. इकडचा जिन्नस तिकडे ठेवलेला त्याच्या नजरेंतून सुटत नाहीं. वहिनीच्या स्वभावात पडलेला फरक माझ्या ध्यानांत आला. हृदयाच्या असख्य तारापैकीं एकादी तार विसंवादी असावी असा सशय माझ्या बालमनाला आल्यावांचून राहिला नाहीं. पण त्यात माझें काय चुकलें हें मला समजेना !

त्यात वहिनीवर दुसरा एक अतिशय क्रूर आघात झाला. एके दिवशीं

तिला दादानें इस्पितळात नेऊन पोहोंचवलें. तिला घराबाहेर नेलें त्यावेळीं मी शाळेंत होतों. घरीं आल्यावर वहिनीचा बिछाना रिकामा पाहून मीं चौकशी केली.

—पुढे काहीं वर्षांनीं कळून आलें कीं वहिनीला चार महिन्याचा वांखा झाला होता

पधरा दिवसानीं वहिनी परत घरीं आली. पण तिचे तोंड पांढरें फटफटीत पडलेलें दिसलें आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं वहिनी एकाएकीं अबोल झाली होती. तासन्‌तास माझ्या डोक्याशीं वटवट करणारी वहिनी माझ्याशीं सुद्धां बोलायला उत्सुक दिसली नाहीं. मी तिच्या जवळ गेलों तेव्हा तिने माझें डोकें जवळ ओढून घेतलें-पण शब्द एकही नाहीं.

त्यात पुन्हा माझ्या मावशीनें भर घातली. 'वहिनीची आई जर सत्तेनें घरात येऊन राहते तर माझ्या बहिणीच्या लेकराना मी काय दूरची आहें?' असा युक्तिवाद पुढें करून तिनेंही आमच्या घरांत तळ ठोकला. तिच्या बरोबर तिची दोन लहान मुलेंही पण आलीं–आणि त्या दिवसापासून आमच्या घराला चावडीचें स्वरूप आलें. वहिनीच्या आईचें व मावशीचें कधींच पटलें नाहीं. दोघीही बोलण्यांत मुलुखमैदान होत्या. सारा दिवस घरांत कचकच होऊ लागली. वहिनीच्या आईला 'जा' म्हणून सागणें दादाला अवघड वाटू लागलें आणि मावशीला तो हांकलायला तयार नव्हता दादा मावशीचा लाडका होता. त्यामुळें तो तिला दुखवू शकत नव्हता. तशांत मावशीनें नवा पवित्रा टाकला.

"सोयऱ्याधायऱ्यांनी घरांत घुसण्याचा आपल्या माणसांत रिवाज नाहीं. सुनबाईची आई इथें कशाला पाहिजे? मी मुलाची सख्खी मावशी जिवंत आहे. माझ्या बहिणीच्या लेकराना मी दुसऱ्याच्या हवालीं करूं देणार नाहीं—"

अखेरीस निमित्त क्षुल्लक पुरलें. वहिनीच्या आईनें त्रागा केला आणि सर्वांसमक्ष उघडउघड म्हटलें, "माझी मुलगी जिवत आहे तोंवर मी हें घर सोडणार नाहीं. तुम्ही सर्वांनीं मिळून तिचा छळ माडलेला आहे तो मला काय दिसत नाहीं? त्या कारट्याला घेऊन मावशीबाईला कुठेंहि जाऊ

दे. नाहींतरी त्याच्या मुळेच माझ्या पोरीचीं मुलें जगत नाहींत. त्याच्या आईची तीच इच्छा होती—"! असें म्हणून म्हातारीनें भरल्या घरांत गळा काढून ओक्साबोक्शी रडायला सुरुवात केली. मला तिच्या विधानाचा अर्थ स्पष्ट समजला झटकन् मीं वहिनीकडे पाहिले. वहिनीच्या डोळ्यांत मला नेहमींचे वात्सल्य दिसून आले नाही. तिच्या आईच्या बोलण्याचा तिच्या मनावर परिणाम झालेला मला स्पष्ट दिसून आला !

—दुसऱ्या दिवशीं मुक्काम्यानें मीं घर सोडलें. मावशीच्या घरीं जाऊन राहिलों. वहिनी इतकी उलटेल ही कल्पना मला आली नव्हती. सुमारें एक वर्षभर मीं आमच्या घरीं पाऊल टाकलें नाहीं. दादा मधून मधून मावशीकडे येत असे त्याच्या बोलण्यातील खिन्न स्वरावरून मीं ताडलें कीं वहिनीचा आजार वाढतच चालला असावा. अखेरीस मला राहवले नाहीं. मावशीने माझ्या प्रश्नाला उत्तर केलें, " तुझ्या आईचा ससर्ग तिला बाधला आहे. सासूच दुखण सुनेन घेतल आहे—"

मी चमकलो ! वहिनी कदाचित् आपल्याला दिसणारही नाहीं या विचारानें मी अस्वस्थ झालो—आणि एके दिवशीं मावशीला न सागता मी शाळा सुटल्यावर तडक आमच्या घरीं गेलो. पण वहिनी त्या दिवशीं मला दिसली नाहीं. दारातच माझे वडील उभे होते. त्यानीं मला घरांत जाऊ दिलें नाही. आणि पुन्हां बोलावल्याशिवाय घरीं न येण्याची ताकीद दिली.

" पण मला लाबून वहिनीला पाह्यची आहे " मी रडकुंडीस येऊन म्हणालों.

वडिलानीं माझ्या पाठीवर हात ठेऊन म्हटलें, " इतक्यांत नको. तिला थोड बर वाटल म्हणजे मग. लहान मुलांनीं दुखणेकऱ्याच्या जवळ जाऊ नये. आजारी माणसाला त्रास होतो. तुझ्या वहिनीला त्रास होऊ दे का-?"

मी खालीं मान घालून परत फिरलों !

—आणि नरक चतुर्दशीच्या आदल्या दिवशीं दादा मला घरीं नेण्यासाठीं आला ! त्याची चर्या पार उतरून गेलेली दिसली. पण वहिनीनें मला परत बोलाविलें आहे. हा आनंद मला बस्स होता !

मी दारात शिरतांच वहिनीजवळ धांवतच गेलों वहिनी अतिशय खराब दिसत होती. एक वर्षाच्या अवधींत ती पार बदलून गेलेली मला दिसली. मीं जवळ येताच तिनें आपले टपोरे डोळे माझ्याकडे लावले.

"बापू—, बापू—," म्हणून म्हणत तिनें आपले डोळे स्वतःच्या क्षीण हातांनीं घट्ट दाबून घेतले व ती रडूं लागली. दादा मला हाताला धरून उभा होता. मीं झटकन् त्याच्या हाताला हिसडा मारला व माझा हात सोडवून घेतला. तेथें जमलेल्या माणसाच्या विरोधी शब्दांना न जुमानता मी धावत वहिनीजवळ गेलों आणि तिच्या गळ्यांत गळा घालून मुक्त कंठानें रडू लागलों. माझ्या आईपासून मी एक वर्ष दूर कसा राहू शकलों?

—दुसऱ्या दिवशीं सकाळीं वहिनींनें पडल्यापडल्या माझ्या डोक्याला वासाचें तेल लावलें. कोपरापर्यंत गेलेल्या बांगड्या एका हातानें सावरून धरीत तिनें माझ्या पाठीवर तेलाचीं बोटें पुसलीं. वहिनीच्या आईनें मला अंघोळ घातली, पण शेवटीं एक तांब्या माझ्या डोक्यावर घालण्यासाठीं वहिनी हट्ट धरून बसली. मीं ताब्या भरून घेतला आणि तिच्यापुढें ओले-त्यानें उभा राहिलों. मोठ्या समाधानानें तिनें तो ताब्या माझ्या डोक्यावर उपडा केला ! मला ओवाळण्याची तिची इच्छा मींच पूर्ण केली. निरांजन तबकात घेऊन मी तबक हातात पकडलें व वहिनीनें तबकाला नुसता हात लावला.

"शतायुषी व्हा—" म्हणून तिनें क्षीण हास्य करून म्हटलें !

तबक देवाजवळ नेऊन ठेवलें व मी वहिनीच्या अथरुणावर तिला अगदीं चिकटून बसलों. वहिनीनें माझा हात घट्ट पकडला आणि म्हटलें, "बापू, माझ्यावर रागावू नकोस. एक क्षणभर मी चुकलें. आईच्या बोल-ण्याची मला भुरळ पडली अन् मी तुला, माझा पहिल्या पाडसाला विसरलें. बापू खरच साग. मी तुझी आई आहे न ? आहे न ? "

मला काय बोलावें हें सुचेना. मी बोलून गेलों, "वहिनी, तूच माझी खरी आई आहेस. मी मोठा होईन. खूप मोठा होईन. पण तुझी आठवण मी कधींही विसरणार नाहीं. ज्या वेळी माझ्या मरणाचा क्षण येईल त्यावेळीं

मी आई म्हणून हाक मारीन ती तुलाच ! वहिनी, खरच का ग तू बरी होणार नाहींस ! अस ग काय करतेस–? "

वहिनीनें एकदम डोळे फिरवले–आणि माझा हात हातांत ठेवून तिनें आपली यात्रा पुरी केली !

दिवाळीचा पहिला दिवस नरकचतुर्दशीचा. त्या दिवशीं माझी ही लाडकी आई गेली ! हें दुःख मीं माझ्या कुटुंबियांपासून आजवर दडवून ठेवलें आहे.

वर्षाचे बाकीचे दिवस माझे आनदांत जातात. पण हा एकच दिवस, 'फक्त एकच क्षण, आणि तोहि अंघोळीच्या वेळचा– मला अजून उदास करून सोडतो– !

● ● ●

# गोड सोबत. ८

सुमतीशीं लग्न झाल्या दिवसापासून मोजून तीनशेंपासष्ट दिवस चिंतू तिच्या आवतींभोंवतीं घुटमळत असे. टाळक्यावर अक्षदा पडण्याचा अवकाश कीं, चिंतूनें सुमतीला हाताला धरून तडक मुंबई गांठली. आई म्हणत होती, 'अरे! चार दिवस मला सासूपण मिरवूं दे.' वडील चिरडीस गेले. थोरला भाऊ 'जशा कांहीं आम्हांला बायका नाहींतच' म्हणून खवचटपणानें बोलला—साऱ्यासाऱ्यांनीं मोडता घालण्याचा करून प्रयत्न केला—पण चिंतू सगळ्यांचें बारसें जेवला होता.

चिंतूनें कोणाचें ऐकलें नाहीं. लग्नाच्या चवथ्या दिवशीं तो सुमतीला घेऊन मुंबईस निघून गेला. तसा चिंतू मोठा घटनाकुशल होता. लग्नापूर्वी एक वर्ष त्यानें गृहिणीच्या स्वागताची तयारी करून ठेवली होती.

भाजी चिरण्याची विळी घरांत होती. किसणी होती, वेळणी होती. चहादाणी होती. दोन सिमेंटच्या शेगड्या, त्यांवर दोन स्वच्छ फडकीं खिळ्याला लटकलेलीं—हा सर्व थाट पाहून सुमती पहिल्याच दिवशीं आश्चर्यानें थक्क होऊन म्हणाली, "काय ही घाई!"

चिंतू डोकें खाजवीत म्हणाला—"घाई! कसली घाई! उलट तूच उशीर केला आहेस."

सुमतीनें पतिराजांना पहिल्याच दिवशीं ओळखलें! पण तिनें जाणीव दिली नाहीं.

एक वर्षभर चिंतूनें मन लावून संसार केला. कंजूष माणसाच्या खबरदारीनें त्यानें आपल्या ठेव्यावर बारीक नजर ठेवली. एका मित्राला आपल्या घरीं फिरकू दिलें नाहीं. घरात वाऱ्याला आणि उन्हाला प्रवेश मिळत होता या औदार्यावरच चिंतू खूष होता !

सुमतीला पतीचें वागणें चमत्कारिक वाटलें. वर्षभर माहेर, सासर नाहीं. ही काय रीत झाली ? जनलज्जा तिला अनेकदा बेचैन करून सोडी. परतु तिनें चिंतूला विरोध केला नाहीं.

चिंतू बावळट आहे पण प्रेमळ आहे, हें तिनें जाणलें. त्याच्या कलानें घेतलें तर आपल्याला कशाचीहि उणीव भासणार नाहीं हें तिला समजलें. पण एकच गोष्ट तिला खटकत होती चिंतूनें आपल्यावर असा सक्त पहारा ठेवावा हें तिला पटलें नाहीं. टोपलींत वेटोळें घालून बसलेल्या सर्पाला ज्या प्रमाणें गारुडी जपतो त्याप्रमाणें पत्नीला पतीनें वागवावें हें तिला आवडलें नाहीं.

एकदां ती चिडून म्हणाली देखील, "मी काय कुठं पळून का जातें—"

चिंतूनें उत्तर केलें, " तें तुला समजायच नाहीं—-कॉलेजांत एक वर्ष तूं होतीस—? "

" होतें ! बर मग—?"

" बर मग, काय ? तें आतां विसरा. नवरा म्हणजे वर्गातला दोस्त नसतो.—" चिंतू म्हणाला.

सुमतीनें पाहिलें कीं स्वारी अडूनअडून बोलते आहे. ठीक आहे ! आज ना उद्यां वेळ येईलच !

एक वर्ष उलटून गेलें. चिंतूची आई खवळून गेली. लाडका पोरगा म्हणून एक वर्ष तिनें गय खाल्ली. मंगळागौरीसाठीं सुनेला आणलच पाहिजे म्हणून तिनें त्रागा केला. चिंतूचे थोरले बधु मुबईस आले.—–आणि आठ दिवसांच्या बोलीनें वहिनीला घेऊन परत गेले. " आठ म्हणजे आठच दिवस बर का—" चिंतूनें रावणासारखा चेहरा करून बधुराजाना बजावून सागितलें. " आठाचे नऊ झाले तर यज्ञोपवित तोडीन-" म्हणून बंधुराजांनीं गभीरपणानें निर्वाळा दिला.

एक एक दिवस चिंतूनें मोठ्या कष्टाने ढकलला.

विरही प्रेमिकाचें वर्णन करणे अशक्य आहे. संसाराला विटलेल्या एकाद्या तुकारामानें देखील चिंतूची दुर्दशा पाहून 'येणे दुःखें माझा फुटों पाहे प्राण–' म्हणून टाहो फोडला असता. 'याचा आपगिता कोण ?' म्हणून रामदासाने देखील हंबरडा फोडला असता. असलें हे भयंकर दुःख चिंतूनें कसें सहन केलें असेल हे त्याचे त्यालाच माहित !

सिगारेटची चव राहिली नाहीं, साखर कडू लागूं लागली. बाळा भागवताच्या खानावळींतलें रुचकर अन्न त्याला विषासमान वाटू लागलें. त्यानें अन्न वर्ज केलें. नुसत्याच शेवगाठियावर तो दिवस ढकलू लागला. प्रियतमेच्या सान्निध्यात गोड वाटणारा सागर आता एकदम खारट बनला ! किनाऱ्याच्या कुशींत लपणाऱ्या लाटा पाहून त्याचे मस्तक भणाणून गेलें. सिनेमाच्या पाट्या पाहून त्याला डोकेंदुखीचा रोग उपटल्याचा भास होऊ लागला ! चाळींतल्या तरण्याताठ्या पोरींचें बेताल हसणें कानावर येऊ नये म्हणून तो तोंडावर पांघरूण घेऊन झोपू लागला ! पण हाय ! झोप त्याला कशी यावी ?

रस्त्यावर गेल्याशिवाय मुंबईत आकाशातला चंद्र दिसत नसतो ही त्याच्या दृष्टीनें इष्टापत्तीच होती. चंद्राच्या कल्पनेने त्याच्या अंगावर कांटा उभा राहू लागला ! चंद्र नको, चांदण्या नको—पत्नी परत येईपर्यंत सगळ्या रात्री अमावास्येच्या असाव्यात असें त्याला वाटू लागलें.

एक दिवस गेला, दुसरा गेला, तिसरा चौथा, पांचवा, सहावा-उद्यां नववा दिवस. उद्या सकाळच्या मेलनें सुमती आलीच पाहिजे— ! गाडी स्टेशनवर अकरा वाजता येणार म्हणून स्वारी नऊ वाजता स्टेशनवर हजर झाली. हो ! त्याचा काय नेम ? गाडीच ती बोलून चालून ! एकादे वेळीं उशीरा येते–एकादे वेळीं तास दोन तास लवकरही यायची !

पण गाडी त्याच्या कल्पनेइतकी लहरी ठरली नाहीं. उलट नित्याप्रमाणें दहापाच मिनिटें उशीर करूनच आली. धडधडत्या अंतःकरणानें, टांचा वर करून चिंतू डबे धुंडाळूं लागला !

सुमति त्या गाडीनें आली नव्हती !

चितूच्या डोळ्यांनीं सर्व डबे विंचरून काढले. बायकांच्या डब्यात निर्लज्जपणानें डोकावून पाहिलें गाडीच्या दीडखणी डब्यात वाकून पाहिलें आणि अखेरीस कोंबड्यांच्या टोकऱ्या ठेवण्याच्या खुराड्यातही नजर फिरवली! कोंबड्यांनीं या विनयभगाबद्दल खूप जोराची ओरड केली.

गाडी निघून गेल्यावर पधरा मिनिटांनीं हा खवळलेला दुर्वास परस्पर हापिसात गेला! त्या दिवशीं तो जेवला नाही. साहेबाला कच्चा खावा आणि तेवढ्याच अन्नावर भूक भागवावी असला भयानक विचार त्याच्या डोक्यांत दहा बारा वेळा चमकून गेला. पण तो काळ साहेबाच्या सत्तेचा होता!

दुपारीं डोकें दुखण्याच्या सबबीवर ता घरी आला घराचें कुलूप त्यानें काढलें, लावलें आणि पुन्हा काढले दारात पत्र पडलेलें दिसलें— पत्रावरचें हस्ताक्षर त्यानें ओळखलें. सुमतीनें लिहिलें होतें–

" उद्यां सकाळीं येतें. भाऊजींचा फार आग्रह पडला. स्टेशनवर जरूर या, ह!— "

पत्राचा चोळामोळा करून त्यानें तें पत्र शेगडीच्या दिशेनें फेकून दिलें.

उद्या सकाळीं येतें काय?

भाऊजींचा फार—फार आग्रह पडला, नाहीं का–?

अन् स्टेशनवर जरूर या–ह–! ह–ह! ह–काय? अग, मायाविनी! अगात ताकद असती तर चितूनें त्याक्षणी पृथ्वीची शाडूमाती करून टाकली असती. परवानगी असती तर जगाला आग लावून सोडली असती. काय बायको आहे का चेष्टा आहे?

खिशातलें सिगारेटचे भरलें पाकीट त्यानें तावातावानें रस्त्यावर फेकून दिलें. खिशातलें घड्याळ काढून घेऊन नतर अंगांतला कोट त्यानें कोपऱ्यातल्या गादीवर भिरकावून दिला. मोरीच्या कट्ट्यावरची तपेली त्यानें पोचा न येईल अशा बेतानें दहाबारा वेळा फरशीवर आपटली. कपाटाला लावलेला आरसा खळकन फोडण्यासाठीं त्याचें मन उतावीळ झालें. पण काचा आपल्यालाच गोळा कराव्या लागतील या विचारानें तो जास्तच सतापला! कपाटाची मूठ धरून त्यानें दार उघडलें. पत्नीचें घडी करून ठेवलेलें पातळ त्याच्या डोळ्यात सलू लागलें. आवेशानें त्यानें ती घडी मोडून

टाकली. पातळाची वेडीवाकडी गुडाळी करून त्याने कोपऱ्यात भिरकावून दिली.

पतीला फसवणाऱ्या पत्नीला हें शासन झालेच पाहिजे. या विचारानें त्याला त्यातल्यात्यात जरा बरें वाटलें

खालीं काय आहे ? अंगठी काय— ? देऊ का रस्त्यावर फेकून—?

त्यापेक्षा आपणच घालावी ! पुन्हा तिला द्यायचीच नाहीं. बस म्हणाव !

दुसरा ड्रॉवर त्यानें उघडून पाहिला. आणि कसलें तरी पुस्तक त्याच्या हातास लागलें—!

सुमतीची डायरी होती ती !

दात ओठ खाऊन चिंतू ती डायरी फाडून टाकण्याचा विचार करू लागला—आणि--सहज सातव्या पानाकडे त्याची नजर गेली ! घाईघाईनें तो त्या पानावरील मजकूर वाचू लागला !

" ता. ७ :—विजय, आजही दिसलास. पण मला धीर झाला नाहीं. किती किती तुझ्याशीं बोलाव म्हणून मला वाटत ! पण जीभ रेटत नाहीं रे-!"

चिंतूच्या कपाळावरच्या शिरा तट्ट फुगल्या ! पुढील मजकूर तो वाचू लागला—

" ता. ९: तू आज दिलेला रुमाल मी आजन्म हृदयाशीं बाळगीन. तो रुमाल म्हणजे, माझें जीवनसर्वस्व आहे तूं दूर गेलास म्हणजे तुझी स्मृति आणि तो रुमाल या दोन गोष्टींचाच आधार आहे. हो ! बाबाना केव्हां विचारणार आहेस तू—! आता गडे फार उशीर नको--! "

चिंतूचें डोकें गरगर फिरू लागलें--!

चाडाळणी, पतीशीं हा लपडाव--? त्यापेक्षा मेली का नाहींस–?

उद्या येऊ दे ! हा पुरावा तिच्या पुढे टाकतों—अन् जाब मागतों !

हिमालयात जाण्यासाठीं निघालेल्या विरक्ताच्या थडपणाने चिंतूनें स्टेशनवर दुसऱ्या दिवशीं पत्नीचें स्वागत केलें ! सुमताने त्याला पाहून डब्याच्या खिडकींतून हातरुमाल फडफडवला ! पण त्यामुळें चिंतूच्या डोळ्याच्या पापण्या देखील फडफडल्या नाहींत. प्रेमाची ऊब सपली होती.

सुमतीनें फलाटावर पाय ठेवीत म्हटलें, " कां–! फार राग आलाय वाटतं एका माणसाला—? "

चिंतूनें गाडीच्या टपाकडे न्याहाळून पाहात उत्तर केलें, " माणूस गेला खड्डयात—!"

" बरं बाई राह्यलं ! पण घरीं तर येणार नं ! म्हणजे सगळ कांहीं खुलासेवार सागतें—'

" आणि तें सगळ खुलासेवार ऐकून घेण्याची माझी तीव्र इच्छा आहे. काहीं लपवलस, चाचरलीस, अडखळली, गोंधळली—तर याद राख—!" चिंतोपत गभीरपणानें म्हणाले

"अय्या—!" सुमती वाकड्या मानेनें त्याच्याकडे पाहून हसू लागली !

" तें अय्या अन् भैय्या बंद कर—! आधीं ती बॅग उचल—"

" होय का—? एका दिवसाच्या फरकान मी हमाल झालें वाटत ? बॅग तुमची आहे. त्यात कपडे आहेत माझे. पण पैसे तुम्ही मोजले आहेत. गरज असेल तर उचला—नाहींतर—" म्हणून म्हणत सुमती पुढें चालूं लागली !

चिंतूनें बॅग उचलली. तीच बॅग सुमतीच्या टाळक्यात मारावी असे त्याला मनापासून वाटत होतें—पण–!

घोडागाडींत बसल्यावर चिंतूनें सुमतीच्यापासून दूर सरकून म्हटलें, " मला तुला काहीं विचारायच आहे, एका गोष्टीचा मला जाब पाहिजे आहे. जीवन मरणाचा प्रश्न आहे— '

सुमतीनें प्रवासांत बडखोर बनलेले केस दोन बोटानीं मागें सारीत आश्चर्यानें म्हटलें, " घरीं जाईपर्यंत दम निघेल का ? "

" तुला पुन्हां सागतों. ही चेष्टा नाहीं.—"

" बरं–बर–! पण गडे, एका दिवसाचा एवढा कसला राग ? भाऊजी तर म्हणत होते—"

"तो–? एक नंबरचा डॅबीस आहे. जानवं आहे का त्याच्या गळ्यांत ?" चिंतू चवताळून म्हणाला !

" इश्श ! मी कशाला त्यांचा गळा तपासायला जाऊ—? " सुमतीनें मान उडवून उत्तर केलें—!

घरात आल्यावर चिंतूने पुढचे दार घट्ट लावून घेतले. दाराला कडी. कडीला कुलूप आणि त्या कुलुपाची किल्ली स्वतःच्या खिशात ! आतां लट-पट उपयोगाची नाही ! शहानिशा झालीच पाहिजे ! सोक्षमोक्ष लागलाच पाहिजे. पतिराजाच्या या विनोदी वागणुकीकडे पाहून सुमति म्हणाली, "बरं–! प्रवासातल पातळ बदलण्याची परवानगी मिळेल का ? का —आधीं ? "

" लाज वाटत नाहीं तुला—?" चिंतू हाताच्या मुठी वळून त्वेषानें म्हणाला.

" म्हणजे—? मी नाहीं समजलें ! इश्श ! असे तिरसिंगरावासारखे चिडता काय—? जन्मभर तुमचीच आहे कीं—" सुमती लडिवाळपणानें बोलूं लागताच चितू जरा दूर सरकून जास्तच त्वेषानें ओरडला.

" बेशरम ! करून सवरून पुन्हा हे ढग—? तुला काय वाटल, मी बोळयानें दूध पितों —?"

आता मात्र सुमती गंभीर झाल्यासारखी दिसूं लागली ! कोपऱ्यातल्या खुर्चीवर बसून ती शातपणे म्हणाली—

" तुम्ही बोळयानें दूध प्या, नाहींतर बोंडल्यानें प्या ! पण काय हो, एकदा माझी लाज काढलीत. एकदा शरम काढलीत. लाज, शरम, अब्रू मला आहेत त्याप्रमाणें तुम्हालाही असतीलच कीं—"

" सुमती, मी पुराव्याशिवाय बोलणारा नाहीं. जे तीन शब्द तू आतां उच्चारलेस ते सर्व माझ्याजवळ आहेत पण तुझ्याजवळ त्यापैकीं एकही नाही. थाब बोलूं नकोस–ही घे तुझी डायरी. पान ७ काढ अन् पुढचीं पचवीस पान वाच—" चिंतूनें खिशातली डायरी तिच्यापुढें फेंकून म्हटलें. डायरीकडे न पाहता पूर्वीच्याच थडपणानें सुमती म्हणाली, " मींच लिहिलेलें मला वाचायला सागण्यात काय मतलब आहे ? एकूण एक अक्षर पाठ आहे मला —"

" चाडाळणी, आणि हें पाप कबूल करण्याइतपत तूं कोडगी आहेस–?"

" हें पहा–शिव्या देऊ नका. "

आतां मात्र हद्द झाली. चितू चवताळून म्हणाला, "मला तुझा हा कांगावा नको आहे. हा विजय कोण–? ह्याचा तुझा संबध काय? अन् हा मूर्खपणा किती दिवस चालला होता हें मला समजलें पाहिजे–"

"हात्तिच्या! मग एवढ ओरडता कशाला? सांगतें ऐका. तुमचा अन् सुशिलेचा मूर्खपणा जितके दिवस चालला होता त्याच्या निम्म्यानं सुद्धा आमचा मूर्खपणा टिकला नाहीं—का हो–? चेहरा का पडला?"

चितूनें कपाळावरचा घाम उजव्या हाताच्या पजानें निरपून टाकला! घोगऱ्या आवाजात तो म्हणाला–

"सुशिलेन गैरसमज करून घेतला. माझा अगदी शुद्ध हेतु होता. एकाद्या भोळ्याभाबड्या तरुणानं मनात भरलेल्या तरुणीला जर सरळ मनान संसाराच्या भागीदारीच्या हेतू ऐकवला तर—"

"तर त्यांत खेटराखेटरीवर येण्याची काय जरूरी आहे? अगदीं बरोबर आहे! मीं सुशिलेला हेंच सागितलं. तिला माझ म्हणणं तितकम पटलं नाहीं व्यक्ति व्यक्तींत फरक पडायचाच, नाहीं का—? आम्हीं दोघी मैत्रिणी. पण दोन वर्षांपूर्वी तिन तुम्हाला पाहून पायातली चप्पल काढली अन् मी तुमच्या गळ्यात फुलाची माळ घालून तुमच्या शिव्या खायला तुमच्या घरात आलें—!" सुमती बोलतां बोलतां मधेंच थबकली!

छेः! चितूनें पाहिलें कीं हें मनासारखे घडून येत नाहीं! यात आपला मुद्दा येतोच कसा—?

तुसडेपणानें तो म्हणाला, "पण तो तिचा निव्वळ गैरसमज होता! माझा हेतू तिन समजून घेतला असता —"

"पुन्हां पुन्हा तेंच तेंच कशाला सांगता–?" सुमती डोळे बारीक करून म्हणाली.

"नाहीं. म्हणजे अस कीं, त्यात माझा काहीं दोष नव्हता. आणि तूं तर लेखी अडकली आहेस–" चितू आवेशानें म्हणाला.

"अस्सं? म्हणजे मी कबूल करण्याचं नीतिधैर्य दाखवतें आणि तुम्ही अजून नाकबूल जाता म्हणून मी त्यांतल्यात्यात जास्त दोषी असंच कीं नाहीं—?"

" हें पहा हा चावटपणा पुरे झाला मी पुरुष आहे मी वाटेल तें करीन मला जाब विचारण्याच धाडस तू करूं नकोस—" चिंतू गुरगुरूं लागलेला पहाताच सुमती स्वतःशींच हसूं लागली.

थोड्या वेळानें ती म्हणाली, " हो ! हें मी अजिबात विसरत होतें ! चुकलच माझ. नीति बिघडते ती फक्त स्त्रियाच्या मुळेंच. हा दडक माझ्या ध्यानात राहिला नाहीं. पुरुषांचा आणि नीतीचा काय संबंध—— ? बरोबर आहे—— ! मग—— ? काय शिक्षा देणार मला—— ? समुद्रात टाकून देता ? कीं——गाडीखालीं लोटून देता—? कीं—अंगावर रॉकेल ओतून काडी लावून देता——? "

" काय बायको आहेस का कोण आहेस ? करून सवरून ही शिरजोरी तुझ्या अंगात—? इतकी बनेल असशील अस मला लग्नापूर्वी कळलं असत तर ब्रम्हचारी म्हणून मेलो असतों पण तुझ्या आसपास पन्नास मैला-पर्यंत फिरकलों नसतों.— " कडवट मुद्रा करून चिंतू म्हणाला !

" अयाऽई ! "

" सुमती, तुला एकदां सांगतों, तुझ नाटक माझ्यापुढें नको. मला हा जाब मिळालाच पाहिजे हा विजय कोण आहे ते मला कळलच पाहिजे. नाहींतर नाहींतर-माझ्या ससारात तुला भागीदारी मिळणार नाहीं—" चिंतू निश्चयाच्या सुरात म्हणाला.

* * * *

" म्हणजे मला घराबाहेर काढणार होय ? होय का—ठीक आहे. मामंजींना, सासूबाईना निरोप काय सागू तुमचा ? जाऊबाई विचारतील; भावजी जरूर प्रश्न करतील. इथें तुमचे मित्र तुम्हांला विचारणारच माझ्या मैत्रिणी अन् आईबाप विचारतील. ह्या सर्वाना मी काय सागू—? तुमचा एकादा सदेश द्या कीं—"

" तुझ तोंड पाहण्याची मला इच्छा नाहीं——" जागचा उठून चिंतू आवेशानें म्हणाला !

सुमतीनें त्याला पुनःजाग्यावर बसवलें. त्याच्या अंगांतला कोट तिनें काढला व कपाटावर ठेवून दिला. त्याच्या शर्टच्या गुड्या सोडीत ती

हसत हसत म्हणाली, " एक वर्षात ही माझी परीक्षा केलीत— ? तुम्हाला आतां काय म्हणाव–? कुठल्या तरी इंग्रजी कादबऱ्या अन् गोष्टी वाचता आणि त्याच चष्म्यातून आपल जीवन पडताळून पहाता ! अहो, माझ्यापेक्षा तुमचं शिक्षण जास्त आहे थोडा वेळ विचार करा कीं, आपल्या इकडच्या सर्व सामान्य मुली इतक्या का वाहवत गेल्या असतात ? तुमच्या स्वभावाचा मीं पारख केली. तुमची नजरकैद मला अगदीं नको झाली. आणि म्हणून हें सगळ मीं लिहून काढल. तुम्ही हपिसांत गेल्यावर मी मोकळी असे. बाहेर जायच नाही, बाहेरच कुत्र घरात आणायच नाहीं. मग एकटी करू तरी काय ? म्हणून म्हटल जरा तुमची गमत करावी. ह—बसा असें नीट आता जरा पाहू—"

चिंतू गोंधळून म्हणाला, " हे तू खर सागते आहेस— "

"पुन्हां संशय! वेताळ पचविशी, शुकबहात्तरी नावाचे अमूल्य ग्रथ याच कारणामुळें निर्माण झाले. अहो, कुठला आला आहे डोंबलाचा विजय— ? एके दिवशीं आईन लग्नाच विचारल, बाबानीं विचारल— मी 'हो' म्हटलं. नंतर तुम्ही मला पाहयला आलात. त्यावेळीं मींच तुम्हाला पाहिलं. तुम्हीं तर मानही वर केली नाही. त्याचक्षणीं तुम्ही माझे विजय ठरला. आयुष्यात मनासारखा जोडीदार लाभणें हा बायकाचा विजय नाहीं का ! एवढ कस तुमच्या लक्षात आल नाही— ? समजा जर एकादा खराच विजय माझ्या जीवनात यापूर्वी डोकावून गेला असता तर त्याला मी तुमच्यापासून दडवून नसता का ठेवला— ? "

" का ?— "

" का— ? सुशिलेची हकिगत तुम्हीं माझ्यापासून कां दडवून ठेवलीत-? त्याच कारणासाठीं. उगाच बभ्रा करण्यात काय अर्थ आहे— ? माझ्या जीवनात दुसरा एकादा विजय पूर्वी आला असता तर मी त्याची ओळख देखील तुम्हाला होऊ नये म्हणून झटलें असतें डायरी फाडून, जाळून टाकली असती मागमूस देखील ठेवला नसता.— ! बरं— आतां तरी कपडे बदलू का मी— ? अन् बरोबर काय काय आणल आहे मीं खाण्याच-? हं— ? "

चिंतू जागचा उठून बसला! त्याच्या साऱ्या वृत्ति उफाळून आल्या–! या खेपेच्या पत्नीचा शेवटचा 'हं' त्याला पंचपक्कान्नापेक्षां जास्त गोड वाटला!

सुमतीचे दोन्ही दंड पकडून तो म्हणाला, "हं-हं-हं! किती गोड 'हं' म्हणतेस पण! पुन्हां एकदा म्हण पाहू—."

"अ–ऽऽऽ हं–" सुमतीनें त्याच्या हाताच्या विळख्यांतून स्वतःची शिताफीने सोडवणूक करून घेत म्हटले–.

तिच्या पाठीवर रुळणाऱ्या लांबसडक शेपट्याचें टोक हातांत धरून चिंतू खेळकरपणानें म्हणाला–, "पांचा पेडी वेणी मामानें उकलली, कन्यादा-नाला उभी केली–सुमाबाईला–"

"हं–! पुरे आता. प्रेमाचं अजीर्ण झालं म्हणून हें औषध तयार करावं लागलं मला! प्रत्येक खेपेला नवीन औषध तरी कुठलं आणू—? इश्श, हें काय हें–?"

"किती गोड माझी सुमा. सुमा गोड अन् तिची सोबतही गोड"

● ● ●

## बाळपणीचा दोस्त ९

दामोदरपंताच्या कपाळीं कोंकणातल्या दारिद्र्यानें स्वहस्तानें लेख लिहून ठेवला होता. रत्नागिरीपासून दहाबारा मैल अंतरावर त्याचें गांव होते. गावाची प्रसिद्धी एका स्वयंभु देवतेच्या स्थानावर आधारली होती.

पण उत्पन्नाच्या दृष्टीनें त्याचा फारसा उपयोग नव्हता.

तरी पतांनीं इतके दिवस ' ब्र ' काढला नाही, दारिद्र्याबरोबरच त्यांनीं अल्पसतुष्टपणाचाहि हात धरला होता. आळवाची खाच होती, दोन माड होते, चार आंब्याचीं झाडें होतीं — एक भातखांचर होतें. एवढ्यावर आपलें भागेल असे त्याला वाटत होतें.

पार्वतीबाई धीराची बाई—पण ' अष्टपुत्रा सौभाग्यवती— ' म्हणून ब्राह्मणानी औपचारिक रीत्या उच्चारलेला आशीर्वाद खरा होण्याची शक्यता दिसू लागतांच तिच्या तोंडचें पाणी पळालें. त्यातून आज मीठ आहे तर तिखट नाही. महिन्यातून पावशेर रॉकेल मिळण्याची सोय, बरोबरीनें मुगळयाचीं प्रेतें असणारा काळा कच्चा गूळ, ' रेशनींग ' चा जळका तांदूळ—सुगृहीणी झाली तरी तिनें यापुढें काय कपाळ आपटून घ्यावें ?

दाडीवरचें लुगडें दोन वर्षांपूर्वी घेतलेलें होतें—अंगावर गुडाळून घेतलेलें फडकें तीन वर्षांपूर्वीचें होतें. त्याला आडवे दड झाले—उभे दड घालून पाहिले. घरात पैसा नव्हता. धान्य नव्हतें. दिवसेंदिवस लोक अश्रद्ध बनूं

लागले तर देवाच्या आधारावर पुजाऱ्यांनीं जगावें तरी कसें ? प्रसग मोठा बाका होता—

परतु फाटक्या अगाचा दामोदर, पडवीला बसून मुलाना मोरोपताची आर्या म्हणायला सागत होता—

" ऋणतर मुष्टी पोहे, त्याच्या व्याजात हेमनगरी ती ।
मुदलात मुक्ति देणं, ही कोण्या सावकारिची रीती ॥ "

एका मुलानें तक्रार केली, " भूक लागली—-"

पतानीं डोळे वटारून त्याच्याकडे पाहिलें.

दुसरा धिटाईने म्हणाला— " आईन मागच्या राहिलेल्या जोंधळ्याच्या कण्या शिजवल्या आहेत—" तिसरा हळूच उठून उभा राहिला

" हें अस किती दिवस चालणार ?" पार्वतीबाईनी उदास मुद्रेनें प्रश्न केला !

" मगलमूर्तीला भक्ताची काळजी आहे कर्ता करविता तो आहे. विघ्नहर्ता म्हणून त्याला जग ओळखत आहे—" दामोदरपताचें हे ठराविक भाषण ऐकून पार्वतीबाईनीं तिरस्काराने मान फिरवली.

" पण आपल्याला जग ' विघ्नहर्ता ' म्हणून ओळखत आहे याचा देवाला विसर तर पडलेला नाहीं न—-? " पत्नीच्या या पाखडीपणाचा अचबा वाटून पत म्हणाले, " वाकड बोलल म्हणजे काही शाहण म्हणत नाहींत कुणी ! " पार्वतीबाई एकाएकी खवळून म्हणाल्या, " मी गाढव आहें हो ! बायका गाढव असतात, त्या नालायक असतात हे तुमच्या पुराणांत चक्क लिहून ठेवलेल आहे. पण गाढविणीलाहि पोट असत हे कस विसरून चालेल ? आणि तिच एक राहो पण तिच्या पोटीं जन्म घेतलेल्या इंद्राच्या तट्टांना दोन्ही वेळेला कांहीतरी खायला द्यावं लागत, त्याची काय वाट ? "

पंत चूप बसले पत्नीनें आपल्यावर मात केली आहे हें त्यानीं पुरेपूर जाणलें. मनाचा कांहींतरी निश्चय करून ते म्हणाले, " उद्यां रत्नागिरीला जातों. किसनशेट काहीं देतो का पहातों—-"

पंतांनीं बोलल्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं रत्नागिरी गाठली. किसनशेट हा

त्यांचा वर्गबधु. पण व्यापारी पेशाच्या माणसाला नातीं ठेवणें परवडत नाहीं. पंत ज्या वेगानें त्याला आपला मानीत त्याच वेगानें तो पतांना तुपला समजून दूर ठेवी. गरजवतानें अकलेचें गाठोडें गुडाळून ठेवायचे असतें. पतानीं त्याची खूप अजीजी केली. दगडाला देव मानून त्याची रोज पूजा करण्याची त्यांना सवय होतीच. पण त्या गणपतीचे मौन आज किसनशेटच्या अंगात सचारलें--!

इतक्यात दुकानावरून एक ताशा वाजत जाऊ लागला. काय आहे तें पाहण्यासाठीं पत रस्त्याकडे पाहू लागले सिनेमाची जाहिरात एका लोखडी हातगाड्यावर मिरवत चालली होती. एका बाईचें चित्र होतें. तें चित्र पाहून त्याना मेल्यासारखें झालें! किती घाणेरडें तें चित्र दिसत होतें. खालच्या बाजूस लिहिलेलीं अक्षरें त्यानीं वाचलीं—आणि एकाएकी ते चमकून ताठ उभे राहिले.

मास्टर कृष्णराव! मास्टर कृष्णराव! डायरेक्टर मास्टर कृष्णराव—! हं—हा —कोण बर—? चटकन् किसनशेटकडे वळून ते म्हणाले, "शेटजी हें नांव आठवतं का तुम्हाला—?"

किसनशेटनीं अक्षरे वाचून पाहिलीं अन् बेफिकीरपणानें म्हटलें, "आरे, तो साला आपल्या वर्गामदी मारामाऱ्या करणारा पोट्टा! मुबईला बापासगट निघून गेले—अन् आतां शिणीमा कपनींत बध्धा डायरेक्टर होऊन राहिले लई लई खट्याळ! पण पोट्यानें नशीब काढला. नाहींतर तुम्ही आम्ही—"

पताच्या डोक्यात तुफान वादळ माजून राहिलें. बराच वेळ ते त्या पाटीकडे पहात राहिले. पाटी दृष्टिआड होईपर्यंत त्याच्या मनाचा ठाम निश्चय झाला नाहीं. नतर ते किसनशेटला म्हणाले, "शेटजी, तुम्हाला कृष्णाचा पत्ता माहीत आहे का?"

चमत्कारिक मुद्रेने पताकडे पाहून किसनशेट म्हणाला, "काय तुमचाबी डोका फिरला काय? तो काय तुमास्नी विष्टेट लिहून देल काय? हे पायलीभर तादूळ घे आन् गुमान रस्ता सुधार बाबा—"

पतानीं तांदूळ तर घेतलेच पण मास्टर कृष्णरावाचा पत्ताही पण मिळवला.

पाटीच्या पाठोपाठ हिंडत ते थिएटरजवळ आले. मालकाची गांठ घेतली—पत्ता एका कागदावर लिहून घेतला—आणि सध्याकाळीं दिवस बुडण्याच्या आंत आपल्या गावीं येऊन दाखल झाले!

आणि एक महिन्यानतर त्याना रत्नागिरीच्या पोस्टाच्या शिक्याचें पत्र गांवांतल्या एका माणसानें आणून दिलें. पत्र वाचून पहाताच पताचा आनंद गगनांत मावेनासा झाला. ते धावतच घरीं आले. पत्नी अंग धुवून कोरडे वस्त्र परिधान करीत होती. तोडाने व्यकटेश स्तोत्र चालू होतें—तरी तिला मध्येंच अडवून ते म्हणाले—

" उद्या रत्नागिरीहून बोटींनं मुंबईला जाणार आहे मी. "

निऱ्याचें केळें बनवून त्यावर हलकेच मुठीनें दाब देत पार्वतीबाई म्हणाल्या, " उडदामाजी काळें गोरे, काय निवडावें निवडणारें, कुचलियाचीं वृक्ष फळे, मधुर कोठोनीं असतील?' मुबईला? अन् मुंबईला कुणी गाठोंडं न्यायला बोलावल आहे तुम्हाला—? "

दामोदरपत पत्नीची कींव करण्याच्या सुरांत म्हणाले, " हें बघ माझ्या दोस्ताच पत्र—ह्यांत मला मोठ्या प्रेमानं बोलावल आहे. रत्नागिरीला भाऊ दीक्षिताच्या शाळेत आम्ही शिकत होतों. पंचवीस वर्षं होऊन गेलीं—पण कृष्णा मला विसरला नाहीं. "

" अन् किसनशेठ तरी तुमच्याच शाळेतला न? त्याचे काय दिवे लागले आहेत?" पार्वतीबाई ओचापदर सावरीत सावरीत म्हणाल्या.

" अग तो व्यापारी बच्चा! हा कृष्णा म्हणजे डायरेक्टर आहे—."

" म्हणजे काय? " पार्वतीबाईंनीं आश्चर्यानें म्हटलें.

पतानीं तोंड फिरवून उत्तर केलें, " तें तुला कळायच नाहीं. मी एकदा मुंबईला जाऊन आलों म्हणजे तुझी खात्री होईल!—"

" लग्न झालं त्याच दिवशीं माझी खात्री झाली आहे. आतां नव्यान काय खात्री व्हायची उरली आहे—?" पार्वतीबाई खिन्न मुद्रेनें आतल्या बाजूस निघून गेल्या.

पंतानीं सभय अंतःकरणानें एकदाची मुंबई तर गाठली. पुराणांतल्या

सुदाम्याला श्रीकृष्णाने सोन्याची नगरी बहाल केल्याची कथा आहे. आपला कृष्णा आपल्याला कांहींतरी देईल—!

मित्राने सुचविल्याप्रमाणें त्यांनीं एका घोडागाडीवाल्याला पत्ता सांगितला आणि मित्राच्या भेटीसाठीं उत्सुक होऊन ते मनानें घोड्याच्या पुढें पळू लागले. भव्य रस्ते, उच्च इमारती, रस्त्यांतील वाहनाची गर्दी इत्यादि प्रकार त्याना आजवर ऐकून माहीत होते पण ऐकीव गोष्टींत आणि प्रत्यक्ष पाहण्यात केवढा फरक असतो तें आज त्याना चागले समजून आलें

" तात्या, तुमचा स्टुडीयो आला हेच ठिकाण तुम्हाला पाह्यजेना ? का गिरगावांतल्या खटाव वाडींत गाडी घेऊ-- ? " गाडीवाल्याचा प्रश्न अगदीं योग्य होता.

गिरगावातल्या चाळींमधून त्यानें असलीं अनेक पार्सलें आजवर पोहोंचती केलीं होतीं. पण आजचा पत्ता त्याला नवीन वाटला गाडीवाल्याच्या प्रश्नाचा रोख पंताच्या ध्यानात आला नाहीं. उत्तराऐवजीं बावळट मुद्रा करून ते गाडीवानाकडे पाहू लागले.

इतक्यात एक सूटबूटवाला मनुष्य पुढें आला. त्यानें पंतांची चौकशी केली आणि समाधानानें मान हलवून हसू दाबीत म्हटले, " म्हणजे तुम्ही आमचे सुदामदेव तर--"

" सुदामदेव-- ? " पत गोंधळून म्हणाले, " नाहीं हो. माझं नाव दामोदरपत आहे. त्यान पत्रात सागितल्या दिवशी आलों आहे. आमच्या कृष्णाचाच हा स्टुडियो न ! का पत्ता चुकलों ? "

" छेः छेः पत्ता बरोबर आहे. बर झालं आलात तें. चला आंत—" गाठोडें काखोटीस मारून पत आंत जाण्यास निघाले तोंच गाडीवानानें त्याना पैशाची आठवण करून दिली. "अरे हो—" म्हणून म्हणत बाराबदीच्या आंतल्या कप्प्यात त्यानीं ओशाळगत मुद्रेनें हात घातला. पण त्या सूटवाल्या गृहस्थाने विजारीच्या खिशात हात घातला, पाच रुपयाची नोट बाहेर काढली आणि तिच्याकडे न पाहता गाडीवाल्याच्या हातांत कोंबली देखील ! पतांनी हा चमत्कार डोळ्याने पाहिला ! वाः रे ऐट ! याला म्हणतात मुंबई !

—स्टुडियोत पतानी पाऊल टाकले त्यावेळी सुमारें सकाळचे दहा वाजण्याची वेळ असेल !

पंतांना हे सर्व नवीन होते. त्याना गोंधळात पाडणारें होतें. इद्रनगरी त्यांनी अजून पाहिली नव्हती पण ती अशाच स्वरुपाची बहुतेक असावी असा त्याना दाट सशय येऊ लागला. समोरच एक भव्य कमान उभी होती प्रवेशद्वारापर्यंत चारपाच पायऱ्या चढून जाव्या लागत होत्या दहा-पाच माणसें काळ्या फडक्यात कसलीतरी पेटी लपवून उभे होते. कुणाची वाट पहात ते उभे होते हे एक त्या मगलमूर्तींलाच ठाऊक ! शेजारीच एक भलीमोठी मोटारगाडी उभी होती. तिच्यात दोनचार माणसें लपून बसलेलीं दिसत होतीं.

इतक्यात त्या प्रवेशद्वाराच्या आतल्याबाजूनें काहीं माणसे बाहेर येऊ लागली. भगवान् श्रीकृष्ण—? आपण स्वप्नात तर नाहीं ? हा काय प्रकार आहे ? श्रीकृष्ण आपल्याला सामोरा येतो म्हणजे काय ? छे: ! स्वप्नच असल पाहिजे. पतानीं खात्री करून घेण्यासाठीं स्वतःच्या दडाला सडकून जोराचा चिमटा घेतला वेदना सहन न होऊन ते ओरडले, "ओऽऽऽय्-"

"का हो काय झाल -?" शेजारचा सूटवाला गृहस्थ आश्चर्यानें म्हणाला !

पंतानीं गोंधळून शरमिंद्या आवाजात म्हटलें, " कांहीं नाहीं. जीभ चावली ! पण कायहो, हें काय लचाड आहे ? हा कृष्ण कोण तिथें उभा आहे ? अन् या रगवलेल्या बायका कुणाच्या आहेत ? लळीतबिळीत तर नाहीं ना ?— "

" हें पहा पत—तुम्हाला तुमच्या लहानपणच्या दोस्ताला भेटायचं आहे न ! तो पहा दोस्त. मोठा चक्रम मनुष्य आहे ! तुम्हाला चकित करून सोडायचा त्यचा बेत आहे ! या वेषात तुम्ही त्याला ओळखू शकणार नाहीं अशी त्यान माझ्याजवळ आज सकाळीं पैज मारली आहे—"

" होय का—? अरे गुलामा ! शाळेंत अगदी हाच त्याचा स्वभाव. मास्तरांच्या नकला करील, माकडाना नाक खाजवून दाखवील. काय काय गमती—" पत पूर्वीच्या आठवणींत रगून म्हणाले.

" तेव्हां आता तुम्ही त्याची खोडकी जिरवा. पाहतां काय, पायऱ्या चढून जा अन् दसऱ्याची गाठभेट होऊन जाऊ द्या—"

पंतांना अवसान चढलें. कार्वेतले गाठोडें उजव्या हातानें सावरीत ते प्रेमभरानें पायऱ्या चढून गेले. आजूबाजूला कसले आवाज होत आहेत, कोण माणसें काय करीत आहेत याची बिलकूल दख्खल न घेता ते कृष्णा जवळ आले पतानीं त्याला कडकडून मिठी मारली !

" सुदामा, कुशल आहे न—?" कृष्णाचा—हो ! त्याच्याच मित्राचा हा आवाज ! हा सुदामा कोण ? पंत बोलण्याचा प्रयत्न करणार इतक्यात भगवान् श्रीकृष्ण म्हणाले, " किती दिवसानीं आपली ही भेट ? गुरुजींचा आश्रम सोडल्याला आपल्याला उणीपुरी वीस वर्षे तरी झालीं असतील—, नाहीं का—?"

पतानीं त्याच गोंधळलेल्या मुद्रेनें म्हटलें, " वीस का, चागली दोन तपें होऊन गेलीं असतील ! पण कृष्णा—मला समजत नाही कीं— "

" समजेल, समजेल, सर्व काहीं समजेल. असा अधीर होऊ नकोस. ह्या माझ्या राण्या तुझ्या भेटीसाठीं आतुर झाल्या आहेत ही रुक्मिणी—ही सत्यभामा—"

यत्रांचे आवाज चालू होते. माणसें मुकाट्यानें सारा कारभार उरकीत होतीं. पण पताच्या गावींही नव्हतें. त्याच्या आश्चर्याची कमान चढता चढता सूर्यमडलाला भेदू पहात होती.

" या इतक्या तुझ्या बायका— ?" त्यांनीं आश्चर्यानें ओरडून म्हटलें.

" एवढ्यान काय झाल आहे ? अंतःपुरात आणखी सोळा हजार आहेत घाबरू नकोस. या दहावीस जणींना फक्त आशीर्वाद दिलास तरी बाकीच्याना तो आपोआप पोहोंचेल—" भगवान् श्रीकृष्ण हसून म्हणाले.—उपचार म्हणून 'अष्टपुत्रा सौभाग्यवतीभव—' असा आशीर्वाद त्या बायांना पतानीं दिला—आणि कृष्णानें त्याचा हात धरून त्यांना आत नेलें—पण आत महाल नाहीं न् कांहीं नाहीं. चार फळ्या आडव्या टाकलेल्या दिसल्या ! पंत कृष्णाला कांहींतरी विचारणार इतक्यांत एकजण पुढें आला आणि अदबीनें म्हणाला—

" O. K— ! Sound O. K. आवाज उत्तम जमला आहे– "

दुसरा एकजण हसत म्हणाला–, " सुदाम देवानीं तर बहार केली. उड्या पडतील लोकाच्या ! "

पतानीं कृष्णाला थाबवून मधेच म्हटलें, " हा काय फाजीलपणा चालवला आहेस— ?"

" दाम्या, " भगवान् श्रीकृष्ण डोक्यावरचा मुकुट एका गड्याच्या हातात देऊन म्हणाले, " लेका, आता गांव सोड. तू मुबईला येऊन रहा. खेडेगावांत काय मातां आहे ? "

" ते तू मला सागू नकोस. तिथं माती आहे म्हणूनच राहण्यांत अर्थ आहे. मातीं नसती तर काय खडकावर बीं पेरल असत लोकानीं– ? पण तें राहू दे ! मला भेटण्याचा हा काय विचित्र थाट केला आहेस ? "

" दोस्त दामोदर, तू आलास हें पाहून मला आनंद झाला आहे. किती आनद झाला आहे सागू– ? सुदामाला पाह्यल्यावर श्रीकृष्णाला आनद झाला असेल तो आनद यापेक्षां कमीच. "

" म्हणून तू मला 'सुदामा' म्हणून म्हणालास होय—? " पतांनीं वाकड्या मानेनें प्रश्न केला !

" शभर मार्क तुला. पास. तेव्हा, तुला मी त्याच नांवान हाका मारणार आहे. आठ चार दिवस मुक्काम आहे न—? चल. अंघोळीची तयारी झाली आहे का रे—? "

आणि अघोळीच्या वेळीं तर पंत थक्कच झाले ! पत्नीच्या हस्तस्पर्शा-शिवाय दुसऱ्या बाईचा स्पर्श त्याना ठाऊक नव्हता ! आणि इथें तर सग-ळाच सावळा गोंधळ. भोंवतालीं दिवे तरी किती लावले होते. अंग भाजण्याचीच पाळी ! एक बाई लाजत लाजत आली. तिनें पाट मांडला, पंताना चक्क हाताला धरून पाटावर बसवलें. दुसरी आली, तिनें चादीच्या वाटींतलें तेल त्याच्या पाठीला चोपडलें ! तिसरी एक बाई गाणें म्हणत आली. हीच ती मगाची रुक्मिणी ! तिनें त्यांच्या शेंडीला तेल चोपडलें !

आतां मात्र हद्द झाली ! आपल्या दोस्ताला वेडतर लागलें नाहीं ? पण बायकाच्या गराड्यातुन पळून जाणें अशक्य होतें. एका प्रशस्त दगडावर

त्याना धरून बसवण्यात आलें. चार बाजूनें चार घगाळें माडली होती. बायका गाणीं म्हणत त्याच्या भोंवतीं हिंडू लागल्या—आणि एकेक ताब्या पाणी त्याच्या डोक्यावर ओतू लागल्या. एकीनें त्याच्या पाठीला उटणे लावलें, दुसरीनें त्याच्या डोक्यात अर्गजा घातला !

—जेवण्याचे वेळीं हाच तमाशा ! मात्र जेवताना पताना घरची आठवण झाल्यावाचून राहिली नाहीं लाडूचा तुकडा तोंडात टाकताना त्याना घरची आठवण झाली आपण दोस्ताच्या घरीं पक्वान खातो आहों आणि आपल्या घरी जोंधळ्याच्या कण्याहि पोराना आणि पत्नीला भरपूर देता येत नाहींत ! शिव शिव ! त्याच्या डोळ्यात पाणी आले !—जेवण झाल्यावर ताबूल भक्षण करण्याची सवय नव्हती तरी त्या रुक्मणी नावाच्या बाईनें आणून दिलेला गोविंद विडा पतानीं ओशाळलेल्या मुद्रेने तोंडात कोंबला ! आपली पत्नी हें पाह्यला या ठिकाणीं यावेळीं हजर नव्हती ही त्याना सिद्ध विनायक देवतेची कृपाच वाटली !

रुक्मिणीनें त्याना पहिला प्रश्न टाकला, " भाऊजी, आमच्यासाठीं काय खाऊ आणला आहे—? "

" तुमच्यासाठीं खाऊ ? काहीं नाहीं बुवा—! " पत गंभीर मुद्रा करून म्हणाले.

कृष्णा मधेंच म्हणाला, " अग तो तुझी चेष्टा करतो आहे त्याच गाठोड तपासून पहा. काहींतरी सापडेल आमची वहिनी मोठी सुगरण आहे. पहा—पहा तर खर—"

सत्यभामा नावाच्या बाईनें एक कसलेंतरी मळकें फडकें आणलें. तें पतांच्या सामानातलें नव्हतेंच. त्यांतून तिनें काढलेले पोहे मुबईच्या भट्टींतलेच होते. मूठ मूठ पोहे त्या बायानी आपसात वाटून घेतले. कृष्णानेंहि मोठ्या आवडीनें खाल्लें ! आणि नतर सर्व बायानीं मिळून गाणें म्हटलें !—

सर्व लोक घरोघरीं गेले तेव्हा रात्रीचे आठ वाजून गेले होते. कृष्णानें आपला पौराणिक पोशाख उतरून ठेवला. तोंडावरचा रग पुसला आणि सुटाबुटांत पताच्यापुढें येऊन तो उभा राहिला !

" हें तू माडलं आहेस काय ? " पतानीं त्याला विचारलें. पण त्यानें

हसून उत्तर केलें, " आज विचारू नकोस पुढेंमागें केव्हातरी जरूर सांगेन. बोल आतां, घरची काय वार्ता आहे— ? "

पतानीं आपलें दैन्य मोकळ्या मनानें त्याला सांगून टाकले.

—आणि आठव्या दिवशीं पतानी आपल्या दोस्ताचा निरोप घेतला !

पुन्हा तोच प्रकार. भगवान् श्रीकृष्णाच्या पोषाखात मित्रानें त्यांना निरोप दिला ! पताचा गळा दाटून आला ! निराशेनें त्याना कांहीं सुचेना ! मित्रानें एक दिडकी देऊं नये ह्याचें त्यांना अत्यंत वाईट वाटले ! परतीच्या प्रवासाचे बोटीचें तिकिट त्यानें काढून दिलें हेंच कौतुक ! भले ! आणि आपण केवढी आशा धरून आलों होतो ! असो ! मगलमूर्तीची इच्छा !

" मधूनमधून भेटत जा— " श्रीकृष्ण त्याच्या खाद्यावर हात ठेवून म्हणाले.

" भाऊजी, आता जाऊबाईना अन् लेकरांना आणायला विसरू नका हं — " रुक्मिणी नमस्कार करून म्हणाली दाराबाहेर उभ्या असलेल्या मोटारींत बसून पतानी भाऊचा धक्का गाठला.

—घरीं आल्यावर पार्वतीबाईनीं त्याना खोदखोदून प्रश्न विचारले. एकाही प्रश्नाचें सरळ उत्तर पताना देतां आलें नाहीं. भगवान् श्रीकृष्ण आणि त्याच्या त्या बायका हा विषय पत्नीपुढे काढणें त्याना इष्ट वाटलें नाहीं. परक्या बायकानीं आपल्याला अघोळ घातली, त्यानीं आपल्याला मोरपिसानीं वारा घातला, त्यानीं आपले पाय चेपले – ह्या गोष्टी स्वतःच्या पत्नीला कौतुकानें सागण्यासारख्या का असतात ?

अखेरीस पार्वतीबाई चिडून म्हणाल्या, " कुठला मित्रन् काय ? हुरळली मेंढी लागली लाडग्याच्या पाठामागें ! त्यातलीच गत नी काय ! मोरे मुबईला मित्राला भेटून आले. कशाला ? चार कवड्या तरी दिल्यान् का त्यानं ? पोराना एकाद वारभर कापड तरी ? म्हणे, मगलमूर्तीची इच्छा !— "

पत्नीचे वाग्बाण सहन करणें हेच एक ध्येय यापुढें दोन महिने पतांच्या डोळ्यासमोर असे !

—दोन महिन्यांनीं एके दिवशीं रत्नागिरच्या किसनशेट कडून त्यांना

तातडीचें बोलावणें आलें. पैशाचा तगादा असेल अशा भीतीने ते दबकत रत्नागिरीला गेले. आणि दुकानातून शेटजी उठून बाहेर सामोरे आलेले पहातांच दामोदर पंत चकित झाले. " अरे पंत, तुमचा नशीब लई चांगला! आपल्या डायरेक्टर कृष्णान तुला हें खत धाडून दिला आहे आन् मलाबी लिवला आहे. तुमच्या शगळा उधारीचा पैशा आमी न घेवावा असा त्यानीं लिवला आहे. ते सोता समदा आकडा बराबर करनार हाये ! "

दामोदरपंतांचा स्वतःच्या कानावर विश्वासच बसेना ! घाई घाईनें त्यानीं पाकीट फोडलें, एक इंग्रजी छापलेला कसला तरी कागद खालीं पडला. तो उचलून किसनशेट आनंदानें ओरडला—,

" ऑ ! ए तो चेक हाये ! छेसो रुपीया ! मारा डाकुरजी ! भाई, दामोदरपंत, तुम्हाला या कागदाचे छे सांभर, सहाशें रुपिया नगद मिळेल "

दामोदरपंत पत्र वाचू लागले. पत्रात कृष्णानें, त्याच्या दोस्तानें लिहिलें होतें--

" मला माफ कर. तुला मीं फसवलें आहे. सुदामचरित्रावर एक बोलपट काढण्याची माझी इच्छा होती. त्यासाठीं तुझा मी उपयोग करून घेतला. चित्र सुंदर झाल आहे. मुंबईला पुढच्या आठवड्यांत लागणार आहे. सौ. वहिनींना आणि मुलांना जरूर घेऊन ये. याखेपेस तुला मुळींच फसवणार नाहीं. सोबत सहाशें रुपयाचा चेक पाठवला आहे. किसनशेटजीला उधारीचे पैसे देऊं नकोस. मीं ती व्यवस्था केली आहे. माझी एक विनंति आहे. सौ. वहिनी माझ्यावर खूप रागावल्या असतील. त्याची तू समजूत काढ. किसनशेटकडून माझ्या नांवें तुला पसंत पडतील अशीं वाटेल त्या किंमतीचीं चार लुगडीं घेऊन जा. आणि मुलांना लागणारें कापडही बेलाशक घेऊन जा. सहाशें रुपये तुझ्या मर्जीप्रमाणें खर्च कर—सिनेमा पाहण्यास सर्वांना घेऊन मुंबईला जरूर ये--"

--पंतानीं खूप विचार केला. पण पत्नीला आपला हा सिनेमा दाखवूं नये हेंच मत त्यानीं कायम केलें. गृहाच्या स्वास्थ्यासाठीं कांहीं काहीं गोष्टी पतीनें पत्नीपासून चोरून ठेवण्यांत शहाणपणा असतो.

● ● ●

## मेणबत्ती १०

गगूची आई तीन लहान लहान अर्भकाना मागे ठेवून देवाघरी निघून गेली त्यावेळी गगू अवघी दहा वर्षांची होती घरात बायकोमनुष्य दुसरें कुणी नसल्यामुळे गगूला तीन लहान भावडांचे मातृत्व पत्करणें भाग पडलें. एकादी आत्या-मावशी हातीपायीं पडून उभी करता आली असती, नाहीं असें नाहीं—परंतु अण्णाच्या तऱ्हेवाईक स्वभावामुळे त्या नवीन व्यक्तीचें घरात कितपत जमले असतें हा प्रश्नच होता.

अण्णाचा स्वभाव विलक्षण होता. तोंडाला येतील तीं वाक्सुमने उधळून ते कार्यांचा पुरता विध्वंस करीत गगू शाळेत गेली नाही तरी कावाकावी. घरांतून जरा बाहेर पडली तरी संताप, मुलगी पुस्तक वाचू लागली तरी त्यांचा पारा चढे. हात जोडून स्वस्थ बसलेली दिसली तरी त्याना खपत नसे शेजारणी घरात आल्या तर अण्णांना खपत नसे. गगू त्यांच्या घरीं गेली तरी ते चिडत असत. चिडण्याचें, रागावण्याचें, अद्वातद्वा बोलण्याचें त्याना व्यसनच जडले होतें भरपूर बोलण्याचा कैफ चढल्याशिवाय त्यांना चैन पडत नसे. असल्या या नतद्रष्ट बापाच्या हाताखालीं गगूला जीवन जगणें अशक्यप्राय होऊन गेलें असेल यात नवल नाहीं.

वडिलानीं पुनः लग्न करून आपल्यावरचा रोष दुसऱ्या एकाद्या व्यक्तीला थोडासा वाटून द्यावा असें तिला मनापासून वाटे—पण अण्णांनीं लग्न केलें नाहीं

गंगूचा पुरता वनवास होता. निवडुंगाच्या फडात वाढणाऱ्या एखाद्या सुकुमार फुलाप्रमाणें ती जगत होती. भावडाना ती भरवीत असे. त्यांना अघोळी घाली, त्याचे कपडे चढवी, त्याना खेळवी. त्याचे दुखणें खुपणें पाही आणि रात्रीं त्याना कुशीत घेऊन झोपीं जाई.

गगू मोठी झाली, पधरावे सपून तिला सोळावे वर्ष लागलें. समोरच्या माडींत राहणाऱ्या सुमारे तिच्याच वयाच्या मुलाकडे पाहून मान खाली घालण्याइतपत तिला समजू लागले पदराआड झाकलेल्या ठेव्याचा तिला अभिमान वाटू लागला वेणी-फणी करण्यात तिचा बराच वेळ खर्च होऊं लागला. जगाच्या घडामोडीत आपल्याला निश्चित स्थान आहे हें तिला कळू लागलें.

समोरच्या गुंड्याकडे ती चोरून पाहू लागली. गुंड्याच्या चेहेऱ्यावर देवीचा छबिना वस्तीला येऊन गेल्याचीं स्पष्ट चिन्हें फर्लांगावरून दिसत असत. मुलगा फारसा हुषार नव्हता. पण गगूला त्याचीं स्वप्नें पडू लागलीं. निदान वडिलाच्या काचातून तरी सुटका होईल या आशेने ती समोरच्या खिडकीकडे मधून मधून पाहू लागली. गुंड्याचा घोगरा आवाज कानावर पडला कीं तिच्या छातीवरचा पदर फडफडू लागे. गुंड्या अगणातल्या नळावर आंघोळीला आला कीं त्याची उघडी अगलट पाहण्याचा मोह आवरणें तिला कठीण वाटू लागे.

आणि एके दिवशीं गणपतीच्या गर्दीत रात्रीं गुंड्याच्या हाताचा ओझ-रता स्पर्श तिच्या उघड्या दडाला झाला. तिनें धीटपणानें अंधारात त्याच्या दडाला चोरटा चिमटा काढला. इतक्यात कुणाची तरी चाहूल लागल्यामुळे ही चोरट्या चिमट्याची चैन त्याना आवरून घ्यावी लागली पण यावरच हें प्रकरण थाबलें नाही. दुसऱ्या दिवशीं रात्री ती सधीची वाट पहात मागील दारीं उभी राहिली. गुंड्या बाहेरच टेहळणीवर होता. त्यानें थरथरत्या हाताने तिचा दड घट्ट धरला व आवेगानें तो पुढें वाकला !

गगूचें सारें शरीर वाऱ्यावर तरगू लागलें ! स्थळ—काळाच्या मर्यादा तिनें झुगारून दिल्या व गुंड्याच्या उत्साहाला तितक्याच आवेगानें प्रत्युत्तर दिलें–,पण ही गोष्ट वाड्यांतल्या एका ओढाळ मावशीच्या दृष्टींतून सुटली

नाहीं हा चटोरपणा तिला खपला नाहीं तिने गुडयाच्या आईला सांगितलें व गगूच्या वडिलांनाही पण सांगून टाकलें.

गगूचें रम्य स्वप्न रंगण्याच्या आतच भंग पावलें. तिच्या साऱ्या आशाआकांक्षा धुळीला मिळाल्या. जीवन नको असें तिला वाटू लागले. त्या दिवशीं रात्रीं रडून रडून तिने मानेखालची उशी ओलीचिंब करून सोडली

गुडयाच्या आईने तिची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. आपली स्वत:ची विपन्नावस्था तिने गगूला उघड करून दाखविली व 'अशा दरिद्री घरात तुला कसें समाधान, सुख मिळेल?' असा सवाल केला. पण गगूला तें पटलें नाहीं तिला अण्णाच्या घरातून सुटावयाचें होतें. गुडया तिला पसंत होता. गुडयाशीं संसार करून जो काय मिळेल तो सुखदु:खाचा वाटा उचलायला ती राजी होती.

पण तिच्या मनाप्रमाणें कांही एक घडून आले नाहीं. एक वर्षभर तिला अण्णाची नजरकैद भोगावी लागली. गुड्याकडे चोरून पाहण्याचेंही सुख तिला यापुढें मिळू शकलें नाहीं. त्या रात्रीची आठवण झाली कीं तिचा ऊर दाटून येई आणि स्वत:शींच ती अश्रु ढाळीत बसे वर्षअखेर गुड्या पुन्हा परीक्षेंत नापास झाला आणि त्याच्या नापासाचें कारण म्हणून वाड्यातील मंडळी गगूच्या तोंडाकडे सूचकपणानें पाहू लागली. गगूला जास्तच वाईट वाटलें सर्वांत दु:खाची गोष्ट म्हणजे गुड्याहि पण तिच्यावर उलटल्यासारखा झाला. तिने आपल्याला खुणा केल्या म्हणून आपण स्वत:ला विसरल्याचें तो इतरांना सांगू लागला!

पण पुढच्याच महिन्यात तिला गुड्याचा नाद कायमचा सोडावा लागला. एका नाकींडोळीं नीटस असलेल्या, बी. ए. झालेल्या तरुणानें तिला पसंत केली, हुंडापांडा ठरला आणि एका गोरज मुहूर्तावर गगूची अण्णाच्या घरातून सुटका झाली. भावडांचा निरोप घेऊन, वडिलांकडे डोळा वर करून न पहाता तिनें तें घर सोडलें.

दोन दिवसाच्या अवधींत तिला एक नवीन शोध लागला. आपला नवरा ठार बहिरा असल्याचें कळतांच तिच्या उरात कुणी तरी सुरी खुपसल्यासारखें

तिला झालें. लग्नाच्या गडबडींत बहिऱ्या बाबूरावानीं आपलें हें व्यग अत्यत कुशलतेनें इतरापासून दडवून ठेवलें होतें. पण पत्नीपासून व्यग लपवून ठेवणारा पति अजून पृथ्वीतलावर अवतरलेला नाहीं. एके दिवशीं लाचार मुद्रेनें त्यानें गगूला रास्त परिस्थितीची जाणीव करून दिली. बस्स्! त्यानतर जणूं काय आपण त्या गावचेच नाहीं या बेफिकीरीनें तो तिच्याशी वागूं लागला. एका भोळ्या पोरीचा आपण काहीं अपराध कला आहे याची जाणीव त्याला यापुढें कधींच झाली नाहीं.

कोणत्याही गोष्टीची कधीही पर्वा न करणे हें बाबूरावाच्या आयुष्याचे स्थायीभूत तत्त्वज्ञान होते. कारणाशिवाय एक अक्षर तो गगूशीं बालत नसे.

गगू जेवली की नाहीं, तिला काय हवें, काय नको—कश्शाकश्शाची त्यानें चौकशी केली नाही त्याला कशाशीच पर्वा नव्हती.

गगूच्या हृदयाला ही केवढी मोठी जखम झाली! तिची किती गोड स्वप्नें होतीं आणि प्रत्यक्ष तिच्या नशिबीं काय आले होतें?

माहेरीं बाप त्रासिक म्हणून सुख नाहीं सासरी नवरा कोडगा म्हणून समाधान नाहीं. लहानपणीं आई गेल्यामुळे पाठीवर प्रेमाचा हात नाहीं. मिळून काय, तर तिचे नशिब हे असे तडकलेल्या करवटीसारखें बेकार होतें!

एके दिवशीं बाबूरावाने आपण होऊन तिच्याशीं बोलण्यासाठीं तोंड उघडलें आणि पुढील शब्द तिच्या कानावर आदळले—

"तुझा बाप डाबीस आहे माझ्या घरात पाऊल टाकण्याची मी त्याला बदी केली आहे. हुंडा हजार देईन म्हणून कबूल केलन् थेरड्यान अन् दोन वर्षे झालीं तरी राहिलेले पाचशें अजून दिले नाहींत काल त्याला मी चागला झाडला. आता साफ कानावर हात ठेवून पैसे देण्याचें तो हलकट नाकबूल जातो आहे! ठीक आहे. पाहून घेईन. तू त्याच्या घरीं गेलीस, किंवा गेल्याच कळल तर आपला विचार बघ!"

गगूनें कपाळाला हात लावला! लहान भावडासाठीं तिचा जीव गोळा होत असे. त्याच्यांसाठीं एक दोन दिवसाआड ती अण्णाच्या घरीं जाऊन येई. पण हें बाबूरावाला ती सागणार तरी कशी?

गगूला दिवस गेले तेव्हा तिची अतिशय परवड उडाली. हे खावें, तें खावें असे तिला खूपखूप वाटे—पण हें सांगणार कुणाला आणि कसें? शेजाऱ्या तिच्याच वयाच्या विवाहित तरुण मुली पतिसमवेत हिंडायला, फिरायला, सिनेमाला वगैरे जातांना ती अनेकदा पाही आणि तिचें मन उचल खाई. तिचें दाबून ठेवलेलें मन पुन्हा वर उसळी खाई व बंडखोरी करूं पाही. राहून राहून तिच्या मनात येई कीं, बाबूरावाच्या ठिकाणी गुड्या असता तर किती छान झालें असतें?

गुड्या तिला केव्हातरी रस्त्यात भेटे. निराशेनें दुखावलेल्या गंगूच्या मनाला जबरदस्त मोह पडे. पण तिच्या संस्काराधीन मनाचा भीतीनें थरकाप होई. गुड्या अतिशय सभ्य होता. गंगूच्या लग्नानंतर त्याने कधींहि तिच्याशीं लगट केली नाहीं. आणि मौज ही कीं, त्याचे तुटकपणाचें वागणें तिच्या हृदयाला करवतीप्रमाणें कापीत असे. गुड्यानें मॅट्रिकचा उंबरठा ओलांडला हें ऐकून तिला आनंद वाटला. तिनें त्याच्याजवळ पेढ्यांची याचना केली. गुड्याने पेढे दिले—पण एका बशींत घालून ते पेढे त्याने तिच्यापुढें ठेवले. क्षणभरच गंगूला वाटलें— पण झट्कन् तिनें तो विचार मनांतून काढून टाकला. किती झालें तरी आतां हें वर्तन विवाहित स्त्रीला शोभत नाहीं, याची जाणीव तिनें स्वतःला करून घेतली. पण हें शल्य मात्र तिला बोंचत राहिलें.

बाळंतपणांत गंगूचे अतिशय हाल झाले. एका मुलीला तिनें जन्म दिला त्याच क्षणीं तिनें स्वतःलाही जन्म दिला. असल्या भयंकर स्थितींत तिला पुरे बहात्तर तास कंठावे लागले. बाबूरावानें तिची संपूर्ण उपेक्षा केली. गंगूच्या पोटात दुखूं लागले त्यावेळीं तो ऑफिसच्या कामासाठीं मुंबईला गेला होता. गंगू स्वतःच्या पायानें इस्पितळापर्यंत चालत गेली. तिला कुणाचाही आधार मिळाला नाहीं. बाबूराव चार दिवसांनीं परत आला. गंगूची त्यानें विचारपूस केली नाहीं, कांहीं नाहीं.

गंगू दहा दिवसांनतर घरीं परत आली. बाबूरावांच्या जीवनात काडीइतका फरक झाला नाहीं. गंगू नव्हती तेव्हां ते एकटे खानावळींत जेवत असत. आतां दोन डबे घरीं येऊं लागले, येवढाच काय तो फरक! गुंड्याची

आई तिला भेटायला आली. तिने हा सगळा अघटित प्रकार पाहून गंगूला चार गोष्टी प्रेमळपणानें समजावून सांगितल्या खाणावळींतील अन्न बाळ-तिणीला चांगले नाहीं, अंगाला लावायला दोन महिने बाई ठेवावी इत्यादि गोष्टी गंगूला समजत का नव्हत्या ? पण बाबूरावाच्या नकर्तेपणापुढे ती काय करणार ? गुड्याच्या आईजवळ तिनें सारा दुर्दैवाचा पाढा वाचला आणि पोटभर रडून घेतले.

महिन्याभरानें गंगूला ताप येऊं लागला. बाबूरावानें तिच्या अंगाला हात लावूनदेखील पाहिलें नाहीं. महिना–पंधरा दिवसांनीं गंगू खडखडीत उभी राहिली.

—हीच तऱ्हा दुसऱ्या खेपेस. उलट पहिल्या मुलीची काळजी हा एक आणखी गुतागुतींचा मामला होता. बाबूराव तिला सभाळीत असे असें म्हणण्यापेक्षा शेजारच्या बायाबापड्या तिची काळजी घेत असत हेंच म्हणणें यथार्थ होईल. आताच्या घरीं मुलीला ठेवण्याची गंगूची सूचना त्यानें लागलींच मोडून काढली. त्याला मुलीची पर्वा नव्हती, बायकोची नव्हती, कुणाचीच नव्हती.

दोन्ही मुली रांगत्या झाल्या. त्याना आवरता आवरता गंगूला पुरेवाट होऊन जाई त्यांच्या खोड्या पाहतां पाहतां तिचें भान हरपून जाई. ' देवानं आपल्याला एकादा मुलगा दिला असता तर ' या विचारानें क्षणमात्र ती खट्टू होई परंतु लगेच प्रेमानें ती दोघींना उचलून छातीशीं घेई व मुके घेऊन घेऊन त्याना नकोसे करून सोडी.

गंगूच्या मागचें दुखणें मात्र तिला विसरलें नाहीं. पहिल्या खेपेस अंगात मुरलेला ताप दुसऱ्या बाळंतपणानंतर पुन्हां उसळून आला. या खेपेस सहा महिने गंगू अंथरुणाला खिळून होती. अंथरुणावर उठून बसण्याचीसुद्धा तिला शक्ति राहिली नाहीं. ताप हळूहळू कमी झाला पण अशक्तता ठाणें देऊन राहिली.

अशा स्थितींत दोन वर्षें गेल्यावर तिसऱ्यांदा आपल्यावर पुनर्जन्माची पाळी येणार हे दिसू लागतांच गंगू गडबडून गेली. तिच्या अंगात आता बिलकूल त्राण राहिला नव्हता. यातून आपली धडगत नाहीं हें तिला स्पष्ट

दिसत होते आणि जर आपलें कांहीं बरें वाईट झाले तर आपल्या छबड्याची काय वाट होईल या चिंतेनें तिची कबरच्च खचून गेली.

अण्णांना तरी बोलवून घ्यावें म्हणून तिनें बाबूरावाला विनवून सांगितलें. पण बाबूरावानें तिला चक्क नकार दिला इतकेंच नव्हें तर 'मेलीस तर तुला फुकून टाकीन आणि त्याच पावली पुन्हा बोहोल्यावर जाऊन उभा राहीन. एकदा नाहीं, म्हणजे नाहीं. तो थेरडा या घरांत येता कामा नये!' असें तिला बजावलें.

' आणि एके दिवशीं अग मोडून आल्यासारखें वाटल्यामुळे नाइलाजानें गगू अंथरुणावर पडली. दोषी तापानें ती आठवडाभर निजून होती कुडी-तून बाहेर पडण्यासाठीं जिवाची आठ दिवस धडपड चालू होती—पण गंगू त्यातून जगली! अजून तिच्या दुर्दैवाचे खेळ सपले नव्हते. वडिलाना भेटण्याची तिला तापात भयकर तळमळ लागे. मुलींचें हाल तिला उघड्या डोळ्यानीं बघवत नसत. अतिश्रमानें तिला स्वतःचा जीव नकोसा होई—पण एक—एक गोष्ट तिच्या मनाप्रमाणें घडून आली नाहीं. गगू जगली. पण मेली असती तर तिचे हाल तरी टळले असते!

तापातून ती बरी झाल्यावर चार महिन्याचा तिला वाखा झाला आणि सहा महिन्यांच्या बारीक तापानतर दुखणे क्षयावर गेल्याचें डॉक्टरांनीं निदान केलें! आता मात्र आकाश फाटल्याप्रमाणें झालें. बाबूरावानें तिचा पुरता छळ माडण्याचें ठरविलें असावें असें दिसलें. क्षयाच्या दुखणेकऱ्याजवळ मुलें नसावींत म्हणून त्यानें गगूला त्या जागेतून हलवलें. ज्या दिवशीं गगूला त्याने दोन्ही हातावर उचलून बाहेर रस्त्यावर उभ्या असलेल्या टाग्यांत नेऊन ठेवलें त्या दिवशीं पाऊस बेसुमार कोसळत होता. गगूच्या वेड्या मनाला वाटलें कीं आपल्याप्रमाणें आकाशही रडत असावें. गगूला ज्या नव्या जागेंत ठेवण्यांत आले ती जागा शेळया मेंढ्या बाधण्याच्याहि लायकीची नव्हती. एका आडगल्लींतील जुनाट घरात तिसऱ्या मजल्यावरच्या अधेऱ्या खोलींत तिला ठेवण्यात आलें, तिच्या दिमतीला कुणीही तेथें नव्हतें.

किती दिवस!—किती दिवस!

गंगूचें मरण अटळ होतें हें पाहून बाबूरावानें तिची ही खास सोय केली असावी ! तिच्या मरणाचीच तो वाट पहात होता. त्याच्या दैनंदिन आयुष्यक्रमांत गगूचें लोढणें त्याला आतां नकोसें वाटू लागलें होतें.

मुलींना भेटण्याची सोय नाहीं. बापाचें तोंड दिसण्याची आशा नाहीं, भांवडांच्या आयुष्यांत नखभरही स्थान नाहीं. नवऱ्याची बेपर्वावृत्ति दिवसेंदिवस वाढत चाललेली स्पष्ट दिसत आहे अशा भकास जीवनांत गंगू फार दिवस जगली नाहीं. मेणबत्ती पुरती विझून गेल्यावर सुमारें सहा तासांनीं बाबूराव त्या ठिकाणीं हजर झाला ! एक मेणबत्ती विझून गेली. काहीं दिवसांनीं दुसऱ्या एका नव्या मेणबत्तीची तिच्याठिकाणीं स्थापना झाली.

जगाचें रहाटगाडगें चालू आहे सणवार येतात, जातात. माणसें जगत असतात ! सर्व काहीं ठीक आहे. उजेड देण्यासाठीं अनत मेणबत्त्या पेटत असतात. एकाद्याच्यान्न मनांत विचार येतो कीं लोकाच्या आनदासाठीं जळणाऱ्या या मेणबत्त्यांची काय वाट—?

● ● ●